अकोला । शनिवार
दि. २६ एप्रिल २०२५
वर्ष : १९ अंक : ५६
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




यशस्वी जयस्वालने रचना इतिहास!
(पान ७ वर..)




## आजचा सामना

कोलकाता
विरुद्ध
पंजाब

स्थळ : ईदन गार्डन, कोलकाता
वेळ : सायं. ७.३० वाजता.



## तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 45.1 | 27.2 |
| चंद्रपूर | 45.4 | 00.0 |
| ब्रम्हपूरी | 45.5 | 27.4 |
| अमरावती | 44.6 | 23.9 |
| वर्धा | 44.1 | 25.4 |
| नागपूर | 44.0 | 23.8 |
| यवतमाळ | 44.4 | 24.0 |
| गडचिरोली | 43.2 | 24.0 |
| वाशिम | 43.4 | 00.0 |
| भंडारा | 42.6 | 25.0 |
| गोंदिया | 42.6 | 24.4 |
| बुलढाणा | 40.6 | 27.7 |

## थोडक्यात

### घनदाट जंगलात सुरू आहे गोळीबार!



**बीजापूर :** छत्तीसगडमधील बीजापूर जिल्ह्यातील घनदाट जंगलात मागील ४८ तासांपासून गोळीबार सुरू आहे. बीजापूर जिल्हा हा छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेवर आहे. या जिल्ह्यातील घनदाट जंगलात किमान ३०० नक्षलवाद्यांना तीन हजारांपेक्षा जास्त जवानांनी घेरले आहे. नक्षलवादी आणि सुरक्षा पथकाचे जवान यांच्यात चकमक सुरू आहे. जंगलात प्रमुख नक्षलवादी नेते लपले असल्याची ठोस माहिती हाती आल्यानंतर जवानांनी परिसराला घेराव घातला आणि चकमक सुरू झाली आहे. कारगेट्टा, नाडपल्ली, पुजारी कांकेर या डोंगरांमध्ये ठिकठिकाणी जवानांनी नक्षलवाद्यांना घेरले आहे. दोन्ही बाजूने थांबून थांबून गोळीबार सुरू आहे. नक्षलवाद्यांविरुद्धच्या कारवाईत महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणा येथील नक्षलवाद विरोधी पथकांचे सुरक्षा जवान सहभागी झाले आहेत. ड्रोन आणि हेलिकॉप्टरच्या मदतीने सुरक्षित उंचीवरुन जंगलाची पाहणी करण्याचे तसेच नक्षलवाद्यांच्या हालचालींचा अंदाज घेऊन त्यानुसार कारवाई करण्याचे काम जवान करत आहेत. नक्षलवाद्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाईची देखरेख आणि नियंत्रण तेलंगणातून सुरू आहे.

## पहलगाम हल्ला प्रकरण...

# एका अतिरेक्याचे घर स्फोटकांनी उडवले ; दुसऱ्याचे बुलडोझरने पाडले!

**पहलगाम, दि. २५ वृत्तसंस्था**

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी मंगळवार २२ एप्रिल २०२५ रोजी २६ पर्यटकांची हत्या केली. नाव आणि धर्म विचारुन हिंदू असलेल्या पर्यटकांना ठार करण्यात आले. या घटनेनंतर सुरक्षा पथकाने घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या माहितीआधारे तीन अतिरेक्यांची रेखाचित्रे प्रसिद्ध केली.**



या तीन अतिरेक्यांना सुरक्षा पथके शोधत आहे. जम्मू काश्मीर पोलिसांनी तिन्ही अतिरेक्यांची रेखाचित्रे प्रसिद्ध करुन माहिती देणाऱ्यास २० लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर अतिरेक्यांशी संबंधित महत्त्वाची माहिती सुरक्षा पथकांना मिळाली. यानंतर सुरक्षा पथकांनी तातडीने कारवाई केली.

जरी तीन रेखाचित्रे प्रसिद्ध केली असली तरी आणखी काही अतिरेकी स्थानिक मदतनीस म्हणून सहभागी झाले होते. यात त्राल येथील आसिफ शेख हा एक अतिरेकी होता. सुरक्षा पथकांना आदिल आणि आसिफ शेख या दोघांची घरे जम्मू काश्मीरमध्येच असल्याचे कळले. ही माहिती मिळताच सुरक्षा पथकांनी या घरांवर धाड टाकली. एका अतिरेक्याच्या घरात आयईडी आढळला. यानंतर बॉम्ब शोधक पथकाला बोलावण्यात आले. या पथकाने आयईडी न हलवता तिथेच स्फोट करुन नष्ट करणे हाच पर्याय उपलब्ध असल्याचे सांगितले. यानंतर आवश्यक ती खबरदारी घेऊन स्फोट करण्यात आला. अतिरेक्याचे घर आयईडी स्फोटात नष्ट झाले. यानंतर दुसऱ्या अतिरेक्याच्या घरावर बुलडोझर फिरवून ते घर पाडण्यात आले. दोन्ही घरे नष्ट झाली आहेत. पण अद्याप अतिरेकी सापडलेले नाहीत. या अतिरेक्यांचा शोध सुरू आहे.

आदिल हुसेन ठोकर (रा. अनंतनाग), अली भाई उर्फ तल्हा भाई, हाशिम मुसा उर्फ सुलेमान या तीन अतिरेक्यांची रेखाचित्र पोलिसांनी प्रसिद्ध केली आहेत. यातील आदिलचे बिजबेहारातील गुरी येथील घर बुलडोझरने पाडण्यात आले. तसेच अतिरेकी आसिफ शेखचे घर स्फोटकांनी नष्ट करण्यात आले.

# लष्कर-ए-तोयबाच्या टॉप कमांडरचा खात्मा



**श्रीनगर, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्य दलाने मोठी कारवाई केली. जम्मू-काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात आज शुक्रवारी झालेल्या चकमकीत भारतीय सुरक्षा जवानांनी लष्कर-ए-तोयबा (एलईटी) चा टॉप कमांडर अल्ताफ लल्ली याला ठार केले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. यानंतर दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी भारतीय सुरक्षा दलांनी काश्मीर खोऱ्यात मोठ्या प्रमाणात सर्च ऑपरेशन सुरु केले आहे.

जम्मू-काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात शुक्रवारी एक चकमक झाली. यात सुरक्षा दलाचे दोन जवान जखमी झाले. तर या चकमकीत एलईटीचा टॉप कमांडर दहशतवादी अल्ताफ लल्ली याचा खात्मा करण्यात आला.

बांदीपोरा जिल्ह्यात आज शुक्रवारी सकाळी भारतीय सुरक्षा जवान आणि दहशतवाद्यांत चकमक सुरु झाली. (पान २ वर)

# बेजबाबदार वक्तव्य करू नका!

## सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना फटकारले

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यावर केलेल्या वादग्रस्त टिप्पणीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना फटकारले आहे. तसेच भविष्यात अशी विधाने करू नका, अन्यथा त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात असा इशारा देखील दिला आहे.

सावरकरांवर बदनामीकारक विधान केल्याच्या प्रकरणात राहुल गांधी यांना मानहानीच्या खटल्यात जारी केलेले समन्स रद्द करण्यास नकार देणाऱ्या अलाहाबाद उच्च



न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने राहुल गांधी यांचा समाचार घेतला.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. राहुल गांधींविरुद्ध दाखल केलेल्या सावरकर मानहानी खटल्याची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'त्यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले आणि तुम्ही त्यांना अशी वागणूक देता, असे विधान करता. भविष्यात अशा प्रकारची बेजबाबदार विधाने केल्यास त्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील''.

सुप्रीम कोर्टाने त्यांच्या निर्देशात म्हटले की, न्यायालय कोणालाही स्वातंत्र्य सैनिकांविरुद्ध वादग्रस्त विधाने करू देणार नाही. महाराष्ट्रात सावरकर पुज्यनीय आहेत, तुमच्या आजीनेही सावरकरांचे कौतुक करणारे पत्र लिहिले होते. महात्मा गांधी जेव्हा ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्रे पाठवत असत तेव्हा ते लिहित असत, तुमचा विश्वासू सेवक. तर त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींना देखील इंग्रजांचे सेवक म्हणणार का? असा समाचार सर्वोच्च न्यायालयाने घेतला. त्यामुळे आगामी काळात जर अशी विधाने कोणीही केली तर आम्ही या प्रकरणात गंभीर दखल घेऊ आणि त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल असा इशारा देखील दिला. १७ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील एका रॅलीत भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधींनी (पान २ वर)

# हिंदू कधीही असे कृत्य करणार नाहीत - भागवत

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

हल्लेखोरांनी लोकांचा धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. हिंदू कधीही असे कृत्य करणार नाहीत, अशा शब्दांत सरसंघचालक मोहन भागवत यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

ही लढाई धर्म विरूद्ध अधर्म यातील आहे. त्यामुळे आम्हाला आशा आहे की, कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असेही ते म्हणाले. पंडित दिनानाथ मंगेशकर यांच्या ८३ व्या स्मृतिदिनानिमित्त विलेपार्ले येथे झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात ते बोलत होते.



भागवत म्हणाले की, ''सध्या जी लढाई सुरू आहे ती लढाई धर्म आणि अधर्म यांच्यातील आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. लोकांना त्यांचा धर्म विचारून ठार मारण्यात आले. हिंदू असा प्रकार कधीच करणार नाहीत.

हे आपल्या संस्कृतीत नाही. द्वेष आणि वैरभाव आपल्या परंपरेचा भाग नाही. पण अन्याय सहन करणेही आमच्या वृत्तीला मान्य नाही. हल्ला झाल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. तेव्हा कुणाचाही धर्म जात-पात आडवी आली नाही.'' भागवत म्हणाले, ''ही घटना आठवण करून देते की ही लढाई धर्म आणि अधर्म यांच्यातील आहे. आपल्या हृदयात वेदना आहे, राग आहे. पण अधर्माचा नाश करण्यासाठी सामर्थ्य दाखवावे लागेल. त्यांनी रामायणाचा संदर्भ देत सांगितले की, ''रावणाने आपले विचार बदलण्यास नकार दिला. त्यामुळे दुसरा पर्याय उरला नाही. प्रभू रामाने त्याला ठार केले. पण ते देखील सुधारण्यासाठी संधी दिल्यानंतरच.'' ते म्हणाले, ''आपण शक्तिशाली आणि दृढ प्रतिसाद अपेक्षित करतो. खरा अहिंसावादी व्यक्ती देखील बलवान असावा लागतो. जर सामर्थ्यच नसेल, तर पर्याय उरत नाही. पण जेव्हा सामर्थ्य असते, तेव्हा ते गरजेच्या वेळी दिसायला हवे.'' भागवत यांनी समाजातील एकतेचे महत्त्वही अधोरेखित केले. (पान २ वर)

# भारतीय वायुसेनेने सुरू केला युद्धाभ्यास!

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानविरुद्ध कडक कारवाई करत आहे. दरम्यान, भारतीय हवाई दलाने 'एक्सरसाईज आक्रमण' अंतर्गत एक मोठा लष्करी सराव सुरू केला ज्यामध्ये टेकडी आणि जमिनीवरील लक्ष्यांवर हवाई हल्ले करण्यात आले. सध्या मध्यवर्ती क्षेत्रात युद्ध सराव सुरू आहे. या सरावात, हवाई दलाचे वैमानिक टेकडी आणि जमिनीवरील लक्ष्यांवर हल्ला करण्याचा सराव करत आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्व सेक्टरमधून मध्य सेक्टरमध्ये अनेक हवाई दलाची उपकरणे पाठवण्यात आली आहेत. या सरावांतर्गत, लांब अंतरावर जाऊन शत्रूच्या ठिकाणांवर अचूक बॉम्बफेक केली जात आहे. युद्धसदृश



परिस्थितीत काम करण्याचा अनुभव मिळावा म्हणून वैमानिक प्रत्यक्ष युद्ध परिस्थितीत सराव करत आहेत.

या युद्ध सरावाला 'आक्रमण' असे नाव देण्यात आले आहे, जे त्याचे उद्दिष्ट स्पष्टपणे प्रतिबिंबित करते. म्हणजे हल्ला करणे आणि हल्ला क्षमता मजबूत करणे. या दरम्यान, हवाई दलाचे उच्चपदस्थ वैमानिक सक्रियपणे सहभागी असतात आणि वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांकडून त्यावर लक्ष ठेवले जात आहे. जमिनीवर आणि पर्वतीय लक्ष्यांवर अचूक हल्ला करण्यासाठी वैमानिकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये अद्यापही ५८ दहशतवादी सक्रिय!

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानसमर्थित दहशतवादी गट 'लष्कर-ए-तोयबा'चा (एलईटी) एक प्रॉक्सी गट, 'द रेझिस्टन्स फ्रंट'ने (टीआरएफ) अलीकडील पहलगाम दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुरक्षा यंत्रणांसाठी धोक्याची घंटा वाजलीच आहे. मात्र, सूत्रांनुसार सध्याच्या घडीला जम्मू आणि काश्मीरमध्ये तब्बल ५८ दहशतवादी सक्रिय असून, यातील बहुतांशी दहशतवादी 'लष्कर-ए-तोयबा'चे आहेत, अशी माहिती गृह मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत देण्यात आली आहे. पहलगाम शहराजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर उद्भवलेल्या चिंताजनक परिस्थितीत केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी इंटेलिजन्स ब्यूरोचे संचालक तपन डेका आणि रिसर्च




अँड ॲनालिसिस विंगचे प्रमुख रवी सिन्हा यांच्यासोबत उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठक घेतली. या बैठकीत गुप्तचर यंत्रणेने ही महत्त्वाची माहिती शेअर केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या जम्मू आणि काश्मीरमध्ये किमान ५८ परदेशी दहशतवादी सक्रिय आहेत, त्यापैकी ३५ 'लष्कर'शी, २० 'जैश-ए-मोहम्मद'शी आणि ३ 'हिजबुल मुजाहिद्दीन'शी संबंधित आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा यंत्रणांना दहशतवाद्यांच्या हालचालींबद्दल आधीच माहिती होती. तरीही पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला झाला, यामुळे त्रुटी उघड झाली असल्याचे संकेत आहेत. या बैठकीत जम्मू आणि काश्मीरमधील काही भूतकाळातील घडामोडींवरही चर्चा झाली. यामध्ये गेल्या महिन्यात कुपवाडा येथे झालेल्या एका परदेशी दहशतवाद्याच्या हत्येचा समावेश आहे. गुप्तचर यंत्रणांनी हे पाकिस्तानकडून सतत होत असलेल्या घुसखोरीचे लक्षण मानले आहे. याशिवाय, बांदिपोरा येथे चार दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आणि त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. एवढेच नाही, तर फेब्रुवारीमध्ये रियासी (जम्मू) येथे २६० राऊंड गोळ्या आणि चार रॉकेट जप्त करण्यात आले. पुलवामा आणि शोपियाँ येथे आयईडीदेखील जप्त करण्यात आले. हे सर्व जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या कारवाया दर्शवते.

**सरावातून पाकला संदेश :** दहशतवाद्यांचे कंबरडे मोडण्यासाठी आणि पाकिस्तानला अद्दल घडविण्यासाठी भारताने ''ऑपरेशन आक्रमण'' सुरू केले आहे. भारतीय हवाईदल (पान २ वर)

## बिनविरोध उमेदवारांना विजयी घोषित करण्यासाठी

# किमान मतांची टक्केवारी अनिवार्य करा

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

निवडणुकांमध्ये बिनविरोध उमेदवारांना विजयी घोषित करण्यासाठी किमान मतांची टक्केवारी अनिवार्य करण्याची तरतूद करावी, असा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकारला दिला. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने लोकप्रतिनिधीत्व कायद्याच्या कलम ५३(२) ला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी केली. यावेळी न्यायालयाने हा सल्ला केंद्राला दिले. या प्रकरणी उत्तर दाखल करण्यास न्यायालयाने सरकारला सांगितले.

लोकप्रतिनिधीत्व कायद्याच्या




कलम ५३ (२) नुसार बिनविरोध निवडणुकांमध्ये मतदान न घेता उमेदवारांची थेट निवड करण्याची तरतूद आहे. याचिकाकर्त्यांनी या तरतूदीला आव्हान दिले आहे. ही तरतूद मतदारांना वरीलपैकी कोणीही नाही (नोटा) पर्याय निवडण्याच्या अधिकारांपासून वंचित ठेवते, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

आजच्या सुनावणीच्या सुरुवातीला, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाच्या प्रतिज्ञापत्राचा संदर्भ दिला. ते म्हणाले की, केवळ ९ उदाहरणे आहेत जिथे बिनविरोध उमेदवारांना विजयी घोषित करण्यात आले आहे. राज्य विधानसभांच्या बाबतीत असे बऱ्याच उदाहरणांमध्ये घडले असल्याचे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या वतीने, वकील राकेश द्विवेदी यांनी युक्तिवाद केला की, गेल्या २५ वर्षांत संसदीय स्तरावर फक्त १ घटना घडली आहे. ज्यामध्ये बिनविरोध उमेदवाराला विजयी घोषित केले आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, जो व्यक्ती ५ टक्केही मते मिळवू शकत नाही, त्या व्यक्तीला संसदेत निवडणूक कसे पाठवावे? बिनविरोध उमेदवारांसाठी किमान मतांची टक्केवारी अनिवार्य करणे, ही केवळ एक सक्षम तरतूद आहे. ज्याचा सरकार विचार करू शकते, असे न्यायमूर्ती म्हणाले. प्रस्तावित तरतूद बहुपक्षीय संस्कृतीला चालना देईल आणि निरोगी लोकशाही मजबूत करेल, असे न्यायमूर्ती म्हणाले. तर निवडणूक आयोगाचे वकिल म्हणाले की, नोटा या पर्यायाचा निवडणुकांवर कोणताही परिणाम होत नाही.गेल्या लोकसभा निवडणुकीत सुरत मतदारसंघातील एकमेव उमेदवाराला विजयी घोषित करण्यात आले होते, कारण निवडणूक बिनविरोध झाली होती, असे याचिकार्त्याने नमूद केले आहे. देशातील पहिल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपासून बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची एकत्रित संख्या २५८ आहे, असे याचिकेत म्हटले आहे.

# दहशतवाद विरोधात केंद्र सरकारच्या पाठीशी सर्व पक्षीयांनी उभे राहावे - शरद पवार

**सावंतवाडी, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम येथील पर्यटकांवरील दहशतवादी हल्ल्याविरोधात केंद्र सरकारने ठोस भूमिका घेऊन उत्तर द्यावे. या परिस्थितीत केंद्र सरकारच्या पाठीशी सर्व पक्षांनी उभे राहिले पाहिजे. त्यात कोणतेही राजकारण करू नये, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज (दि.२५) व्यक्त केले. ते आंबोली येथील ऊस संशोधन केंद्रात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, धर्म विचारून एखाद्या पर्यटकाला मारणे, हे भयंकर कृत्य आहे. दहशतवादविरोधात सर्वपक्षीयांनी सरकारसोबत राहिले पाहिजे. पण सरकारने एखादा निर्णय घेताना त्याचा भारतावरच उलटा परिणाम होणार नाही? याची दक्षता घेतली पाहिजे. यावेळी त्यांनी काही



लोक धर्माबाबत अधिक बोलतात, त्यांनाच सरकार पाठिंबा देते, हे योग्य नसल्याचेही नमूद केले.

पहलगाममधील हल्ल्यानंतर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसकडून खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. त्यामुळे, सरकार जो काही निर्णय घेईल, त्याला आमचा पाठिंबा असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. हल्ला भारतावर झालेला आहे, त्यामुळे सरकारला पाठिंबा देणे गरजेचे आहे. पण सरकारने पाकिस्तानला सडेतोड उत्तर द्यावे. एखादा निर्णय घेतला, तर तो तडीस न्यावा, असेही ते म्हणाले. केंद्र सरकारने पाकिस्तानवर काही निर्बंध लादले आहेत, पण हे निर्बंध लादत असताना सरकारने थोडासा विचार करावा, असे मत पवार यांनी व्यक्त केले. भारताची (पान २ वर)

# बालविवाह रोखण्यात आले यश!

## जिल्हा बाल संरक्षण कक्षांतर्गत चाईल्ड हेल्पलाईनचा पुढाकार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २५ :** जिल्हा बाल संरक्षण कक्षा अंतर्गत वाईल्ड हेल्प लाईन १०९८ ही यंत्रणा कार्यरत असून बालक मदती करीता हा टोल फ्री क्रमांक आहे. १०९८ या क्रमांकावर मरसुळ ता. पातुर येथे दि. २५ एप्रिल २०२५ रोजी विवाह होणार असुन ती बालीका अल्पवयीन असल्याची गोपनीय माहीती प्राप्त झाली त्या नुसार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. गिरीश पुसदकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजु लाडुलकर व बालकल्याण समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली चाईल्ड हेल्पलाईनच्या सुपयवायजर श्रीमती विदया उंबरकर व रेल्वे वाईल्ड लाईनचे केस वर्कर स्वप्नील शिरसाट ही टिम मरसूर येथे रवाना झाली गावात जाण्यापूर्वी चानी पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना भ्रमणध्वनीव्दारे संपर्क करून मरसुळ या गावात बालविवाह होणार असल्यानी माहीती दिली.चाईल्ड हेल्पलाईन ची टिम त्या गावात जात आहे सुरक्षेकरीता २ पोलीस कॉन्स्टेबल सोबत देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार चानी पोलीस स्टेशनच्या राजनंदीनी पुंडगे व उज्वला इनिवाले हया मरसूर गावात पोहचले गावात सरपंच यांचे घरी जावून भेट दिली व बालविवाह होणार असल्याचे सांगीतले व आपण त्या कुटुंबाकडे चालावे या बाबत विनंती केली असता सरपंच, अंगणवाडी सेवीका, चाईल्ड हेल्प लाईन व व पोलीस यंत्रणा सदर बालीकेच्या घरी पोहचले व मुलीचा विवाह आहे का या बाबत चौकशी केली असता पालकांनी उदया विवाह असल्याचे सांगीतले.तेव्हा बालीकेच्या कागदपत्रांची तपासणी केली असता ती अल्पवयीन असल्याचे दिसुन आले. बालीका ही अल्पवयीन असून तीचा विवाह केल्यास तो बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत अदखलपात्र गुन्हा होतो व विवाहात सहभागी होणारे सर्वावर बालविवाह प्रतिबंध अधिनीयम २००६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते. या बाबत बालीकेच्या पालकांचे समुपदेशन करण्यात आले. व बालीकेचे वय १८ वर्ष पुर्ण झाल्याशीवाय बालीकेचा विवाह करणार नाही असे हमीपत्र लिहून घेण्यात आले. या वेळी चाईल्ड हेल्प लाईनची व पोलीस यंत्रणा, गावचे सरपंच श्री पंढरीनाथ गडदे, अंगणवाडी सेवीका विजयमाला देवकते उपस्थीत होते. बालकांच्या संरक्षणासाठी गावांमध्ये ग्राम बाल संरक्षण समित्या गठीत असून सरपंच हे त्या समीतीचे अध्यक्ष असून अंगणवाडी सेवीका सदस्य सचिव असतात ग्रामीण भागांकरीता गावचे ग्रामसेवक हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी असून बालविवाह बाबत माहीती असल्यास चाइल्ड हेल्पलाईन १०९८. पोलीस यंत्रणा ११२ यांना संपर्क करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बालविकासअधिकारी श्री. गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

# मनपाच्या कार्यालयातील अग्निशमन यंत्रे कालबाह्य!

## फायर ऑडिटची नोटीस दुसऱ्यांना; स्वत: मात्र बेजबाबदार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** अकोला अग्निसुरक्षेच्या नावाखाली शहरातील व्यापाऱ्यांना, खाजगी आस्थापनांना आणि शाळांना फायर ऑडिटसाठी नोटीसा पाठवणाऱ्या अकोला महापालिका प्रशासनाची स्वतःचीच कार्यालये धोकादायक ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी महापालिकेच्या विभाग कार्यालयांमध्ये लावण्यात आलेली अग्निशमन यंत्रे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी कालबाह्य झाली आहेत. मात्र त्याची कोणतीही दखल न घेता ही यंत्रे अद्याप तसेच लावलेली आहेत.

मनपाच्या मुख्यालयात कार्यरत असलेल्या या अग्निशमन यंत्रांची नियमित तपासणी आणि देखभाल करण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. मात्र, हे यंत्र कालबाह्य झाले असताना यावर कोणतीही कारवाई न करणे, हे मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षाचे प्रतीक ठरले आहे




» महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये लावण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रांची सखोल पाहणी सुरू असून, कालबाह्य यंत्रांची त्वरित नोंद घेण्यात आली आहे. नवीन निविदा प्रक्रिया राबवून लवकरात लवकर आधुनिक आणि कार्यक्षम अग्निशमन यंत्रे बसवली जातील.

- **मनीष कटले,** प्रमुख, मनपा अग्निशमन विभाग

महत्त्वाचे म्हणजे, हीच महापालिका शहरातील विविध संस्थांना अग्निसुरक्षा नियमांचे पालन न केल्याबद्दल नोटिसा बजावते. परंतु स्वतःच्या कार्यालयातील सुरक्षा बाबत प्रशासन बेफिकीर असल्याचे दिसून येते. अग्निशमन यंत्रांचे नियमित तपासणी आणि कालमर्यादिनुसार त्यांचे नूतनीकरण करणे गरजेचे असते. कालबाह्य यंत्रे आपत्कालीन प्रसंगी निष्प्रभ ठरू शकतात, यामुळे मोठा धोका संभवतो.यामुळे महापालिकेच्या जबाबदारीवर अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. काय प्रशासन केवळ इतरांवर फक्त नियम लादण्यासाठी कार्यरत आहे? स्वतःची सुरक्षा आणि जबाबदारी कधी घेतली जाणार? असा प्रश्न नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.महापालिकेने तातडीने या यंत्रांचे परीक्षण करून नवीन अग्निशमन यंत्रे बसवावीत आणि आपल्या कार्यालयांची फायर ऑडिट प्रक्रिया पूर्ण करून इतरांसमोर आदर्श निर्माण करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# जागेचा तिढा : ट्रान्सफर स्टेशन उभारणी लांबणीवर

**अकोला -** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत महापालिका क्षेत्रात दोन ट्रान्सफर स्टेशन सुरू झाले असून पूर्व आणि पश्चिम झोनमध्ये दोन ट्रान्सफर स्टेशन सुरू होणार आहेत. पूर्व झोन मधील ट्रान्सफर स्टेशनचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र, पश्चिम झोनमधील महसूलच्या जागेचा तिढा सुटत नसल्याने हा प्रकल्प अजूनही वेटिंगमध्ये आहे.

शहरातील दैनंदिन संकलित केलेल्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत चार झोनमध्ये त्या-त्या परिसरातील घनकचरा संकलित करण्यात येणार आहे. येथून हा घनकचरा कॉम्पॅक्टरद्वारे भोड येथे नेऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत शहरात दोन ट्रान्सफर स्टेशन कार्यान्वित झाले असून यामध्ये पूर्व झोनमध्ये खडकी व उत्तर झोनमध्ये नायगावचा समावेश आहे.

पूर्व झोन मध्ये रेल्वे लाईनला लागून असलेल्या स्मशानभूमी लगत ट्रान्सफर स्टेशन उभारण्याचे काम सुरु झाले आहे. आवारभिंत व रस्त्याचे काम झाले आहे. परंतु पश्चिम झोन मधील ट्रान्सफर स्टेशनच्या जागेचा तिढा अजूनही सुटला नाही. पश्चिम झोन मध्ये रमाबाई नगर येथे महसूल विभागाची जागा असून ही जागा दफनभूमीची असल्याचा दावा करण्यात आल्याने जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पश्चिम झोन मध्ये ट्रान्सफर स्टेशन उभारण्यास विलंब होत असल्याची परिस्थिती आहे.

**पश्चिम झोन मध्ये रमाबाई नगर येथे महसूल विभागाची जागा आहे मात्र, ही जागा दफनभूमीची असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे जागा निश्चित झाली नाही.**

- **दिलीप जाधव,** सहा. आयुक्त

**पूर्व झोन मध्ये ट्रान्सफर स्टेशनचे काम सुरू झाले असून आवारभिंत व रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. इतर काम सुरू होणार आहे.**

- **कृष्णा वाडेकर,** उपअभियंता, बांधकाम विभाग

# हिंदूंवरील हल्ल्याचा निषेध, हिंदू राष्ट्र समन्वय समितीची राष्ट्रपती राजवटीची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** देशभरातील विविध हिंदू संघटना व संप्रदायांची संघटित शक्ती असलेल्या हिंदू राष्ट्र समन्वय समितीने पश्चिम बंगाल व जम्मू-कश्मीरमधील हिंदूंवरील वाढत्या हिंसाचाराचा तीव्र निषेध केला असून, या दोन्ही राज्यांमध्ये तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी दिनांक २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना निवेदनातून केंद्र सरकारकडे केली आहे.

समितीच्या निवेदनानुसार, पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात ८ एप्रिल २०२५ रोजी वक्फ कायद्याच्या निषेधाच्या नावाखाली मुस्लीम जमावाने उग्र जातीय दंगल घडवून आणली. यात ५०० हून अधिक हिंदू कुटुंबांचे पलायन झाले, २०० हून अधिक घरे आणि दुकाने जाळली गेली, महिलांवर अत्याचार झाले आणि किमान ३ हिंदूंची हत्या झाली. या घटनेवर ममता बॅनर्जी सरकारने कोणतीही प्रभावी कारवाई केली नाही, उलट काही प्रकरणांत पोलिसांनी हिंदूंवरच खोटे गुन्हे दाखल केले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



दुसरीकडे, २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर धर्म विचारून झालेल्या जिहादी हल्ल्यात २६ हिंदू पर्यटकांचा निर्घृण खून करण्यात आला. या हल्ल्याने देशभरात संतापाची लाट उसळली आहे. धर्म विचारून हिंदूंना लक्ष्य करण्याची ही घटना जाणीवपूर्वक भारताच्या एकतेवर आणि हिंदू समाजावर झालेला हल्ला असल्याचे समितीने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर समितीने दोन्ही राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करणे, एन आय ए/सीबीआय मार्फत चौकशी करावी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई,व पीडित हिंदूंचे पुनर्वसन आणि सुरक्षा दलांची तैनाती यासह एकूण ७ ठोस मागण्या केल्या आहेत.

यावेळी हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे जिल्हा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोर्णा नदीतील जलकुंभी हटवण्यासाठी मनपाचे युद्धपातळीवर काम सुरू

## ३ कि.मी. जलकुंभी काढण्यात आली; गुलजारपुरा परिसरात काम सुरू

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १५ :** अकोला महानगरपालिकेच्या वतीने मोर्णा नदीतील जलकुंभी हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, आतापर्यंत अकोली खुर्द ते दगडी पूल या दरम्यान सुमारे ३ किलोमीटरचा जलकुंभीने व्यापलेला भाग स्वच्छ करण्यात आला आहे. सध्या गुलजारपुरा परिसरात हे काम वेगात सुरू आहे.



महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशानुसार, उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आणि जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांच्या देखरेखीखाली हे काम सुरू आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत मोर्णा नदीच्या पात्रात जलकुंभीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने नदीलगतच्या भागांत डासांचा प्रादुर्भाव वाढून त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो

या पार्श्वभूमीवर २७ मार्चपासून मनपाच्या स्वबळावर पोकलेन मशिन आणि मजुरांच्या सहाय्याने जलकुंभी हटवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे, जलकुंभी हटवण्याच्या कामासाठी मनपाच्या पोकलेन मशिनसाठी खास "स्पेशल बकेट" खरेदी करून लावण्यात आले आहे. यामुळे कामाचा वेग चार ते पाच पटांनी वाढला असून, तुलनेत अत्यंत कमी खर्चात काम सुरू आहे.या दरम्यान स्वच्छ झालेल्या नदीपात्रात मलेरिया विभागामार्फत डास अळी नाशक औषधांची फवारणीही केली जात आहे. मनपाच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना असून, लवकरच संपूर्ण मोर्णा नदी जलकुंभी मुक्त होणार असल्याची माहिती मनपा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# राष्ट्रीय हरीत लवादच्या निकषांचे पालन नाही

**अकोला -** महापालिका क्षेत्रात हरीत लवादने सूचविलेल्या निकषांचा एकाही प्रतिष्ठानने अवलंब केला नसून या संदर्भात महापालिका प्रशासन कुठलीही कार्यवाही करीत नसल्याची परीस्थिती आहे. या बाबीचा नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

राष्ट्रीय हरित लवाद यांच्या ५ सप्टेंबर २०२२ च्या आदेशानुसार महापालिका प्रशासनाने निकष पूर्ण न केलेल्या मॅरेज हॉल, मॅरेज लॉन, हॉटेल्स, रेस्टॉरंट व बँकेट हॉल यांच्यावर तीन महिन्यांच्या आत कुठलीही कार्यवाही केली नाही. हरित लवादाच्या या आदेशाकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनीही कानाडोळा केला. राष्ट्रीय हरित लवाद यांनी या संदर्भात २० डिसेंबर २०१९, २३ जुलै २०२० व ४ फेब्रुवारी २०१९ यांनी आदेश जारी केले होते. तरी संबंधित विभाग व अधिकाऱ्यांनी आदेशाची दखल घेतली नाही.

महापालिका प्रशासनाने या व्यावसायिकांना नोटीस जारी करुन सील ठोकले होते मात्र, ९० दिवसात निकष पूर्ण करण्याच्या अटीवर महापालिकेने शिथिलताही दिली होती. जिल्हाधिकारी यांनी २३ सप्टेंबर २०२२ रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक, आयुक्त महापालिका, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पत्र जारी करुन तीन महिन्याच्या आत राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करण्याचे आदेशीत केले होते. त्यानंतरही संबंधित विभागाने कुठलीही कार्यवाही केली नाही.

# पान 1 वरून...

## लष्कर-ए-तोयबाच्या टॉप...

दहशतवाद्यांच्या हालचालीबाबत मिळालेल्या गुप्तचर माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी संयुक्तरित्या बांदीपोरा येथील कुलनार अजस परिसरात शोध मोहीम सुरू केली. यादरम्यान लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्याला सुरक्षा जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. येथे चकमक सुरु आहे, अशी माहिती भारतीय सैन्याच्या चिनार कॉर्प्सने दिली आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज श्रीनगरमध्ये दाखल झाले. त्यांना बांदीपोरा येथे सुरू असलेल्या सर्च ऑपरेशनची माहिती देण्यात आली. ते येथील सुरक्षा स्थितीचा आढावा घेत आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सीमेवर तणावाची परिस्थिती आहे. पहलगाम हल्ल्याच्या तीन दिवसांनंतर पाकिस्तानी सैन्याने रात्रभर नियंत्रण रेषेवरील अनेक पाकिस्तानी चौक्यांवरून गोळीबार केला. पण या गोळीबाराला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले. या घटनेत भारताच्या बाजूने कोणीही जखमी अथवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

## बेजबाबदार वक्तव्य करू नका...

सावरकरांवर केलेल्या वादग्रस्त टिप्पण्यांमुळे त्यांच्या विरुद्ध हा मानहानीचा खटला सुरू झाला.

या रॅलीदरम्यान बोलताना राहूल गांधी यांनी दावा केला होता की सावरकरांनी ब्रिटीश राजवटीत तुरुंगवास भोगत असताना वसाहतवादी मालकांना माफीनामाचे पत्र लिहिले होते. दरम्यान त्यांनी सावरकरांचा उल्लेख 'ब्रिटिशांचा सेवक' असा केला होता, तसेच सावरकरांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत होते असे विधान देखील त्यांनी केले होते.

या प्रकरणाबाबत वकील नृपेंद्र पांडे यांनी तक्रार दाखल केली होती, आणि आरोप केला होता की राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान वीर सावरकरांचा जाणूनबुजून अपमान करण्याच्या उद्देशाने हे विधान केले आहे. त्यानुसार राहुल गांधी यांच्याविरुद्ध आयपीसीच्या कलम १५३ () आणि ५०५ अंतर्गत प्रथमदर्शनी खटला विचारात घेऊन ट्रायल कोर्टाने त्यांना समन्स बजावले होते.

## हिंदू कधीही असे कृत्य करणार...

"जर आपण एकसंघ राहिलो, तर वाकड्या नजरेने आपल्याकडे पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. आणि कोणी पाहिलंच, तर त्याचे डोळे फोडू," असे ते ठामपणे म्हणाले. १९६२ मध्ये आपल्याला धडा मिळाला. तेव्हापासून आपण लष्कराची ताकद वाढवली. आता अपेक्षाही वाढल्या आहेत. देशात संताप आहे. आशा आहे की अपेक्षा पूर्ण होतील. हा हल्ला कधीही माफ करता येण्यासारखा नाही. आमच्या भारतीयत्वाच्या भावनेत कुणीही फूट पाडू शकत नाही. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथील लोकप्रिय पर्यटक स्थळ बैसरण व्हॅलीमध्ये झालेल्या हल्ल्यात २६ लोकांचा बळी गेला. येथील बचावलेल्या पर्यटकांनी सांगितले की, त्यांचा धर्म विचारल्यानंतरच त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता.

## जम्मू-काश्मीरमध्ये अद्यापही...

मध्य प्रदेशातील विस्तीर्ण प्रदेशात युद्धाचा सराव करत आहे. राफेल लढाऊ विमानांच्या नेतृत्वात त्यांच्या लढाऊ विमानांचा ताफा सहभागी आहे. त्यात 'राफेल', 'सुखोई-३०' विमाने सहभागी झाली आहेत. भारतीय हवाईदल मैदानी आणि पर्वतीय भागांसह विविध भूप्रदेशांत जटिल जमिनीवरील हल्ला मोहिमांचा सराव करत आहे. दक्षिण आशियाई शत्रूंवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'उल्का' हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि 'रॅम्पेज', 'रॉक्स'सारखी लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे तैनात केली आहेत.

## दहशतवादविरोधात केंद्र...

विमानसेवा जर पाकिस्तानातून जात असताना बंद केली, तर त्याचा परिणाम भारतावरच होईल. असे अनेक निर्णय आहेत. पण यातून पाकिस्तानलाही एक संदेश जाईल, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेला सिंधुदुर्ग जिल्हा बँक संचालक व्हिक्टर डॉन्टस, माजी मंत्री प्रविण भोसले, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, ऊस संशोधन केंद्राचे प्रमुख अधिकारी प्रभाकर देशमुख आदी उपस्थित होते.

आंबोली, येथील वसंतदादा पाटील ऊस संशोधन केंद्राची पाहणी केल्यानंतर त्यांनी कृषी क्षेत्रात उसाची नवी क्रांती होण्यासाठी महत्वपूर्ण संशोधन यशस्वी करण्याचा प्रयत्न आंबोली येथे सुरु आहे. ३५ कांड्यापर्यंत उसाची उंची वाढणार आहे. त्यातून जास्त साखर उत्पन्न मिळेल. त्यासाठी आढावा बैठक घेऊन केंद्राकडे प्रस्ताव पाठवणार असल्याचे पवार यांनी सांगितले. यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापरही करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शरद पवार गुरुवारपासून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. आंबोली नांगरतास येथील ऊस संशोधन केंद्राला भेट देऊन त्यांनी संशोधकांशी चर्चा केली. वेंगुर्ले येथील फळ संशोधन केंद्रात काजूवर नवनवीन प्रक्रिया उद्योग उभे राहत असल्याची माहिती त्यांनी घेतली. "हे भूषणावह आहे. असे असले तरी काजू पिकांबाबत जनतेत किती उत्साह आहे, हेही तपासून घेतले पाहिजे. पण संशोधनाचे काम चांगले चालले आहे," असे पवार म्हणाले.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी : डॉ. दिलीप इंगोले

**अकोला :** जीवनात यशस्वी होण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी. त्यांनी आवर्जून विविध लेखकांची पुस्तके वाचावी. नियमित वाचन केल्याने भाषा समृद्ध होते व्याकरणाच्या चूका होत नाही. केवळ पाठांतर न करता जे आपण वाचतो त्याचा भावार्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. पुस्तकांमुळे आयुष्य सुकर होते, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते सुप्रसिद्ध लेखक आणि कवी प्रा डॉ. दिलीप इंगोले यांनी केले. ते येथील प्रमिलाताई ओक ग्रंथालयात ओक स्मारक समितीचे अध्यक्ष मनमोहन तापडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जागतिक पुस्तक दिन कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालय भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ग्रंथ मित्र प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती, प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध, लेखक आणि कवी डॉ. दिलीप इंगोले, प्रमुख अतिथी प्रा. मोनिष चौबे, ग्रंथपाल अलका जोशी व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित पाहुण्यांचे स्वागत ग्रंथालयाच्या ग्रंथपाल अलका जोशी आणि पंकज गोलाईत यांनी केले कार्यक्रमाचेअध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती यांनी उपस्थित सर्वांना जागतिक पुस्तक दिनाच्या शुभेच्छा देत पुस्तकांचे जीवनाशी कसे अतूट नाते आहे सुसंस्कारित वाचनाने मन प्रगल्भ होते मनाची एकाग्रता वाढते त्याकरिता वाचनाची गोडी बालपणापासूनच लागली पाहिजे त्याकरिता सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे म्हणाले

याप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. मोनिष चौबे यांनी मार्गदर्शनपर भाषणात जागतिक पुस्तक दिनाविषयी माहिती विशद केली. तसेच आजच्या संघर्षमय जीवनात पुढे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करीत क्रमिक व स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यावर भर द्यावा, वेळेचे नियोजन करावे व त्या अनुषंगाने विविध पुस्तकांचे अनिवार्यतेने वाचन करावे, शक्यतो 'कमवा आणि शिका' या पद्धतीने शिक्षण घेतल्यास येणाऱ्या अडचणींवर मात करणे सहज शक्य होईल असे आवाहन केले विद्यार्थिनी जयश्री खोबरखेडे यांनीही जागतिक पुस्तक दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले.

# काश्मीरमध्ये अडकलेल्यांना सुखरूप परत आणू-अजित पवार



बारामती , दि. २५ वृत्तसंस्था

काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या आणि दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकलेल्यांना सुखरूप परत आणण्याचे प्रयत्न राज्य सरकारकडून सुरू आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. बारामतीत ते बोलत होते.

पवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः या विषयात लक्ष घालून आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तिकडे गेले आहेत. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री गिरीश महाजन हे काम करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेसुद्धा सातत्याने माहिती घेत आहेत. तेथील मुख्यमंत्र्यांशी बोलले जात आहे. गेल्या दोन दिवसांपासून आमचे अथक प्रयत्न सुरू आहेत, त्यात बऱ्यापैकी यश आले आहे. काही लोकांना रेल्वे, विमानाद्वारे परत आणले जात आहे. आत्ताच मी एकाशी व्हिडीओ कॉलद्वारे बोललो, जे अडकले आहेत, ते सुखरूप परतत आहेत.

देशवासीयांच्या या हल्ल्यानंतर अनेक प्रतिक्रिया येत आहेत. पाकिस्तानला जरब बसावी, बदला घेतला पाहिजे, असे काहींचे म्हणणे आहे. निष्पाप लोकांना संपविण्याचे क्रूर काम अतिरेक्यांनी केले आहे. केंद्र सरकारने त्यात लक्ष घातले आहे. या दुर्घटनेत भारत एकजुटीने उभा आहे, असे चित्र जगामध्ये गेले. जगातील अनेक देशांच्या प्रमुखांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. अतिरेकी कारवाया करणाऱ्यांना जागा दाखवण्याची वेळ आल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

### राज्यातील यंत्रणा अलर्ट : मंत्री भरणे

काश्मीरमधील हल्ल्यात निष्पापांना जीव गमवावा लागला, याचे तीव्र दुःख आहे, दहशतवाद्यांचा शोध घेऊन त्यांचा कायमचा बीमोड करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने स्वतः पंतप्रधानांनी बैठक घेत सूचना दिल्या आहेत. येत्या काही दिवसांत केंद्र सरकार अतिरेक्यांवर कडक कारवाई करेल.भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी केंद्र, राज्य सरकारचे प्रयत्न राहतील. या घटनेनंतर राज्यातील सर्व यंत्रणांना अलर्ट करण्यात आले आहे. राज्यातील किती लोक अडकलेत, याचा आकडा निश्चित नाही. परंतु, बारामती दूध संघाचे संचालक मंडळसुद्धा अडकले आहे. जे कोणी अडकले असतील, त्यांना पुढील दोन दिवसांत राज्यात आणले जाईल. उपमुख्यमंत्री पवार यांनी ना. मोहोळ यांच्याशी संपर्क केला असल्याचे ना. दत्तात्रय भरणे यांनी बारामतीत सांगितले.

## थोडक्यात

### किनवट परिसरात तरुणांना एक कोटींचा गंडा; दोघांवर गुन्हा

**नांदेड:** भारतीय रेल्वेत नोकरी लावतो असे सांगून किनवट व परिसरातील तरुणांना १ कोटी ११ लाख रुपयांना गंडा घालणा-या दोघांविरुद्ध किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेवून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हा शाखेकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.किनवट व परिसरातील काही तरुणांना भारतीय रेल्वेत नोकरी लावण्याचे आमीष दाखवून हरेंद्र भारती, आशीष पांडे (दोघेही राहणार नवी दिल्ली) व रेल्वे विभागातील काही अधिकारी यांनी अनेक तरुणांना फसविले. भारतीय रेल्वेतील लिपीक पदासाठी जागा उपलब्ध असल्याचे सांगून त्यासाठी पैसे मोजावे लागतील, असे सांगून आरोपींनी वेगवेगळ्या तरुणांकडून एकूण १ कोटी ११ लाख ८६ हजार रुपये जमा केले. पैसे घेतांना संबंधितांनी नेमणुकीची बनावट कागदपत्रे, ओळखपत्रे ई-मेलद्वारे पाठविले. उत्तरप्रदेशातील हापूर येथे प्रशिक्षणासाठी बोलावण्यात आले. २० दिवस तेथे थांबूनही ना प्रशिक्षण झाले, ना कुठली नियुक्ती झाली. काही दिवसांनंतर संबंधितांनी आपले दूरध्वनी बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गजाजन बाबू जाधव (वय २५, रा. सुभाषनगर, किनवट) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हरेंद्र भारती, आशीष पांडे व अन्य संशयितांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणात किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे अधिक तपास करीत आहेत. घटनेचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेवून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला जाणार आहे. दोन आरोपींची नावे समोर आली असली तरी यात आणखी कोणाकोणाची सहभाग आहे, याचा शोध सुरु आहे.ग्रामीण भागातील अनेक तरुण वेगवेगळ्या नोकरीच्या शोधात असतात.

### इस्लामपुरात सराईत गुन्हेगाराचा धारदार हत्याराने खून

**सांगली :** गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराचा गुरुवारी दुपारी इस्लामपुरात बाजारात धारदार हत्याराने खून करण्याचा प्रकार घडला. इस्लामपूर परिसरात गेल्या २४ तासांत हा दुसरा खून झाल्याने शहरात खळबळ माजली आहे.शहरात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी आदी गुन्हे दाखल असलेल्या नितीन संजय पालकर (वय ३५) या सराईत गुन्हेगारावर आज दुपारी वाळवा बझार परिसरात धारदार हत्याराने वार करण्यात आले. यात तो गंभीर जखमी होऊन पडला होता. ही माहिती मिळताच उपअधीक्षक मंगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक संजय हारूगडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमीला उप जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. पालकर वाळवा बझार परिसरात एका पान टपरीवर उभा राहिला असता अज्ञातांकडून त्याच्यावर हल्ला झाला. आज बाजाराचा दिवस असल्याने आणि रस्त्यावर विक्रेते व्यवसाय करत असताना गर्दीवेळीच हा हल्ला झाल्याने पळापळही झाली. हल्ल्यानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पलायन केले. संशयितांना शोधण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.गेल्या २४ तासांत इस्लामपूरमध्ये हा दुसरा खून आहे. बुधवारी पहाटे वाघवाडी फाटा येथील चौकामध्ये सौरभ राजेंद्र केर्लेकर (वय ३० रा. माळगल्ली) याच्यावर बॅटने हल्ला करून खून करण्यात आला. या खूनप्रकरणी अरविंद उर्फ राघू साटम (वय ३२ रा. शिवनगर) व किरण रामचंद्र सातपुते (वय ३५ मूळ गाव रेड, ता. शिराळा) या दोन संशयितांना पोलिसांनी मुंबईला पलायनाच्या प्रयत्नात असताना पेठ नाका येथे अटक केली. अनैतिक संबंधातून हा खून झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### वळसे डोंगरावर लागलेला वणवा आटोक्यात



**सातारा :**वळसे (ता. सातारा) येथील पुरातन महादेव मंदिर असलेल्या डोंगरावर अज्ञाताने वणवा लावला. वळसे येथील ग्रामस्थ व युवकांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी तातडीने वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. यानंतर वन विभागाचे कर्मचारी व गावातील १० ते १२ युवकांनी वणवा आटोक्यात आणून वनसंपदेचे नुकसान टाळले. वळसे येथील लगतच्या डोंगरावर महादेवाचे पुरातन मंदिर आहे. या डोंगरावर जानाई मळाई डोंगराच्या बाजूने अज्ञात व्यक्तीने सायंकाळी ५ च्या सुमारास आग लावली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले.

डोंगरावर वणवा लागल्याचे गावातील ग्रामस्थ महेंद्र कदम, नितीन कदम आणि चंद्रकांत उर्फ बाळा कदम, विपुल कदम, ऋतुराज गोडसे, प्रथमेश कदम, तेजस कदम, पार्थ कदम, गणेश कदम, विघ्नेश सुतार, राज कदम, मयूर निंबाळकर, सुरज जाधव, स्वप्नील चव्हाण आदी युवकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ वनरक्षक अभिजित कुंभार यांच्याशी सपंर्क करून त्यांना पाचारण केले. कुंभार व त्यांचे कर्मचारी वणवा आटोक्यात आणण्यासाठीचे आवश्यक साहित्य घेऊन घटनास्थळी दाखल झाले.वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि युवकांनी डोंगरावर धाव घेऊन अथक परिश्रम घेत वणवा आटोक्यात आणला.

## केंद्राच्या तूर खरेदीकडे शेतकऱ्यांची पाठ; उद्दिष्टे १३.२२ लाख टन, खरेदी ३.९२ लाख टनांचीच

मुंबई , दि. २५ वृत्तसंस्था



तुरीची हमीभावाने खरेदी करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्टे फसले आहे. हमीभाव ७ हजार ५५० रुपये, तर बाजारभाव सरासरी ७ हजार रुपये प्रति क्विंटल आहे. शेतकरी हमीभावाने विक्री करण्याऐवजी खासगी बाजारात तूर विकत आहेत. केंद्राने एकूण १३.२२ लाख टन तूर खरेदीचे उद्दिष्टे दिले आहे. पण, २२ एप्रिलपर्यंत जेमतेम ३.९२ लाख टन तूर खरेदी झाली आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, कडधान्य आणि डाळींच्या बाबत आत्मनिर्भर होण्यासाठी आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाची हमी देण्यासाठी देशात उत्पादीत होणारी तूर, उडीद आणि मसूराची शंभर टक्के खरेदी करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगाणा आणि उत्तर प्रदेश या प्रमुख कडधान्य उत्पादक राज्यांत हमीभावाने खरेदी सुरू झाली आहे.केंद्राने एकूण १३.२२ लाख टन तूर खरेदीला मंजुरी दिली आहे. आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत हमीभावाने खरेदी सुरू आहे.

**राज्यात नोंदणीला मुदतवाढ**

राज्यात नाफेड, एनसीसीएफच्या खरेदी प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. ३ लाख ९५ हजार ९९८ टन नाफेड, तर १ लाख १४ हजार ५७२ टन एनसीसीएफ, असे एकूण पाच लाख टन टनांहून जास्त खरेदी झाली आहे. खरेदीचे उद्दिष्टे पूर्ण न झाल्यामुळे तूर नोंदणीला ३० एप्रिलपर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे, अशी माहिती पणन मंडळाकडून देण्यात आली. केंद्र सरकार सुमारे दहा लाख टन तुरीचा संरक्षित साठा करते. सध्या तुरीची आयात सरासरी ६५०० रुपयाने होत आहे.

## भारतीय जवान मदन जाधव यांना वीरमरण, कण्हेरखेड येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

सातारा , दि. २५ वृत्तसंस्था



मुंबई येथील भारतीय नौदलाच्या ब्रह्मपुत्र करंजा उरण या तळावर नेमणुकीस असलेले रडार प्लॉटर मदन दत्ताजी जाधव (कण्हेरखेड, ता. कोरेगाव) यांना कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले. त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व मुलगी असा परिवार आहे.

कण्हेरखेड येथील शेतकरी कुटुंबाची त्यांना पार्श्वभूमी आहे.

भारतीय नौदलामध्ये उत्कृष्ट सेवा बजावत असताना त्यांना पदोन्नती मिळत गेली. सध्या ते उरण येथे लीडिंग सिमॅन रडार प्लॉटर या पदावर कार्यरत होते. येत्या काही महिन्यांत ते निवृत्त होणार होते. मुंबई येथे कर्तव्य बजावत असताना त्यांना प्रकृतीचा त्रास जाणवू लागला. त्यांना तत्काळ कुलाबा येथील एका रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

त्यांना वीरमरण आल्याची माहिती समजताच कण्हेरखेडमध्ये शोककळा पसरली. जागोजागी श्रद्धांजलीचे फलक लावण्यात आले होते. मुंबई येथून पार्थिव दुपारी कण्हेरखेड येथे आल्यानंतर ते निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. त्यानंतर सजवलेल्या वाहनातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली.

प्रशासनाच्या वतीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, पंचायत समितीच्या प्रशासक तथा गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, रहिमतपूरचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

सातारा जिल्हा पोलीस दलातर्फे बंदुकीच्या फैरी हवेत झाडून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर कुटुंबातील सदस्यांनी अंत्यसंस्कार केले. भारतीय नौदलाचे उरण मुंबई येथील अधिकारी व जवान या वेळी उपस्थित होते.

## मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

मुंबई , दि. २५ प्रतिनिधी

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन



केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## ५७ जणांनी चार तासांपूर्वीच सोडले होते पहलगाम

**मंचर:** काश्मीरमधील पहलगाम येथे दोन दिवसांपूर्वी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या चार तास अगोदर निघाल्याने आंबेगाव, जुन्नर, शिरूर या तालुक्यांतील ५७ पर्यटक बचावले. केवळ दैव बलवत्तर म्हणून आम्ही वाचलो, असे पर्यटनासाठी गेलेले मंचर येथील शरद बँकेचे वरिष्ठ व्यवस्थापक किसन शिंदे यांनी सांगितले.

शरद बँकेचे मुख्य व्यवस्थापक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर या तालुक्यांतील ५७ पर्यटक जम्मू-काश्मीर या ठिकाणी फिरण्यासाठी गेले होते. त्यामध्ये ७ लहान मुले, २८ पुरुष, २२ महिला असा एकूण ५७ जणांचा समावेश होता. सर्व पर्यटक रविवारी (दि. १३) जम्मू-काश्मीर येथे फिरण्यासाठी निघाले होते. ते जम्मू तावी झेलम ट्रेनने गेले.

प्रथम श्रीनगर येथे मुक्काम करून ट्युलिप गार्डन, सोनमर्ग, गुलमर्ग ही ठिकाणे केल्यानंतर सर्व पर्यटक शनिवारी (दि. १९) पहलगाम येथे फिरण्यासाठी गेले होते. त्यांनी तेथील आरू व्हॅली, बेताब व्हॅली आणि चंदनवारी येथील साइड सीन पाहून त्या दिवशी तेथे मुक्काम केला आणि दुसऱ्या दिवशी रविवारी (दि. २०) ते वैष्णोदेवी दर्शनास निघाले. ते निघाल्यानंतर चार तासांतच मागे दहशतवाद्यांनी हल्ला करत २८ हिंदू बांधवांचा जीव घेतला.

वैष्णोदेवी दर्शनासाठी जात असताना श्रीनगर ते कटरा हायवे दरड कोसळल्यामुळे बंद झाला होता. त्यामुळे या पर्यटकांनी मुघल रोड शोधला आणि जीव मुठीत धरून सर्व प्रवाशांनी ३२५ किलोमीटर अंतर पार करून वैष्णोदेवी गाठले.

## 'भाऊराव चव्हाण'च्या अध्यक्षपदी नरेन्द्र चव्हाण यांची निवड

नांदेड, दि. २५ वृत्तसंस्था



पुणे ही व्यावसायिक कर्मभूमी आणि मग हळद बेण्याच्या विक्री व्यवसायातून नांदेडजवळच्या भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जम बसविणारे उद्योजक नरेन्द्र भगवानराव चव्हाण उसाच्या मळ्यात गेल्यानंतर त्यांच्या गळ्यात या कारखान्याच्या अध्यक्षपदाची माळ घालण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात सहकार क्षेत्रातील एकमेव साखर निर्मिती उद्योग अशी ओळख सांगणाऱ्या या कारखान्यामध्ये आधी मोहनराव पाटील मुदखेडकर आणि त्यांच्यानंतर गणपतभाऊ तिडके या ग्रामीण आणि कृषी पार्श्वभूमीच्या मातीतील कार्यकर्त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर दिवंगत शंकरराव चव्हाण यांच्या घराण्यातील एक 'उद्योगी' व्यक्ती प्रथमच अध्यक्षपदी विराजमान झाली आहे.

माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वासह त्यांच्या संपूर्ण नियंत्रणाखाली चालणारा हा कारखाना प्रचंड कर्ज आणि तोट्याखाली चालला आहे. या कारखान्याचा सन २०२४-२५चा गाळप हंगाम सरल्यानंतर दीर्घकाळ अध्यक्ष राहिलेल्या तिडके यांनी अलीकडे अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन दैनंदिन कटकटींतून आपली सुटका करून घेतली. नंतर संचालक मंडळाने त्यांचा राजीनामा मंजूर केला आणि शुक्रवारी त्यांच्या रिक्त जागी चव्हाण घराण्याचा झेंडा नरेन्द्र यांनी फडकविला.अशोक चव्हाण यांच्या सौभाग्यवती काही काळ वरील कारखान्यात उपाध्यक्ष होत्या; पण तेव्हा एका प्रकरणात संचालक मंडळ अडचणीत येताच त्यांनी उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. नंतर अलीकडे याच परिवारातील नरेन्द्र चव्हाण उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत होते. त्यांना अध्यक्षपदी बसवून खा.चव्हाण यांनी कारखान्यातील एका सशक्त लॉबीला धक्का दिला आहे.

'भाऊराव चव्हाण'च्या नवीन अध्यक्षाच्या निवडीची प्रक्रिया साखर सह संचालक कार्यालयाचे अनुभवी अधिकारी विश्वास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बैठकीत जेमतेम पाऊण तासात पूर्ण झाली.

# मार खाणे हा आपला स्वभाव नाही, केंद्राकडून दमदार उत्तराची अपेक्षा

## पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत यांचे विधान

मुंबई , दि. २५ वृत्तसंस्था



द्वेष आणि शत्रुता हा आपला स्वभाव नाही. तसा, मार खाणे हादेखील आपला स्वभाव नाही, असे स्पष्टपणे बजावताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यामुळे देशवासीयांच्या मनात दु:ख आणि क्रोध असल्याचे सांगितले. त्याचवेळी केंद्र सरकारकडून दमदार उत्तराची अपेक्षा असल्याचे सांगतानाच ही अपेक्षा पूर्ण केली जाईल, असा विश्वासही वाटतो असे सांगितले.

विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात मंगेशकर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. ८३वा मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृतिदिन सोहळ्यानिमित्त चौथा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार उद्योजक कुमार मंगलम बिर्ला यांना प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते विविध क्षेत्रांसाठीचे मंगेशकर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी आपल्या भाषणात सरसंघचालक मोहन भागवत यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यावर थेट भाष्य केले. ते म्हणाले, ही लढाई पंथ, संप्रदायाची नसली तरी त्याला त्याचा आधार जरूर आहे. ही लढाई धर्म आणि अधर्माची आहे. आपला जवान कोणाला धर्म विचारून मारत नाही. पण, काल धर्म विचारून मारण्यात आले. या घटनेमुळे मनात दु:ख आहे, अंत:करण जड आहे. आमच्या मनात क्रोधही आहे. काही थोडे लोक सुधरायला तयार नसतात. रावणही बदलायला तयार नव्हता, त्यामुळे दुसरा उपायच नव्हता. रावण सुधरायला पाहिजे म्हणून रामाने त्याचा वध केला. त्यामुळे कालच्या घटनेमुळे जसा क्रोध आहे, तशा अपेक्षाही आहेत आणि अपेक्षा पूर्ण होतील, असा विश्वासही वाटतो, अशा शब्दांत मोहन भागवत यांनी एका अर्थाने दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्याची मागणी केली.

या प्रसंगामुळे भेद विसरून तात्पुरते एक झालो, ते एक होणे स्वभाव बनले पाहिजे. तसे झाले तर वाकडा डोळा करण्याची कोणाची हिंमत होणार नाही आणि कोणी वाकडे पाहिले तर डोळा फुटेल, असेही सरसंघचालक म्हणाले. त्याचवेळी द्वेष आणि शत्रुता हा आपला स्वभाव नाही. तसा मार खाणे हादेखील आपला स्वभाव नाही. शक्तिवान माणसाला अहिंसक असले पाहिजे. शक्तिहीनाला त्याची गरज नाही. जी शक्ती आहे ती अशा प्रसंगात दिसली पाहिजे, असे सांगत सरसंघचालकांनी पहलगाम हल्ल्याला ठोस उत्तर मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

तर, कालचा हल्ला हा भ्याड नव्हता, तर अत्यंत विचारपूर्वक, नियोजन करून केलेला हल्ला होता. आपण भ्याड आहोत हे सिद्ध करण्यासाठीचा हल्ला होता. मात्र, भारतीयांना, हिंदूंना कोणी थांबवू शकत नाही. तुम्हाला गाडून पुढे जाणार, अशा भावना अभिनेता शरद पोंक्षे यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात हृदयनाथ मंगेशकर यांनी होय, आम्ही हिंदुत्ववादी आहोत, असे जाहीरपणे सांगितले.

तत्पूर्वी, श्रीमती एम राजन यांना संगीत सेवेसाठीचा मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार देण्यात आला. त्यासोबतच 'असेन मी नसेन मी' नाटकाला मोहन वाघ पुरस्कार, आरंभ सोसायटी फॉर स्पास्टिक अँड स्लो लर्नर्स संस्थेच्या अंबिका टाकळकर यांना आनंदमयी पुरस्कार, श्रीपाम सबनीस यांना साहित्य सेवेसाठी वाग्विलासिनी पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय, अभिनेते शरद पोंक्षे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि रिवा राठोड यांना नाट्य आणि चित्रपट क्षेत्रासाठीचे मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### आम्ही घाबरणार नाही

यावेळी मंगेशकर पुरस्कारप्राप्त अभिनेता सुनिल शेट्टी यांनी आपल्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी हा हल्ला झाल्याचे म्हटले. मात्र, आम्ही कधी घाबरलो नाही आणि घाबरणार नाही. आमची संस्कृती सर्वांचा सन्मान करते. पण, तशीच वेळ आली तर निर्णयही करते, हे दहशतवाद्यांना दाखवून द्यायला हवे. त्यासाठी यावर्षी सुट्टीत काश्मिरात जाऊ, असे आवाहन केले.

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## जैसी करणी वैसी भरणी

काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याने भारताच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या जम्मूपासून ते तळाशी असलेल्या कन्याकुमारीपर्यंत असणाऱ्या प्रत्येक भारतीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी भारतीयांच्या हाताच्या मुठी आवळल्या जात आहेत. प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये या हल्ल्याप्रती सूडाची भावना जागरुक झाली असून पाकिस्तानी दहशतवादाला ठेचून काढण्याची भाषा उघडपणे बोलली जाऊ लागली आहे. भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा धर्म विचारून झाला आहे. दहशतवाद्यांनी पंतप्रधान मोदींचे नाव घेत, त्यांना निरोप द्या, असे सांगत निर्ढावल्याप्रमाणे भारतीय भूमीवर गोळीबार केला आहे. भारताच्या विरोधात भारताच्या भूमीवर येऊन केलेला बेछूट गोळीबार हे भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला दिलेले एक प्रकारचे आव्हान आहे. या पर्यटकांमध्ये मृत्युमुखी पडलेले काही पर्यटक, तर नवीन विवाह झालेले असून भारताच्या स्वर्गभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये हनीमूनसाठी गेले होते. आपला मुलगा नवसंसाराची सुरुवात करण्यासाठी काश्मीरला जातो काय आणि दहशतवादी हल्ला करून त्याचे पार्थिव घरी येते काय, जी नववधू घरातून गेली होती, तीच नववधू विधवा बनून घरात परतते काय, हा सर्वच संतापजनक प्रकार आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चारदिवसीय भारत दौऱ्यावर आले होते, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर गेले होते. हे सर्व पूर्वनियोजित होते. अचानक घडलेले नाही. जाणीवपूर्वक घडवून आणले गेले आहे. अर्थात त्यासाठी पूर्वतयारीही जोरदार करण्यात आली होती. हा हल्ला पाकिस्ताननेच घडवून आणला आहे, हे उजेडात आले आहे. सरकारने लवकरात लवकर कारवाई करून या घटनेचा बदला घ्यावा, यासाठी केंद्र सरकारवरही भारतीयांचा दबाव वाढत चालला आहे. भारत सरकारनेदेखील त्यादृष्टीने पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याने पाकिस्तानला नजीकच्या काळात पहलगाम हल्ल्याची जबरी किंमत मोजावी लागणार असल्याचे संकेत विविध घडामोडींतून व बैठकांतून प्राप्त होऊ लागले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ पहलगामकडे धाव घेत मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांची भेट घेतली. तेथील सुरक्षा यंत्रणांकडून घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पंतप्रधान मोदी हे जरी त्यावेळी सौदी अरेबियात असले तरी त्यांनी अमित शहा यांना निर्देश देत तपशीलवार आढावा जाणून घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही लष्कराच्या तीनही दलांची बैठक घेऊन कोणत्याही क्षणी काही घडण्याची शक्यता लक्षात घेऊन तीनही दलांना अलर्ट राहण्याचे निर्देश दिले. पंतप्रधान मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट टाकून भारतात परतले. भारतात परतताना त्यांनी पाकिस्तानी हद्दीचा वापर न करता पाकिस्तानला सूचक इशारा देण्याचे कार्यही कृतीतून केले आहे. पंतप्रधानांनी भारतात येत तातडीची बैठक घेतली. लष्कर आणि संबंधित विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पंतप्रधानांना यावेळी पूर्ण ब्रिफिंग करण्यात आले. त्यानंतर, अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानविरोधात ५ मोठे निर्णय घेत ५ तगडे धक्के पाकिस्तानला देण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या दिल्ली दूतावासातील कर्मचाऱ्यांची कपात करण्यास सांगताना पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे, तसेच भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या आनुषंगाने देखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली असून आजच्या बैठकीतील निर्णयाचा दूरगामी परिणाम भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर होणार आहे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी भारतवासीयांकडून करण्यात येत आहे. घडलेली घटना भारतासाठी क्लेषदायी असून अमेरिकेचे उपाध्यक्ष भारतात असताना हा हल्ला घडवून भारतात आलबेल नसल्याचे पाकिस्तानने दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दहशतवाद ठेचून काढला जाईल, दहशतवादाला माफी नसल्याचा इशारा भारताने दिला आहे. भारतानेही पाकिस्तानचा हिशोब कायमचाच चुकता करावा, पुन्हा असे करण्याचे धाडस पाकिस्तानचे होता कामा नये, असा सूर भारतीयांकडून उघडपणे आळविला जात आहे. देशाच्या शत्रूंनी केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडी-फार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे.

## स्ट्राईक





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

तो सिंधू जलवाटप करार
भारताने रद्द केला अखेर
तपासणी केंद्रही केले बंद
त्या अटारी-वाघा सीमेवर

भारताचा त्या पाकवर
कायदेशीर हा स्ट्राईक
उतरले सारे काश्मीर
रस्त्यावर करीत स्ट्राईक

अनेकांची गोड स्वप्ने भंगली
दहशतवाद्यांच्या हल्ल्यात
मात्र प्राणांची बाजी लावली
काहींनी भारतीयांच्या रक्षणात

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



दुःखाचे बनवू
टाळ नी मृदुंग ।
सुखाचे अभंग
नित्य गावू ॥

हाती द्यावे काम
हक्काचेच मोल ।
कर्म अनमोल
गरजूंना ॥

मोह आणि माया
आहे मृगजळ ।
अवीट नितळ
समाधान ॥

आचरण जसे
तसा तो दिसतो ।
जगती मिळतो
तसा मान ॥

# ऋतुराज येत रानी!



चिंतन

रवींद्र जवादे
९४२०७०८०२६



चांदीचा पाऊस कधीचाच थांबलेला. समृद्धी ल्यालेलं देखणं हिरवेपण हळुहळू कमी होत चाललेलं. थंडीचा मवाळ गारवा हलकेच निघून जातोय दूरदेशी! कोवळ्या उन्हाचे नाजूक दिवस संपू पाहातात. पाखरांच्या डोळ्यात उदास रंगाचं अनोखं आभाळ उतरलेलं. वाटेवरचं श्यामल हिरवं गवत, करडं पिवळसर झालेलं. हळूहळू ऊन तापू लागते. शुष्कतेचा म्लान वावर चराचरात वाढू लागतो. दूरवर गेलेल्या वाटा अनोख्या उदासीनं दाटून येतात. गावं-शिवारंही काजळून गेलेली....

एवढ्यात आंब्याच्या दाट फांदीआडचा काळासा कोकीळ नादावतो कुहूऽऽ च्या आनंदमय स्वरानं. त्याच्या स्वरभिजला अनोखा आवाज फिरवतोय् रानभर द्वाही, ऋतुराज वसंत आल्याची! कोकीळ गात बसतोय् नादावून अन् वसंत आपल्या जादुचं अद्भुत लावण्य भेट देऊ लागतो चराचराला ! आंबा मोहरून आलेला. त्याच्या आभाळव्यापू पाहाणाऱ्या गोल आकारांच्या फांदी-फांदीवर, पानांच्या सोबतीनं इवलाली शुभ्र फुलं मोहरून आलेली! त्यांचा अनोखा मधाळ, हळवा गंध रानभर झालेला. झाडाखालचा परिसर आंबेफुलांच्या वेडावलेल्या गंधानं भारून जातो. झाडाच्या दाट सावलीला मोहोरगंधाची साथ मिळालेली! मधमाशा पिंगा घालू लागलेल्या...

हळूहळू मोहोर फुलातून इवल्याशा चुटूकदार कैऱ्या डोकावू लागतात. आंब्याच्या फांदी-फांदीतून छोटुल्या कैऱ्यांचं हिरवं देखणं नवल झाडभर झालेलं. कैऱ्या वाढत राहातात. एका वेगळ्याच आनंदात ! कैऱ्याच्या पाळतीवर असलेले रानपोपट मग एके दिवशी झाडाच्या भेटीला येतात. पोपटांचा हिरवा थवा झाडभर होतो. कैऱ्यांच्या गळाभेटीत, पोपट कैऱ्यांना हलकेच टिपून घेतात. झाडावर पोपटांचा आनंद कल्लोळ उठलेला... पोपट, वाढणाऱ्या कैऱ्यांना टिपत राहातात अधून-मधून आगळ्याच अदेनं !

दरम्यान कैऱ्याचं वाढणारं देखणं रूपडं पाहून रानभर हुंदडणारी उनाड माकड, आंब्याच्या मायाळू झाडावर डेरेदाखल झालेली। हिरव्या कैऱ्यांची अनोखी मेजवाणी माकडांना भावलेली... माकडं कैऱ्या लुचू लागलेली. झाडाखाली कैऱ्या पडू लागलेल्या. कैऱ्यांना हिरव्या गंधाळ ओढीनं... रानातली हरणं नि रानडुकरं घेतात धाव आबेवनाकडे... माकडांनी झाडांवर उच्छाद मांडलेला ! वसंताच्या स्वर्णीम भेटीचं वरदान लाभलेला आंबा मग मोहोरत राहातो कैऱ्या पाडाच्या होईपर्यंत ! उतरून घेतल्या जाईपर्यंत ! सकाळच्या कोवळ्याशा ऊनात गाव सोडलेली गुरं रानभर होतात. गुरांच्या गळ्यातल्या घंटा राहून राहून निनादू लागतात. टेकडीच्या उभट उतारावर गुरं चरू लागतात तल्लीन होऊन... छोटाली अर्धहिरवी झुडपं वा वाळलेलं गवत गुराचा चारा होऊ पाहातं.

गुराखी लवलवत्या ऊन्हात झाडांच्या गार सावलीचा आधार शोधत राहातो. चरणाऱ्या गुरांचे हंबरस्वर मग वाऱ्याच्या सोबतीनं फिरू लागतात रानभर !

झाडांच्या फांदीत विसावलेली पाखरं, गुरांच्या मनभावन सोबतीनं आनंदून गेलेली! गुरं चरत-चरत फिरत राहातात, अवेळी सुकत चाललेल्या ओढ्याच्या काठानं... पाण्याची ओढ त्यांना बोलावून नेते... दरम्यान दुपार होत आलेली ! उन्हाच्या टोकदार झळा रानभर झालेल्या... पाणी पिलेली गुरं विसावतात एखाद्या झाडाच्या डेरेदार सावलीत ! वसंत रानोमाळ झालेला ! नजर जाईल तिथपर्यंत रानात पळस फुलून आलेले !.. रंगहिन झालेलं चराचर पळसांच्या रक्तवर्णी फुलांनी न्हाऊन निघालेले ! पळसाचा देखणा रंगोत्सव रानात सुरू झालेला असतो. जर्द फुलांच्या बहरानं लालेलाल झालेला पळस बोलावतो फुलचुख्या पाखरांना पळसावर पाखरांचा मेळा भरलेला... परागाच्या ओढीन वेडावलेली पाखर, फुलांभोवती पिंगा घालतात, मग्न होतात. पाखरांचे कातर गहिरे भिजले स्वर रानभर घुमत राहातात. पाखरांच्या अनोख्या गोतावळ्यात पळस झुलत राहातो, फुलत राहातो! पळस फुलांचा भगवा सडा झाडाखाली शिंपडल्या गेलेला... फुलं भावणारी रानजनावरं मग येत राहातात फुलांच्या ओढीनं... एखादी गहिवरलेली रानवाट नेमकी हटकून जाते पळस फुले सांडलेल्या झाडाच्या निसरड्या बाजूनं... वाटेलाही पळसफुलांचा लळा लागलेला! उष्णतेचा भयाण धगीला कंटाळलेला एखादा मोठा सर्प मग, थंडाव्याच्या ओढीनं पळसफुले सांडलेल्या वाटेवरून सरपटू लागतो. त्याचं सावळ, काळ प्रचंड शरीर फुलांच्या सोबतीनं क्षणभर रंगाचं झालेलं... पळसावर बसलेली लाजाळू पाखरं सर्पाच्या ह्या दांडगाईनं क्षणभर गोंधळलेली! ती करतात चिमणगलका सर्पान, झाडाभोवती भिरभिरू नये म्हणून! साप समंजस निघून जातो, ओलेत्या नाल्याच्या थंड ओढीनं !

पळस फुलत राहातो... फुलांच्या जर्द रंगाला वेडावलेले मोर मग एखाद्या प्रमत्त दुपारी पळसावर विसावतात... लांडोरीही सोबतच झाडावर दाखल होतात. फुललेल्या पळसात राजबिंडे देखणे मोर अधिकच शोभीवंत झालेले ! मोर मुक्तपणे बसून राहातात पळसावर फुलांच्या रंगीत सोबतीनं... पळस, मोरांच्या ह्या अनोख्या जिव्हाळ्यानं भारावून जातो. बाजूला वाहात असलेली नदी कलकलत राहाते. तिच्या काठावर पाणी पिण्यासाठी आलेली लाजाळू हरणं अधीर होतात. डोहाच्या काठाशी असलेलं थोडंस पाणी अमृताचं झालेलं.. हरणांच्या देखा-देखी नीलगाय, तडसं नि झुडूपांच्या अदमास घेत थांबलेला बिबट्याही डोहावर दाखल होतो. त्याच्या अनाम भितीनं इतर प्राणी जंगलात दिसेनासे झालेले !

रानाच्या काठावर असलेली शेतं... उम्हाळून आलेली. सकाळच्या सुजाण प्रहरी शेतात नांगरणीचं काम चालू झालेलं... बैल ओढत राहातात ढेकळांना तुडवणारा नांगर नि त्यांना हाकणारा सावलीच्या ओढाळ शोधात हरवत राहातो अधून-मधून ! शेताच्या काळ्या मातीतली फणकटं धुऱ्यावर पडू लागतात... बाया उन्हाचा कवडट अदमास घेत उरकू पाहातात काम... पेटलेल्या फणकटांचा लाल ज्वाळ दरदरपर्यंत दिसत राहातो. काळ्या लागट धुराचे लोट आभाळभर होऊ पाहातात.

जवळच्या झुडूपात एकटच उभे असलेलं पांगाऱ्याचं झाड आता सळसळू लागलेलं... त्याच्या फांदी फांदीवर पाकळ्यांच्या अनोख्या पिवळट फुलांचे गेंद फुलू लागलेले. पानं झडून गेलेला पांगारा नखशिखांत फुलांनी डवरून जातो. पांगरा फुलण्याच्या गंधाळ वार्तेने, पाखरं झाडावर जमू पाहातात. पाखरांचा अनोखा गोतावळा सांभाळत पांगारा सळसळू लागतो फुलांच्या सोबतीनं ! सांजवात असताना, डोंगरमाथ्यावर वा पायथ्याशी, नाल्याच्या काठावर तर दूर रानोमाळ पानझळ झालेल्या झाडांवरची कोवळी नवी पालवी आनंदू लागते. उदासलेली झाडं अनोख्या बहरानं आनंदून जातात. झाडां-झाडांवर इवलाल्या हिरव्या रंगाचं तलमपण दाटून आलेलं. वाऱ्याच्या उनाड झुळकीवर झाडं डोलू लागतात. काजळलत असलेला वाटा, झाडांच्या सावळ सावलीत अधिकच व्याकुळ झालेल्या ! वसंताचा मधाळ सुवास, झाडा-फुलांतून दरवळू लागतो. संध्याकाळही मग रंगगंधाची होऊन जाते ! दुरातल्या रानात फुलून आलेली काटेसावर एक देखणा नजराना असतो ऋतुराजाचा ! काटेसावरीच्या कळ्या लागलेल्या फांद्यावर गुलाबी लाल फुलांचे मोठाले पेले फुलून येतात. मोठसं अवाढव्य झाड फुलांच्या देखण्याशा रंगात हरवून जातं. टपटपलेली फुलं झाडाच्या बुंधाशी पडून राहातात... वाळून जाईपर्यंत... काटेदार फांद्यावर फुलांच्या ओढीनं पाखरं बसू पाहातात. गेंदेदार फुलामधला मकरंद पाखरं टिपत राहातात टोकदार इवल्या चोचीनं! झाडावर संध्याकाळच्या उदास रंगात पाखरांचा अनोखा मेळा भरलेला ! गावातल्या एखाद्या मायाळू अंगणात चाफा फुलून येतो व बाजूलाच मोगराही दरवळू लागतो. शुभ्रशी इवलाली फुलं उगवून येऊ लागतात छोट्याशा फांद्यावर, मोगऱ्याचा दुधाळ मनभावन गंध अंगणभर झालेला ! अंगणकाठावर फुलू लागलेल्या निंबाच्या झाडावर इवलाशा निंबोळ्या दिसू लागतात. कडवट घमघमाट वाऱ्यावर घुमू लागतो... फांदीवर बांधलेल्या पाण्याच्या भांड्यात पाखरं दंगा करू लागलेली ! लाजाळूशी खार इकडून तिकडे फिरत बसते. ऋतुराज वसंत देत राहातो सृष्टीला इवल्या इवल्या भेटीतून रंगा-गंधाचं अनोखं लावण्यमय दान !

# प्रामाणिक राजकीय भूमिकेतून संयुक्त महाराष्ट्राची पायाभरणी..



मागोवा

अंकुश राऊत
मो. ७६२००९६६१७



भारत हा विविध धर्म, भाषा, आणि संस्कृतींनी नटलेला विशाल भूप्रदेश आहे. या विविधतेतील एकता टिकवण्यासाठी भारताने संघराज्य पद्धतीची आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाची लोकशाही रचना स्वीकारली. केंद्र आणि राज्य यांच्यातील अधिकारवाटप हे भारतीय संविधानाने स्पष्ट केले असले, तरी भारतीय संघराज्य केंद्राकेंद्रित असूनही भाषिक आणि सांस्कृतिक विविधता जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसते. ब्रिटीश कालखंडात प्रांतांची रचना ही शास्त्रीय आणि सामाजिक गरजांपेक्षा प्रशासनिक सोयीसाठी होती. स्वातंत्र्यानंतर मात्र भाषिक व सांस्कृतिक ओळखीच्या आधारे प्रांतांची पुनर्रचना करणे आवश्यक ठरले. हीच भूमिका संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या मागे होती. मराठी भाषिकांची सांस्कृतिक आणि राजकीय एकजूट घडवून आणण्याची ही एक ऐतिहासिक लढाई ठरली.

**संघर्षातून जन्मलेली चळवळ :** १६ ऑक्टोबर १९०५ रोजी लॉर्ड कर्झनने अमलात आणलेल्या बंगाल फाळणीला देशभरात विरोध झाला. या घटनेमुळे मातृभाषेच्या आधारावर जनतेची एकजूट होऊ शकते, याची जाणीव देशाला झाली. स्वातंत्र्यानंतर भारतात ११ प्रांत होते. परंतु संविधान लागू झाल्यानंतर भाषावार प्रांत रचनेची मागणी जोर धरू लागली. आंध्रप्रदेशमध्ये पोटी श्रीरामुलु यांच्या आमरण उपोषणातून ही मागणी निर्णायक ठरली आणि अखेरीस भाषावार प्रांत रचनेचा मार्ग मोकळा झाला.

महाराष्ट्रातील परिस्थितीही वेगळी नव्हती. मराठी भाषिक अनेक प्रांतांमध्ये विभागले गेले होतेमध्यप्रदेशातील वऱ्हाड, हैदराबादचा मराठवाडा, मुंबई प्रांत आणि कोकण हे भाग वेगवेगळ्या प्रशासकीय रचनेत होते. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी एकजुटीची गरज होती.

**संयुक्त महाराष्ट्र समिती आणि राजकीय समन्वय :** या पार्श्वभूमीवर संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली. कम्युनिस्ट, शेतकरी कामगार पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष, सोशलिस्ट, शेड्युल कास्ट फेडरेशन यांसारख्या पक्षांनी आपल्या वैचारिक मतभेद बाजूला ठेवून या समितीत सहभाग घेतला. आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, केशवराव जेधे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, दादासाहेब गायकवाड, अनंतराव टिळक, ना. ग. गोरे यांसारखे अनेक नेते या आंदोलनाचे अग्रणी झाले.

मुंबई प्रांतात गुजराथी आणि मराठी दोन्ही भाषिक होते. गुजराथी काँग्रेसचे नेते मोरारजी देसाई संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात होते. काँग्रेस पक्षाचा संमिश्र दृष्टिकोन आणि नेहरूंच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेल्या महाराष्ट्र काँग्रेसनेते यशवंतराव चव्हाण यांची भूमिका सुरुवातीला अस्पष्ट होती. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा शेड्युल कास्ट फेडरेशन पक्ष या चळवळीत सहभागी नव्हते. मात्र, १९५६ मध्ये आचार्य अत्रे आणि इतर प्रमुख नेत्यांनी बाबासाहेबांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट भूमिका घेत मराठी भाषिकांचा एकसंघ राज्य म्हणून संयुक्त महाराष्ट्र हा हवाच, असे ठाम मत मांडले.

**१९५७च्या निवडणुका आणि लोकमताचा कौल :** १९५७ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती आणि प्रजासमाजवादी पक्षाने जवळपास १०० जागा जिंकल्या. ही निवडणूक चळवळीला जनाधार मिळाल्याचा स्पष्ट पुरावा ठरली. गावोगावी जाऊन लोकांमध्ये प्रचार केला गेला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे.

मात्र, विधानसभेत काँग्रेसचे बहुमत असल्याने आणि मोरारजी देसाईंचा तीव्र विरोध असल्याने मुंबईचा प्रश्न रखडत राहिला. अखेरीस, पंडित नेहरूंच्या मतपरिवर्तनाने आणि यशवंतराव चव्हाणांच्या सहमतीने १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

**नागपूर करार आणि प्रादेशिक संभ्रम :** राज्यनिर्मितीच्या वेळी विदर्भ व मराठवाडा यांचे काही नेते या नव्या राज्यात सामील होण्यास साशंक होते. त्यांना विकासाच्या बाबतीत अन्याय होईल, अशी भीती होती. या शंका दूर करण्यासाठी नागपूर करार झाला, ज्यात विकासाच्या आश्वासनांसह नागपूरला उपराजधानीचा दर्जा देण्यात आला.

**आजच्या प्रश्नांकडे दृष्टिक्षेप :** आज संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस ६४ वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी विदर्भ-मराठवाडा यांचं मागासलेपण अद्याप कायम आहे. काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष वगळता इतर अनेक पक्ष कालौघात लुप्त झाले आहेत. आज प्रश्न असा आहे की, एकेकाळी स्वाभिमानासाठी आणि भाषिक एकात्मतेसाठी वैचारिक मतभेद बाजूला ठेवणारे पक्ष एका ध्येयासाठी एकत्र येऊ शकले, तर आज राज्याच्या प्रगतीसाठी तसे एकत्र का येत नाहीत? शेवटी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही केवळ भाषिक राज्य निर्मिती नव्हती, तर ती एका सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळीची परिणती होती या चळवळीत सहभाग घेतलेल्या नेत्यांच्या प्रामाणिक राजकीय भूमिकेमुळेच आज आपल्याला महाराष्ट्र राज्य मिळाले. आज गरज आहे त्याच त्या प्रामाणिक राजकारणाची, दूरदृष्टीची आणि एकात्म प्रयत्नांची.

# ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेपासून दुरच



स्पर्धा परीक्षा

प्रा. इस्माईलखान पठाण
वाशीम



आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे म्हणून सर्वच लोक असे म्हणतात की हे स्पर्धेचे युग आहे पूर्वीच्या काळात दहावी , बारावी किंवा पदवी प्राप्त असली तर त्याला सरकारी नोकरी सहज लागत असेल परंतु आता तसं नाही राहत आज जर सरकारी नोकरी पाहिजे असेल तर शिपाई पदापासून तर कलेक्टर या पदापर्यंत सर्वात स्पर्धा परीक्षा आहे याच परीक्षेच्या माध्यमातुन एक रुपयाही खर्च न करता नोकरी लागते हे मात्र नक्की आहे. नुकताच एम.पी.एस.सी.चा लिपिक या पदाचा निकाल जाहीर झाला असून बरेच विद्यार्थी ग्रामीण भागातील त्यात नोकरीवर लागले तर आपणही यामध्ये यश मिळवू शकता .परंतु स्पर्धा परीक्षेची तयारी जर आपण बारावी झाल्यानंतर केली तर किमान दोन वर्षात सरकारी नोकरी हमखास लागते परंतु स्पर्धा परीक्षा तयारी करत असताना सर्वात महत्त्वाचा हे आहे की त्या पोस्ट करिता अभ्यासक्रम पाहून अभ्यासाचे नियोजन करून अभ्यास केल्यास स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सरकारी नोकरीचे स्वप्न पूर्ण होते शिक्षक भरती , लिपिक ,पोलीस , ग्रामसेवक , आरोग्य सेवक , कृषी सेवक , शिपाई , पी.एस.आय., एस.टी.आय. असिस्टंट , तलाठी, वनरक्षक , कोर्ट शिपाई,कृषी अधिकारी ,समाज कल्याण अधिकारी , स्टेनोग्राफर इत्यादी सर्व जागा या स्पर्धा परीक्षेतून भरल्या जातात म्हणून आपल्या पाल्यांना पदवीत्तर पदवीच्या अगोदर स्पर्धा परीक्षेची माहिती द्यावी. जेणेकरून मुले योग्य मार्ग निवडून आपले सरकारी नोकरीचे स्वप्न पूर्ण करतील .स्पर्धा परीक्षेतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे सहनशीलता , आत्मविश्वास , प्रेरणा यांचे नियोजन करून अभ्यास केल्यास स्पर्धा परीक्षेत कोणत्याही पोस्टमध्ये विद्यार्थी यश मिळवू शकतो त्यामुळे अभ्यासात सातत्य ठेवून आपल्या लक्ष्यावर ठाम राहिलो तर त्याला सरकारी नोकरी मोफत लागू शकते .त्यामुळे स्पर्धा परीक्षेसाठी योग्य मार्गदर्शन लाभल्यास ग्रामीण भागातील मुले नक्कीच कलेक्टर या पदापर्यंत जाऊ शकतात फक्त सकारात्मक पद्धतीने अभ्यास करावा लागतो म्हणून स्पर्धा परीक्षा ही सरकारी नोकरीचा उत्तम अगदी सोपा मार्ग आहे यात सर्वांनी प्रयत्न करावे आणि आपले भविष्य घडवावे .संत तुकाराम महाराज यांनी आपणास सांगितले आहे की '' प्रयत्न करिता वाळूचे तेलही गळे '' म्हणून आपण जर सतत प्रयत्न केले तर यश निश्चितच मिळते कारण असाध्य ते करिता साध्य कारण तुका म्हणे अभ्यास म्हणून सतत हेच एकमेव यशाची गुरुकिल्ली आहे '' लक्ष न अपना ओझल होने पाये कदम से कदम मिलाकर चल कामयाबी तेरे कदम चुमेगी आज नही तो कल...

## लोकरंजन

# सोन्याची मागणी वाढतीच

अलीकडच्या दोन महिन्याच्या कालावधीत जरी जागतिक स्तरावर शेअर बाजारात वेगवगळ्या कारणांनी प्रचंड पडझड सुरु असली तरी त्याच तुलनेत सोन्याच्या भावात मात्र सातत्याने वाढ होताना दिसतेय. जागतिक स्तरावर सोन्याला बाजारात प्रचंड मागणी असल्यामुळेच सोन्याचा भाव हा दिवसेंदिवस वधारतो आहे. हा भाव सध्या प्रति तोळा १ लाखांच्या घरात गेलेला आहे. याच पार्श्वभूमीवर ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी कौन्सिल चे अध्यक्ष राजेश रोकडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**सोन्याचा भाव हा प्रचंड वधारतो आहे त्यामागचे कारण काय आहे?**

सोन्याचा भाव किरकोळ स्तरावर १ लाखाच्या वर जाऊन आल्यामुळे सोन्याच्या मागणीवर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. मात्र हा परिणाम तात्कालिक असून येत्या काळात सोन्याची मागणी वाढतीच राहणार आहे. मुंबईच्या सराफ बाजारात किरकोळ स्तरावर २४ करेट सोने प्रति १० ग्रॅम १ लाख १ हजार ३५० रुपयांना विकले गेले. २२ कॅरेट सोन्याचा भाव ९२ हजार ९०० रुपये राहिला. या पार्श्वभूमीवर सोन्याची मागणी कायम राहण्यासाठी तसेच ती वाढती राहण्यासाठी ३० एप्रिल ला येणारी अक्षय तृतीया कारणीभूत असणार आहे.

**मागील आर्थिक वर्षात सोन्याच्या आयाती बाबत काय स्थिती होती?**

आर्थिक वर्ष २०२३ आणि २०२४ मधील सोन्याच्या आयातीची आकडेवारी तपासायची म्हटली तर,२०२३ या वर्षात ७४१ टन सोने आयात केले गेले. २०२४ या यावर्षात ८०२ टन सोन्याची आयात झालेली आहे. त्याचवेळी सोन्याचा भाव हा २५ ते ३० टक्के अधिक होता. २०२४ यामध्ये सोन्याचा भाव सातत्याने बदलत राहिला आणि आता यंदाच्या वर्षी वाढत्या मागणीमुळे सोने १ लाखाच्या वर गेले आहे.

**भविष्यकाळात सोन्याच्या विक्री बाबत काय स्थिती असेल?**

ग्राहकाकडून सोने खरेदी करण्याला प्रचंड सकारात्मक प्रतिसाद असल्यामुळे भविष्यकाळात सोन्याच्या भावात अशीच वृद्धी होत राहणे अपेक्षित आहे .

# धार्मिक महत्व असलेले पंचवटी

नाशिक शहराला खूप मोठा इतिहास आहे नाशिक जिल्ह्याला महान पौराणिक पार्श्वभूमी आहे. भगवान राम आपल्या वनवासा दरम्यान पंचवटी येथे वास्तव्य करीत होते आणि त्यांनी आपल्या वनवासाचा बराच काळ इथे घातला. त्यानंतर अगस्ती ऋषी तपस्यासाठी नाशिकमध्ये राहिले होते , गोदावरी नदी चा उगम सुद्धा नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथुन उगम पावते. बारा ज्योतिर्लिंग पैकी एक त्र्यंबकेश्वर शिव मंदिर त्र्यंबक नाशिक येथेच आहे. नाशिक ला ऐतिहासिक वारसा सोबत नाशिक ने काही भारताला अनेक प्रसिद्ध व्यक्तीमत्व सुद्धा दिले आहेत. ज्यामध्ये वीर सावरकर, अनंत कान्हेरे, लोकमान्य टिळक, दादासाहेब पोतनीस, बाबूभाई राठी, व्ही.व्ही. शिरवाडकर आणि वसंत कानेटकर हि काही प्रसिद्ध नावे आहेत. नाशिकला मिनी महाराष्ट्र असेही म्हणतात, नाशिक ची ओळख सर्वात जास्त इथल्या धार्मिक पार्श्वभूमी वरून आहे, ह्या शहरातील महत्वाचे पर्यटन स्थळ जिथे तुम्ही नक्की भेट दिली पाहिजे.नाशिक शहरामध्ये मध्यभागी ठिकाणी पंचवटी हा परीसर आहे आणि हा गोदावरी नदीच्या डाव्यातीरावर आहे. इथेच सुप्रसिद्ध काळाराम मंदीर आहे, आणि त्याला काळाराम मंदिर जवळ ५ वटवृक्षांचा समुह आहे



हा समुह पाच वटवृक्षांपासून तयार झाला असल्या मुले ह्या परिसरास ' पंचवटी ' असे संबोधले जाते. ह्याचा अर्थ 'पंच' म्हणजे पाच व 'वटी' म्हणजे वडाचे झाड असा आहे.ह्या परिसरात आपल्याला खूप मंदिरे बघायला मिळतात काळाराम मंदिर, कपालेश्वर मंदिर, गंगा-गोदावरी मंदिर, सुंदर नारायण मंदिर, टाळकुटेश्वर मंदिर, निळकंठेश्वर मंदिर, गोराराम मंदिर, मुरलीधर मंदिर, तिळभांडेश्वर मंदिर, बालाजी मंदिर, सांडव्याची देवी मंदिर, विठ्ठलमंदिर, पाताळेश्वर मंदिर, नारोशंकर मंदिर, रामकुंड, दुतोंडया मारुती, कार्तिकस्वामी मंदिर, काटयामारुती मंदीर, पंचमुखी हनुमान मंदिर, भद्रकाली मंदिर, कपुरथळा स्मारक अशी अनेक मंदिरे पंचवटी व सभोवतालच्या परिसरामध्ये गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर आहेत.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 23




### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
कल, खास, गट, गत, जरा, डग, तात, तंट, तंत, तुला, धाक, नाक, नाला, नाभी, निरा, मय, मती, माल, माग, यम, रमा, रथ, रवि, लळा, वर, वन्य, शनि

**तीन अक्षरी**
अकड, अवैध, कणेर, कामना, कासव, गजरा, तराजू, तुलना, नाटक, प्रतिक, भासरा, लखन, विरक्त, सरल, स्वागत

**चार अक्षरी**
अवतार, करामत, कातरण, तासभर, तारामती, धवलता, निरामय, पारिजात, पारतंत्र्य, प्रतिशत, मळवट, मनगट, राज्यभार, वनामती, व्यतिरिक्त, शीघ्रकोपी, समाचार, सैरावैरा, संकोचणे

**पाच अक्षरी**
अभिवचन, कामचुकार, रावणराज्य

**अन्य अक्षरी**
वाचाळपंचविशी, स्वातंत्र्यसैनिक, सुस्वागतम, लाखलाखाचा, माणूस, व्यक्तिस्वातंत्र्यवाद

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 403



**आडवे संकेत :—**
1) आगत स्वागत, मानसन्मान
4) इंद्रपुरी, विदर्भातील एक प्रमुख शहर
7) पावसाची अत्यंत आतुरतेने वाट बघणारा एक पक्षी
9) नाश पालेला भाग, मरणोन्मुख अवस्था
10) शाश्वत, चिरकाल टिकणारे
11) वृक्ष, झाड
12) वणवा
13) जलमार्ग
15) लाक्षणिक अर्थाने एकमेकांची मने जुळणे
17) सुटी, परवानगी
18) चित्रपटांमधील मुख्य अभिनेता
19) जहाल नाही तो
20) जमिनीवर राहणारा
23) संत ज्ञानेश्वर माऊलीचा एक भाऊ
24) प्रत्येकी
25) निवास
26) ओढा, झोंक
27) मनातील कल्पना
29) आचारी,, स्वयंपाकी
31) उशीर, विलंब (उर्दू)
32) अब्रु, समाजातील मानसन्मान
34) परवानगी पत्र
36) पाऊल
37) उदक, पाणी
38) अरण्य, जंगल
40) संस्था, संयोग
42) सूर्योदयाची वेळ
43) पॅसिफिक महासागराचे आणखी एक नाव
47) गाढव
48) हवालदिल, काहीच उपाय नसलेला
49) उपभोक्ता, रमणारा
50) एक अत्यंत मोठा आणि सुस्त असा सर्पजातीतील प्राणी
53) चामट, वातड
54) कबूल न होणे
55) साखरेची चांचणी
56) पतन, नाश
57) जमिनीवरील कृत्रिम वायुने वातावरणातील हवा खराब होणे
59) कापसाची एकवीस पदरांची वळलेली वात
61) घाबरट (हिं,)
62) सैन्याला पुरविण्यात येणारा दाणागोटा
64) ऊस पिळून त्याचा रस काढणारे यंत्र
65) चापट किंवा मऊ पदार्थाचा आघात
67) नदीच्या दोन तीरांना जोडणारा पूल
69) काहीही कारण नसतांना
71) राखण करणारा
73) पाझर, रस, आर्द्रता
75) मदिरा, दारू
76) उन्मादित होणे, अहंकारी होणे
77) व्यवसायात होणारा लाभ
78) कपोल

**उभी संकेत :—**
1) आपल्या मतदार संघाचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणारा नेता
2) दार, दाराची फळी
3) एकोपा
4) ज्याला मातापिता नाही असा तो
5) अभिप्राय, विचार
6) रानात मिळणारे फळफळावळ
7) सुंदर, रमणीय
8) कीर्तन कथा करणारा
10) नीरस, बेचव
11) कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेणारा
13) अंत:पूर, राणीवसा
14) एका पदार्थाची दुसऱ्याशी असलेली तद्रुपता
16) घराच्या खाली जमिनीच्या आत असलेली खोली
19) बुद्धी, मन, विचार, हेतू
21) वाईट सवय, दुर्गुण
22) अस्थिर, हलणारे
23) सुवर्णकार
24) चूक, अपराध
28) हजामत
30) या सरपटणाऱ्या प्राण्याला शेतकऱ्यांचा मित्र समजले जाते
31) देवपूजेसाठी असलेली घरातील खोली
32) आदेश, हुकूम
33) सांपत्तिक सामर्थ्य, योग्यता
35) गृहप्रवेशापूर्वी घराची केलेली विधिवत पूजा
37) ऋण मानणे, धन्यवाद
38) राजाची बायको
39) विडीचा झुरका
40) कॉम्प्युटर (मराठी)
41) नाराज होणे
42) निराशहोणे
42) अतिशय तापदायक
43) उघड, अवतरणे
44) बनावटी, लवकर तुटणारे
45) फुलांची मोठी माळ
46) झुंज, लढाई
48) ग्रंथाच्या शेवटी असलेला संक्षिप्त सारांश
50) हळूवार, स्पर्श न होता
51) श्रीगणेशाचा जन्मदिवस
52) कावळा
53) ऊस पिळून त्याचा रस काढल्यावर उरणारा भाग
55) पाप, अधर्म
57) अध्याय, खंड
58) क्रिकेटमध्ये फलंदाजाने मारलेला सहा धावांचा टोला
60) दिवस 63) सागर
66) कमळ 68) काव्य, कविता
69) खुप, विपूल 70) पराग कण, धूळ
72) माफी 74) जंगल, रान
75) घाण, मळ (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आजचा दिवस चांगला जाईल. आज तुम्ही नवीन कामे आयोजित कराल. व्यावसायिक आणि व्यावसायिकांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभ:** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. संपूर्ण दिवस प्रियजन, नातेवाईक आणि मित्रांसोबत सामाजिक कार्य करण्यात जाईल.

**मिथून :** आज तुमचा दिवस मध्यम फलदायी राहील. घरात आणि व्यवसायात सावधगिरी बाळगा. तुमचे आरोग्य चांगले राहील परंतु तुमच्या जोडीदाराच्या आरोग्याची काळजी तुम्हाला असेल.

**कर्क :** जर तुम्ही आज थंड मनाने काम केले तर तुमच्या सर्व समस्या सुटतील. तुमचे मन आणि वाणी गोड ठेवा. तुम्ही काही नवीन काम सुरू करू शकता. आज तुम्हाला आर्थिक फायदा होऊ शकतो.

**सिंह :** आज तुमच्या कामात प्रगती होईल, परंतु तरीही तुमच्या मनात अस्थिरता राहील. तुमच्या स्वतःच्या लोकांकडून तुम्हाला अपेक्षित पाठिंबा मिळणार नाही.

**कन्या :** आज स्वत:वर थोडे नियंत्रण ठेवा आणि वादविवाद आणि भांडणांपासून दूर रहा. आज खर्च जास्त होईल. आज वाहनात अडचण येण्याची शक्यता आहे.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी भाग्यशाली आहे. घरात आनंद आणि शांतीचे वातावरण असेल आणि मनही आनंदी राहील. आनंददायी घटना घडतील.

**वृश्चिक :** आज जर तुम्ही पैशांशी संबंधित कोणतीही योजना आखत असाल किंवा कोणत्याही योजनेत गुंतलेले असाल तर काळजीपूर्वक पुढे जा.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी आहे. अनावश्यक खर्चावर आळा घाला. तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवल्याने कुटुंबात आनंद आणि शांती राहील.

**मकर :** आजचा दिवस शुभ आहे. नोकरी किंवा व्यवसायात तुम्हाला यश मिळेल आणि वरिष्ठ अधिकारी आनंदी होतील. ज्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल. व्यवसायात संग्रहातून पैसे मिळतील.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. तुम्हाला नफ्याच्या नवीन संधी मिळतील. नोकरी करणाऱ्या आणि व्यावसायिकांसाठी आजचा दिवस चांगला राहील.

**मीन :** आज तुमचे मन अस्वस्थ असेल. धार्मिक आणि सामाजिक कार्यात पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. नातेवाईक आणि मित्रांसोबत मतभेद होऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### हार्वर्डचा ट्रम्प प्रशासनाविरुद्ध कायदेशीर लढा

**नवी दिल्ली:** अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाने २.२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी रोखण्याच्या वारंवार धमक्या दिल्याबद्दल राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाविरुद्ध खटला दाखल केला आहे. एका इंग्रजी वर्तमानपत्रानुसार, विद्यापीठाचे अध्यक्ष ॲलन एम. गार्बर यांनी ट्रम्प प्रशासनावर अनावश्यक नियंत्रण स्थापित करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. हा आरोप करताना,''सरकारच्या या कृतीचे गंभीर आणि दीर्घकालीन परिणाम होतील'' असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.
डोनाल्ड ट्रम्प यांनी हार्वर्ड हे मूर्ख आणि द्वेष पसरवणाऱ्यांचे ठिकाण बनले आहे असा आरोप केला होता. हे विद्यापीठ डाव्या विचारसरणीचे गड असल्याचे म्हटले जाते. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी हार्वर्ड याठिकाणी इस्रायली हल्ल्यांविरुद्ध आणि गाझावरील दडपशाहीविरुद्ध मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. याविषयी ट्रम्प यांनी,''हे विद्यापीठ यहूदी-विरोधी भावना पसरवत आहे आणि मुस्लिमांबद्दल त्यांना सौम्य भावना आहे. विद्यापीठ प्रतिभेच्या आधारे प्रवेश देत नाही, असा आरोप केला होता. त्यामुळे त्यांनी हार्वर्डला निधी देणे थांबवण्याची धमकी दिली आहे.''एक यहूदी आणि एक अमेरिकन म्हणून, मला हे चांगले ठाऊक आहे की वाढत्या यहूदी-विरोधीतेबद्दल चिंता वैध आहेत,'' गार्बर यांनी त्यांच्या निवेदनात म्हटले आहे. ते म्हणाले की, ''आपण कोणाची नियुक्ती करतो आणि आपण काय शिकवतो यावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा सरकारने विद्यापीठाशी कायदेशीररित्या संवाद साधावा. मॅसॅच्युसेट्समधील फेडरल कोर्टात दाखल केलेल्या या खटल्यात ट्रम्प प्रशासनावर हार्वर्डमधील ''शैक्षणिक निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण'' मिळवण्यासाठी व्यापक हल्ला सुरू केल्याचा आरोप आहे.इंग्रजी वर्तमानपत्राने वृत्त दिले आहे की, ''त्यात अचानक निधी कपातीचा सामना करणाऱ्या इतर प्रमुख विद्यापीठांचाही उल्लेख आहे.''

### जगातील सर्वात मोठ्या अणुभेदकात लवकरच मोठा बदल

**जीनिव्हा :** जगातील सर्वात मोठ्या अणुभेदकाला म्हणजेच लार्ज हॅड्रॉन कोलायडर () ला लवकरच एक महत्त्वपूर्ण अपग्रेड मिळण्याची शक्यता आहे. स्वित्झर्लंड आणि फ्रान्सच्या सीमेवरील 'सर्न' या प्रयोगशाळेत लार्ज हॅड्रॉन कोलायडरची स्थापना दशकभरापूर्वी दोन मुख्य उद्दिष्टांसाठी करण्यात आली होती. पहिले उद्दिष्ट होते, हिग्ज बोसॉन या मूलकणाचे अस्तित्व सिद्ध करणे, जे १९६० च्या दशकात भाकीत करण्यात आले होते आणि जे स्टँडर्ड मॉडेल ऑफ पार्टिकल फिजिक्स या कणभौतिकीच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे. दुसरे उद्दिष्ट होते, नवीन कणांचा शोध घेणे. विशेषतः, असे कण जे स्टँडर्ड मॉडेलच्या पलीकडील भौतिकशास्त्रीय सिद्धांतांना समर्थन देऊ शकतील.
'एलएचसी'ने हिग्ज बोसॉनचा शोध घेण्यात यश मिळवले आणि २०१२ मध्ये 'सर्न' मधील शास्त्रज्ञांनी त्याचे अस्तित्व सिद्ध केले. मात्र, नवीन कणांचा शोध घेण्यात मात्र 'एलएचसी' ला फारसे यश आलेले नाही. गेल्या दशकभरात चाललेल्या शोध मोहिमांमध्ये स्टँडर्ड मॉडेलच्या पलीकडील कोणतेही नवीन कण आढळलेले नाहीत.

### चीनमध्ये सापडली सर्वात मोठी सोन्याची खाण

**बीजिंग :** एकीकडे जगात सोन्याच्या दराचा भडका उडाला असताना, पृथ्वीवरील आतापर्यंतची सर्वात मोठी सोन्याची खाण सापडली आहे. भारताचा सर्वात मोठा शत्रू असलेल्या देशात ही खाण सापडली आहे. या खाणीतील सोन्याचा साठा पाहून भूगर्भशास्त्रज्ञ अचंबित झाले आहेत. अलीकडेच भूगर्भ शास्त्रज्ञांना चीनमध्ये सोन्याचा मोठा साठा सापडला आहे. हा शोध अलीकडच्या इतिहासातील सर्वात मोठ्या सोन्याच्या शोधांपैकी एक मानला जात आहे. चीनला सापडलेल्या या जॅकपॉमुळे जगभरातील सोन्याच्या खाण क्षेत्रात मोठा बदल घडून येऊ शकतो. जगभरातील पर्यावरणवादी मात्र, या खाणींमुळे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाबद्दल चिंता व्यक्त करत आहेत.चीनमध्ये इतका मोठा सोन्याचा साठा सापडला आहे की, जर चीनच्या सात पिढ्यांना हवे असेल तर ते या खजिन्यावर जगू शकतात. मध्य चीनमधील हुनान प्रांतातील वांगू येथे हे प्रचंड अभयारण्य जमिनीखाली गाडले आहे. यात १००० मेट्रिक टनांपेक्षा जास्त सोने असल्याचा अंदाज आहे. त्याची किंमत सुमारे ७८अब्ज युरो किंवा ६०० अब्ज युआन आहे. हुनान प्रांताच्या भूगर्भीय सर्वेक्षण विभागाच्या मते, सुमारे २००० मीटर खोलीवर सोन्याचे ४० हून अधिक वेगवेगळे थर सापडले आहेत. या सुरुवातीच्या थरांमध्ये सुमारे ३०० टन सोने असल्याचे मानले जाते. पुढील शोधांमुळे आशा आणखी उंचावल्या आहेत. ३००० मीटर खोलीपर्यंत खोदकाम केल्यानंतर आणखी साठे आढळून आले आहेत. यामुळे एकूण अंदाजे प्रमाण १००० टनांपेक्षा जास्त झाले आहे.

# भारत-पाकिस्तानने संयम बाळगावा

## दहशतवादी हल्ल्यानंतर तणाव शिगेला; संयुक्त राष्ट्र महासचिवांचे आवाहन

**नवी दिल्ली, दि.२५** वृत्तसंस्था




जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी दोन्ही देशांना शांततेचा मार्ग स्वीकारत, जास्तीत जास्त संयम बाळगण्याचे स्पष्ट आवाहन केले आहे.२२ एप्रिल रोजी बैसरन व्हॅली, पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात किमान २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून, अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एक नेपाळी नागरिकही होता, तर इतर बहुतांश जण पर्यटक होते. या अमानुष हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली असून, भारताने त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध कडक भूमिका घेत सिंधू पाणी करार स्थगित करण्याची घोषणा केली आहे.संयुक्त राष्ट्रांचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक यांनी दिलेल्या माहितीनुसार, महासचिव गुटेरेस यांनी पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून, दोन्ही देशांनी कोणतीही उत्तेजक किंवा परिस्थिती चिघळवणारी कृती टाळावी, असे मत नोंदवले आहे. ''नागरिकांवर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत मान्य नाहीत,'' असे स्पष्ट करत महासचिवांनी शांतता आणि समन्वयाची गरज अधोरेखित केली. त्यांनी असेही नमूद केले की, भारत आणि पाकिस्तानमधील कोणताही वाद फक्त शांततामय संवादानेच सुटू शकतो, आणि त्यासाठी दोन्ही देशांनी परस्पर आदर, संयम आणि कूटनीतीचा मार्ग अवलंबावा.भारताने पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानला उत्तर देताना सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा इशारा दिला आहे. पाकिस्तानने याला तातडीने प्रतिक्रिया देत, ''हे पाऊल युद्धाला चिथावणी देणारे ठरेल,'' असा इशारा दिला. यावर संयुक्त राष्ट्रांनी पुन्हा एकदा संयम राखण्याचे आवाहन केले असून, तणाववाढीला कारणीभूत ठरणारी कोणतीही कारवाई टाळावी, असे स्पष्ट केले आहे.संयुक्त राष्ट्र महासभेचे ७९ वे अध्यक्ष फिलेमोन यांग यांनी हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी म्हटले की, ''ही घटना मानवतेच्या मूलभूत मूल्यांना हादरवणारी आहे.'
'संयुक्त राष्ट्रात आयोजित 'भविष्यातील डिजिटल नागरिकांचे सक्षमीकरण' या विशेष कार्यक्रमाच्या सुरुवातीला, केंद्रीय मंत्री जितिन प्रसाद, भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश, तसेच अनेक जागतिक नेत्यांनी पहलगाम हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला.
पी. हरीश म्हणाले की, ''या अमानुष हल्ल्यात झालेली जीवित आणि मालमत्तेची हानी ही अत्यंत दुर्दैवी असून, भारत याचा तीव्र निषेध करतो.''सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशावेळी संयुक्त राष्ट्रांनी दिलेले संयमाचे आणि संवादाचे आवाहन अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. दहशतवाद्यांच्या कारवायांनी शांततेवर घाला घातला असला तरी, प्रतिकार आणि संरक्षण याबरोबरच शांततापूर्ण मार्गाने विवाद मिटवणे हे जागतिक हितासाठी आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सूचनेचा कितपत परिणाम होतो हे येत्या काळात दिसून येईल, मात्र पहलगाममधील शहीद झालेल्या निष्पाप जीवांनी पुन्हा एकदा जागतिक नेतृत्वाला शांततेचा मार्ग शोधण्याची निकड अधोरेखित करून दिली आहे.

## थायलंडमध्ये भीषण विमान अपघात; ६ मृत्यू

**बँकॉक : दि.२५** वृत्तसंस्था



थायलंडमध्ये शुक्रवारी सकाळी झालेल्या एका भीषण विमान अपघाताने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. या दुर्घटनेत विमानातील सर्व सहा पोलिस अधिकाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना २५ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८:१५ वाजता घडली असून, हे पोलिस विमान पॅराशूट प्रशिक्षणासाठी चाचणी उड्डाणावर होते.अपघातग्रस्त विमान -६-४०० ट्विन ऑटर प्रकाराचे होते, जे रॉयल थाई पोलिसांच्या मालकीचे होते. हे विमान थायलंडच्या प्रसिद्ध हुआ हिन विमानतळाजवळील चा आम बीच परिसरात कोसळले. हे ठिकाण प्रचुआप खिरी खान प्रांतात असून, त्याच्या नयनरम्य समुद्रकिनाऱ्यांसाठी ओळखले जाते.रॉयल थाई पोलिसांचे प्रवक्ते पोल लेफ्टनंट जनरल आर्चायोन क्रैथोंग यांनी माध्यमांना माहिती देताना सांगितले की, हे विमान हुआ हिनच्या उत्तर दिशेला आठ किलोमीटर अंतरावर कोसळले. हे उड्डाण पॅराशूट प्रशिक्षणाआधीची चाचणी उड्डाण होते, परंतु काही क्षणातच हे उड्डाण भीषण अपघातात रूपांतरित झाले. दुर्दैव असे की, विमानातील सर्व ६ अधिकारी मृत्युमुखी पडले. थायलंडच्या १९१ आपत्कालीन केंद्राने देखील ही दुर्घटना अधिकृतरीत्या जाहीर केली आहे.या दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सध्या अपघाताची सखोल चौकशी सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आणि अन्य तांत्रिक उपकरणांची तपासणी केली जात आहे. अधिकृत सूत्रांनुसार, कोणतीही यांत्रिक बिघाड, हवामानातील अनुकूलता किंवा मानवी चूक यापैकी कोणतेही कारण संभाव्य असू शकते. थाई मीडिया बँकॉक पोस्टने दिलेल्या माहितीनुसार, हे अधिकारी आगामी ऑपरेशन्ससाठी अत्यंत महत्वाचे प्रशिक्षण घेत होते. त्यांची अचानक झालेली ही मृत्यूमुखी घातलेली घटना रॉयल थाई पोलिस दलासाठी मोठा आघात मानली जात आहे.या अपघातामुळे थायलंडमध्ये शोककळा पसरली आहे. सोशल मीडियावर नागरिकांनी आणि अधिकाऱ्यांनी मृत अधिकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. थाई पोलिस महासंचालकांनी या घटनेवर तीव्र शोक व्यक्त करत अपघाताच्या कारणांचा त्वरित शोध घेण्याचे आदेश दिले आहेत.हा अपघात थायलंडसारख्या देशातही विमान सुरक्षा आणि चाचणी प्रक्रियेच्या कठोर तपासणीची आवश्यकता अधोरेखित करतो. वरिष्ठ आणि प्रशिक्षित अधिकाऱ्यांचा असा मृत्यू संपूर्ण प्रशासनासाठी एक गंभीर इशारा मानला जात आहे. अपघाताचा तपशील हळूहळू समोर येत असून, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शासनाला तांत्रिक आणि मानवी पातळीवर कठोर उपाययोजना कराव्या लागतील.

## अतिरेक्यांशी झुंजताना दोन महिन्यात सहा जवान हुतात्मा



**उधमपूर : दि.२५** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर उधमपूरमध्ये सुरक्षा पथक आणि अतिरेकी यांच्यात चकमक झाली. या चकमकीत दुडू बसंतगड परिसरात सहाव्या पॅरा एसएफचे हवालदार झंटू अली शेख गंभीर जखमी झाले. रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. भारतीय सैन्याने त्यांच्या सर्वोच्च बलिदानाला सलामी दिली आहे. जीओसी आणि व्हाईट नाईट कॉर्प्सच्या सर्व रँकनी त्यांचे धाडस आणि शौर्य याचे सन्मानाने स्मरण केले आणि त्यांच्या स्मृतींन उजाळा दिला. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर सुरक्षा पथकांनी अतिरेक्यांना शोधण्यासाठी शोध मोहीम सुरू केली आहे. संपूर्ण जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांना शोधून ठार केले जात आहे. मागील दोन महिन्यात अतिरेक्यांविरुद्ध झालेल्या अकरा चकमकींमध्ये एकूण सहा जवान हुतात्मा झाले आहेत. सुरक्षा पथकांची अतिरेक्यांविरुद्धची मोहीम सुरू आहे आणि सुरू राहणार आहे.

## पाकिस्तान एलओसीवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे जमवू लागला



**नवी दिल्ली, दि.२५** वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यानंतर भारतानेपाकिस्तानचे पाणी बंद केले आहे. यामुळे पाकिस्तानने ही युद्धाचीच घोषणा असल्याचा दावा करत अधिकारासाठी लढणार असल्याचे जाहीर केले आहे. तसेच एलओसी मानणारा शिमला करारही निलंबित केला आहे. या हल्ल्याचा भारत बदला घेणार अशी भीती पाकिस्तानला सतावत आहे. यामुळे पाकिस्तानने रणगाडे, मिसाईल आदी शस्त्रास्त्रे सीमेवर पाठविण्यास सुरुवात केली आहे. एकप्रकारे पाकिस्तान युद्धाची तयारी करू लागला आहे. भारत पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. हल्ला करणारे दहशतवादी अद्याप सापडलेले नाहीत. पाचपैकी तीन भारतीय आहेत, तर दोन पाकिस्तानी आहेत. या सर्वांचा शोध घेतला जात आहे. २२ मार्चला हल्ला झाल्यानंतर काही वेळातच पाकिस्तानी हवाई क्षेत्रात पाकिस्तानी लढाऊ विमाने घिरट्या घालू लागली होती. ही त्यांची कृती नेहमीची नव्हती. तसेच भारतीय सीमेजवळून टेहळणी विमानही गेले होते. आता पाकिस्तान भारताच्या सीमेवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रे आणत असल्याचे समोर येत आहे. सोशल मीडियावर काही व्हिडीओ व्हायरल होऊ लागले आहेत. यामध्ये पाकिस्तानी सैन्य सीमेवर मोठ्या प्रमाणावर हालचाली करत आहे. दोन अतिरिक्त रेजिमेंट तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच टँक, चिलखती वाहने देखील मोठ्या संख्येने सीमेकडे नेली जात आहेत. लढाऊ विमाने कमी उंचीवरून उडण्याचा सराव करत आहेत. पाकिस्तानने तिकडे तयारी सुरु केलेली असताना भारतानेही तयारी सुरु केलेली आहे. हवाई दलाने राजस्थानमध्ये युद्धाभ्यास सुरु केला आहे. यामध्ये राफेल लढाऊ विमाने देखील सहभागी झाली आहेत. हवेतून सपाट जमिनीवर तसेच डोंगररागांमध्ये हल्ला करण्याचा अभ्यास सुरु करण्यात आला आहे. याचे नाव आक्रमण असे ठेवण्यात आले आहे. तसेच भारतीय सैन्याला सीमेवर अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

## पाकिस्तानकडून रात्रभर गोळीबार;भारताकडून चोख प्रत्युत्तर

**श्रीनगर : दि.२५** वृत्तसंस्था



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सीमेवर तणाव वाढला आहे. पहलगाम हल्ल्याच्या तीन दिवसांनंतर पाकिस्तानी सैन्याने रात्रभर नियंत्रण रेषेवरील () अनेक पाकिस्तानी चौक्यांवरून गोळीबार केला. पण या गोळीबाराला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले. या घटनेत भारताच्या बाजूने कोणीही जखमी अथवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.
''पाकिस्तानी सैन्याने सीमेवर रात्रभर गोळीबार केला. भारतीय जवानांनीही त्याला चोख प्रत्युत्तर दिले. यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही,'' अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे.फेब्रुवारी महिन्यातदेखील पाकिस्तानी सैन्याने पूंछ जिल्ह्यातील एलओसीवर भारतीय चौकीवर छोट्या शस्त्रांनी गोळीबार केला होता. त्याला भारताकडून चोख प्रत्युत्तर देण्यात आले होते.गुरुवारी उधमपूर जिल्ह्यात संयुक्त सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांत चकमक झाली होती.
यात विशेष दलाचा एक सैनिक शहीद झाला. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू केली आहे.दरम्यान, बांदीपोरा जिल्ह्यात आज शुक्रवारी सकाळी भारतीय सुरक्षा जवान आणि दहशतवाद्यांत चकमक सुरु झाली. दहशतवाद्यांच्या हालचालीबाबत मिळालेल्या गुप्तचर माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी संयुक्तरित्या बांदीपोरा येथील कुलनार अजस परिसरात शोध मोहीम सुरू केली. यादरम्यान लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्याला सुरक्षा जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. येथे चकमक सुरु आहे, अशी माहिती भारतीय सैन्याच्या चिनार कॉर्प्सने दिली आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, सध्याच्या घडीला जम्मू आणि काश्मीरमध्ये तब्बल ५८ दहशतवादी सक्रिय आहेत. यातील बहुतांश दहशतवादी 'लष्कर-ए-तोयबा'चे आहेत, अशी माहिती गृह मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत देण्यात आली.२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. यात २६ जणांचा मृत्यू झाला. तर १७ जण जखमी झाले होते. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तान हाय अलर्टवर आहेत.

## भारत- पाकिस्तान तणावादरम्यान बलुचिस्तानमध्ये बॉम्ब स्फोट

**नवी दिल्ली, दि.२५** वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावादरम्यान बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानी सैनिकांवर मोठा हल्ला झाला. बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथील मार्गट चेकपोस्टजवळ एका वाहनाजवळ झालेल्या बॉम्ब स्फोटात पाकिस्तानच्या चार सैनिकांचा मृत्यू झाला आहे. तर, तीन जण जखमी झाले आहेत. हा बॉम्ब स्फोट कोणी केला? हे समजू शकलेले नाही. परंतु, बलुच अतिरेक्यांनी हा बॉम्ब स्फोट केल्याचा दाट संशय आहे. अद्याप कोणीही या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. या हल्ल्यामुळे पाकिस्तानच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतासोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर असीम मुनीरसाठी एक नवीन आव्हान आहे.सुरक्षा सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, क्वेट्टा येथील मार्गट चेकपोस्टजवळ एका वाहनाजवळ बॉम्ब स्फोट झाला. या स्फोटात पाकिस्तानच्या चार निमलष्करी जवानांचा मृत्यू झाला. तर, तीन जण जखमी झाला. या स्फोटात शहजाद अमीन, अब्बास, खलील आणि जाहिद यांचा मृत्यू झाला. तर, जफर, फारूक आणि खुर्रम सलीम गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या हल्ल्यानंतर पाकिस्तानी सैनिक सर्तक झाले आणि त्यांनी परिसराला वेढा घातला. या हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी परिसरात शोध मोहीम राबवली जात आहे. अधिकाऱ्यांनी हल्लेखोरांना लवकरच पकडून शिक्षा करण्याचे आश्वासन दिले. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही संघटनेने स्वीकारली नसली तरी अलिकडच्या काही महिन्यांत बलुचिस्तानमध्ये हल्ले करणाऱ्या बलुच लिबरेशन आर्मीवर संशय व्यक्त केला जात आहे.याआधीही बलुचिस्तानमध्ये दहशतवादी हल्ले झाले आहेत.

## प्रत्येक पाकिस्तानी नागरिकावर १.४५ लाख रुपयांच्या कर्जाचे ओझे

**नवी दिल्ली, दि.२५** वृत्तसंस्था



पहलगाम येथे पर्यटकांवर पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी हल्ला केला. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढू लागला आहे. भारताने पाकिस्तानची राजकीय आणि आर्थिक कोंडी करायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानने भारताला उत्तर देण्याची धडपड सुरू केली आहे. गरज पडली तर सिमला करार मोडू अशी धमकी पाकिस्तानने दली आहे. यामुळे भारत पाकिस्तान यांच्यात लढाई होण्याची शक्यता वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या आर्थिक स्थितीची ताजी आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. या आकडेवारीनुसार प्रत्येक पाकिस्तानी नागरिकावर १.४५ लाख रुपयांच्या कर्जाचे ओझे आहे.पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय गंगाजळी आता फक्त १५.४३६ बिलियन डॉलर एवढीच उरली आहे. पाकिस्तानमध्ये 'रोटी' करण्यासाठीचा आटा (पीठ) भारताच्या तुलनेत दुपटीने महाग आहे. पाकिस्तानमध्ये पाच किलो आटा किमान ५६० रुपये दराने उपलब्ध आहे.
सध्या पाकिस्तानमध्ये तांदूळ २७५ रुपये किलो या दराने उपलब्ध आहे.
पाकिस्तानमध्ये चण्याची डाळ ५७५ रुपये किलो या दराने मिळत आहे. तसेच पाकिस्तानमध्ये साखर १८५ रुपये किलो आणि सफरचंद ५३० रुपये किलो दराने उपलब्ध आहे. पाकिस्तानमध्ये अनेक ठिकाणी टोमॅटो ८१ रुपये किलो दराने मिळत आहे.डिसेंबर २०२४ पर्यंत पाकिस्तानवरचे परकीय कर्ज १३१.१ बिलियन यूएस डॉलर वर पोहोचले. या कर्जाचा विचार करता प्रत्येक पाकिस्तानी नागरिकावर १.४५ लाख रुपयांच्या कर्जाचे ओझे आहे. पाकिस्तानने चीन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब आमिराती या तीन देशांकडून मोठे विदेशी कर्ज उचलले आहे. हे कमी म्हणून पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून ४.४ बिलियन यूएस डॉलरचे कर्ज घेतले आहे.
भरमसाठ कर्ज घेणाऱ्या पाकिस्तानने हप्ते फ ेडणे पण कठीण झाले आहे. वारंवार विनंती करुन पाकिस्तानने २०२४ मध्ये चीन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब आमिराती या तीन देशांकडून कर्जाच्या परतफेडीची मुदत एक वर्षाने वाढवून घेतली. हे करण्याच्या बदल्यात पाकिस्तानला अनेक अटी शर्तींचे पालन करण्याची तयारी दाखवावी लागली.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +1.104 |
| दिल्ली | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +0.657 |
| बेंगलुरु | 9 | 6 | 3 | 0 | 0 | 12 | +0.482 |
| मुंबई | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | +0.673 |
| पंजाब | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.177 |
| लखनौ | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | -0.054 |
| कोलकाता | 8 | 3 | 5 | 0 | 0 | 6 | +0.212 |
| राजस्थान | 9 | 2 | 7 | 0 | 0 | 4 | -0.625 |
| हैदराबाद | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.361 |
| चेन्नई | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.392 |

# आरसीबीचा 'चिन्नास्वामी'वर पहिला विजय

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेच्या ४२ व्या सामन्यात गुरुवारी (२४ एप्रिल) रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू-राजस्थान रॉयल्स या दोन रॉयल संघांतील लढतीत आरसीबीने राजस्थानला ११ धावांनी पराभूत केले. यंदाच्या हंगामातील हा बंगळूरचा होम ग्राऊंड एम. चिन्नास्वामी स्टेडियमवरील पहिला विजय आहे. याआधी या हंगामात या मैदानात झालेल्या तिन्ही सामन्यांत त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. तसेच बंगळूरचा हा ९ सामन्यांतील ६ वा विजयदेखील ठरला. त्यामुळे त्यांचे आता १२ गुण झाले असून,



त्यांनी पॉईंटस् टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. त्यांनी मुंबई इंडियन्सला चौथ्या क्रमांकावर ढकलले आहे. गुरुवारी झालेल्या सामन्यात बंगळूरने प्रथम फलंदाजी करताना राजस्थानसमोर २०६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानला २० षटकांत ९ बाद १९४ धावाच करता आल्या. बंगळूरकडून जोश हेझलवूडची गोलंदाजी सर्वोत्तम ठरली. बंगळूरसाठी तो विजयाचा हिरोही ठरला, त्याच्या शेवटच्या षटकांत सामना आरसीबीच्या बाजूने फिरला.राजस्थानकडून यशस्वी जैस्वाल आणि १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी यांनी सलामीला सुरुवात केली. जैस्वालने डावाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला. त्याच्यात आणि सूर्यवंशीमध्ये चांगली भागीदारी होत होती. त्यांनी अर्धशतकी भागीदारीही केली; पण ५ व्या षटकात सूर्यवंशीला भुवनेश्वर कुमारने बाद केले. सूर्यवंशीने १२ चेंडूंत २ षटकारांसह १६ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर जैस्वाल नितीश राणासह डाव पुढे नेत होता; पण त्याला अर्धशतकासाठी एकाच धावेची गरज असताना जोश हेझलवूडच्या गोलंदाजीवर तो रोमारियो शेफर्डच्या हातून झेलबाद झाला. त्याने तुफानी फलंदाजी करताना ७ चौकार आणि ३ षटकारांसह १९ चेंडूंत ४९ धावांची खेळी केली. तरी राजस्थानचा कर्णधार रियान परागने नंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येत आक्रमक फटके खेळत संघाची धावगती आणखी वाढवली होती. मात्र, त्याला फार काळ कृणाल पंड्याने टिकू दिले नाही. कृणालने १० व्या षटकात पहिल्याच चेंडूवर रियानला माघारी धाडले. नंतर नितीश राणाही १४ व्या षटकात बाद झाल्याने सामन्यात रोमांच आला होता.



## यशस्वी जैस्वालने रचला इतिहास!

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सला सलग पाच सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने राजस्थान संघाचा ११ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने २० षटकांत ५ गडी गमावून २०५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, राजस्थान संघाला ९ विकेट्स गमावल्यानंतर फक्त १९४ धावा करता आल्या. त्याच वेळी, यशस्वी जैस्वालने राजस्थानच्या डावाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारून मोठा पराक्रम केला आहे.यशस्वी जैस्वालने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा गोलंदाज भुवनेश्वर कुमारविरुद्ध पहिल्याच चेंडूवर लेग साईडवर शानदार षटकार मारला. यासह, यशस्वी जैस्वाल आयपीएल सामन्यात तीन वेगवेगळ्या संघाविरुद्ध पहिल्या चेंडूवर षटकार मारणारा पहिला खेळाडू बनला. इतर कोणत्याही फलंदाजाने ही कामगिरी एकापेक्षा जास्त वेळा केलेली नाही. आयपीएलमध्ये डावाच्या पहिल्या चेंडूवर आतापर्यंत आठ फलंदाजांनी षटकार मारण्याचा पराक्रम केला आहे.मात्र, यशस्वी जैस्वाल हा एकमेव असा खेळाडू आहे, ज्यांनी तीनदा असा पराक्रम केला आहे. या यादीत नमन ओझा, मयंक अग्रवाल, सुनील नरेन, विराट कोहली, रॉबिन उथप्पा, फिल सॉल्ट आणि प्रियांश आर्य यांचा समावेश आहे.



## कोहलीचा चिन्नास्वामी स्टेडियमवर ३५०० धावांचा 'विराट' पाऊस!

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा माजी कर्णधार आणि सलामीवीर फलंदाज विराट कोहलीने ( ) गुरुवारी (दि. २४) इतिहास रचला. आयपीएल २०२५ चा ४२ वा सामना राजस्थान रॉयल्स विरुद्ध बेंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात विराट कोहलीने एम चिन्नास्वामी स्टेडियमवर १४ धावा काढताच ३५०० धावा पूर्ण केल्या. तो एकाच मैदानावर ३५०० टी-२० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज बनला आहे. विराटने ४२ चेंडूत ७० धावांची खेळी केली. या डावात त्याने ८ चौकार आणि २ षटकारही मारले.बांगलादेशचा यष्टीरक्षक मुशफिकुर रहीम टी-२० मध्ये एकाच मैदानावर सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. त्याने शेर-ए-बांगला राष्ट्रीय स्टेडियमवर ३३७३ धावा केल्या आहेत. तिसऱ्या क्रमांकावर जेम्स विन्स आहे, ज्याने साउथहॅम्प्टनच्या द रोझ बाउलमध्ये ३२५३ धावा केल्या. यादीत चौथ्या क्रमांकावर ॲलेक्स हेल्स आहे. हेल्सने नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रिज येथे टी-२० मध्ये ३२४१ धावा केल्या आहेत. बांगलादेशचा तमीम इक्बाल या यादीत पाचव्या स्थानावर आहे. त्याने शेर-ए-बांगला राष्ट्रीय स्टेडियमवर ३२३८ धावा केल्या आहेत.कोहलीचे चिन्नास्वामी स्टेडियमशी नाते धावा आणि विक्रमांच्यापलीकडेचे आहे. ही निष्ठा आणि सातत्यावर आधारित प्रेमकथा आहे. आयपीएलच्या सुरुवातीपासून (२००८) प्रत्येक हंगामात एकाच फ्रँचायझीसाठी (आरसीबी) खेळणारा तो एकमेव खेळाडू आहे. आरसीबीच्या या स्टार खेळाडूने एम. चिन्नास्वामी या घरच्या मैदानावर अनेक संस्मरणीय खेळी साकारल्या आहेत. त्याने आयपीएलमधील ८ पैकी ४ शतके याच मैदानावर झळकवली आहेत.

## भारतात होणारी दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा पुढे ढकलली

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

पहलगाममध्ये मंगळवारी(दि.२२) झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जूनमध्ये भारतात होणारी दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. एवढेच नाहीतर, या स्पर्धेत पाकिस्तान खेळाडूंच्या प्रवेशावरही बंदी घातली जाऊ शकते.

यासंदर्भातील माहितीनुसार दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा येत्या जूनमध्ये भारतात खेळली जाणार होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भूतानचे खेळाडू रांचीला पोहोचले असून त्यांनी सरावही सुरू केला होता. आता ही स्पर्धा कोणत्या तारखेला आयोजित केली जाईल, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही. याआधी ही स्पर्धा ३ ते ५ मे दरम्यान खेळवली जाणार होती. परंतु, पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा मिळण्यास विलंब झाल्याने ही स्पर्धा पुढे ढकलण्यात आली.दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पाकिस्तानी खेळाडूंच्या प्रवेशावर बंदी घातली जाऊ शकते, अशी शक्यता आहे. पहलगाममधील हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून भारतात येण्यासाठी दिलेले सर्व व्हिसा रद्द करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाकिस्तानमधून एकूण ४३ खेळाडूंची नावे पाठवण्यात आली होती, ज्यामध्ये भालाफेकपटू अर्शद नदीमचे याच्याही नावाचा समावेश आहे.

## 'देशापेक्षा महत्त्वाचे काहीही नाही-नीरज चोप्रा

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशाला हादरा बसला आहे. सर्वच क्षेत्रातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. देशभर शोकाचे वातावरण आहे. भारत सरकारने यावर कारवाई करण्यास पाऊले उचलले आहेत. या हल्ल्यापूर्वी भारताचा स्टार ॲथलीट नीरज चोप्राकडून एनसी क्लासिक भालाफेक स्पर्धेसाठी पाकिस्तानचा भालाफेकपटू अर्शद नदीमला भारतात येण्याचे आमंत्रण देण्यात आले होते. परंतु, अर्शदने या स्पर्धेत येण्यास नकार दिला. नीरज चोप्राचे हे आमंत्रण त्याच्यावर ओझ वाटत होते.

त्याला अनेक द्वेषपूर्ण संदेशांना सामोरे जावे लागले आहे. अखेर आता नीरज चोप्राने यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.नीरज चोप्राने नुकतीच सोशल मीडियावर एक





पोस्ट पोस्ट केली आहे, ज्यामध्ये त्याने लिहिले आहे की, 'मी सहसा कमी बोलतो. पण याचा अर्थ असा नाही की मी जे चुकीचे आहे त्याविरुद्ध बोलणार नाही. विशेषतः जेव्हा आपल्या देशावरील प्रेम आणि माझ्या कुटुंबाच्या सन्मान आणि प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रश्न निर्माण होतो. अर्शद नदीमला नीरज चोप्रा क्लासिकमध्ये भाग घेण्यासाठी आमंत्रित करण्याच्या माझ्या निर्णयाबद्दल बरीच चर्चा सुरू झाली आहे आणि त्यातील बहुतेक द्वेष आणि शिव्याच आहेत.'चोप्रा स्पष्ट शब्दात बोलला की, देशापेक्षा काहीही एक महत्त्वाचे नाही आणि भारताच्या प्रतिष्ठेशी आणि सन्मानाशी कधीही तडजोड करणार नाही. त्यानंतर चोप्राने लिहिले की, त्यांनी माझ्या कुटुंबाला देखील त्यातून वगळले नाही. मी अर्शदला जे आमंत्रण दिले ते एका खेळाडूने दुसऱ्या खेळाडूला दिले होते. यामध्ये जास्त काही नाही, कमी काही नाही. एनसी क्लासिकचे उद्दिष्ट सर्वोत्तम खेळाडूंना भारतात घेऊन येणे आणि आपल्या देशाला जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे घर बनवणे आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या दोन दिवस आधी सोमवारी सर्व खेळाडूंना निमंत्रण पाठवले होते.गेल्या ४८ तासांत जे काही घडून गेले आहे. त्यानंतर, एनसी क्लासिकमध्ये अर्शदच्या उपस्थितीचा प्रश्नच उद्भवत नाही. माझा देश आणि त्याचे हित नेहमीच प्रथमस्थानी असेल.

## भारतात उभारणार कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लांट





**नवी दिल्ली :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड () आणि रिन्यूएबल्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी संपूर्ण भारतात कॉम्प्रेस्ड बायोगॅस () प्लांट उभारण्यासाठी संयुक्त उपक्रम करारावर स्वाक्षरी केली आहे. बीपीसीएलचे संचालक संजय खन्ना आणि राज कुमार दुबे यांच्या उपस्थितीत बीपीसीएलचे प्रमुख (कॉर्पोरेट स्ट्रॅटेजी) समीत पै आणि जीपीएस रिन्यूएबल्सचे सीईओ आणि सह-संस्थापक मैनाक चक्रवर्ती यांनी संयुक्त उपक्रम करारावर स्वाक्षरी केली.या संयुक्त उपक्रमाद्वारे बिहार, ओडिशा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये ८-१० सीबीजी प्लांट विकसित केले जातील. कृषी बायोमासची उपलब्धता आणि बीपीसीएलच्या शहरी गॅस वितरण कव्हरेजच्या आधारे ही ठिकाणे निवडण्यात आली.या उपक्रमाचा उद्देश कचऱ्यापासून ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय कचऱ्याचे सीबीजीमध्ये रूपांतर करणे आहे. या उपक्रमाचा उद्देश कचऱ्याच्या व्यवस्थापनाला पाठिंबा देणे, हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे आणि कृषी अवशेष खरेदीद्वारे ग्रामीण उत्पन्न निर्माण करणे आहे. हे संयुक्त उपक्रम गोबार्धन, सॅटॅट आणि सीबीजी ब्लेंडिंग ऑब्लिगेशन सारख्या राष्ट्रीय कार्यक्रमांशी सुसंगत आहे.हवामान वचनबद्धता आणि ऊर्जा सुरक्षा उद्दिष्टांमुळे भारताची स्वच्छ ऊर्जेच्या पर्यायांची मागणी वाढत आहे. या बदलात कॉम्प्रेस्ड बायोगॅस () हा एक महत्त्वाचा घटक म्हणून उदयास येत आहे, जो वाहतूक आणि उद्योगात पारंपारिक इंधनांसाठी अक्षय पर्याय प्रदान करतो. भारत सरकारच्या शाश्वत पर्यायी परवडणाऱ्या वाहतुकीकडे () उपक्रमांतर्गत, देशभरात ५,००० हून अधिक प्लांट स्थापित करण्याचे लक्ष्य आहे.

# जागतिक बँकेने भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज केला कमी

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

फिच रेटिंग्ज आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया () नंतर आता जागतिक बँकेने भारताच्या आर्थिक विकास दराचा अंदाज कमी केला आहे. जागतिक आर्थिक कमकुवतपणा आणि धोरणात्मक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेने बुधवारी चालू आर्थिक वर्षासाठी (२०२५-२६) भारताचा विकासदर ०.४ टक्क्याने कमी करून ६.३ टक्के केला.जगभरात सुरू असलेल्या व्यापार युद्धामुळे आणि अनेक देशांमधील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक आर्थिक वाढीचा वेग मंदावला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचा भारतावरही परिणाम होण्याची अपेक्षा आहे. जागतिक बँकेने त्यांच्या मागील अंदाजात २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.७ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. जागतिक बँकेने आपल्या द्वैवार्षिक प्रादेशिक दृष्टिकोनात म्हटले आहे की, आर्थिक वर्ष २४-२५ मध्ये भारतातील वाढ निराशाजनक होईल कारण खाजगी गुंतवणूक हळूहळू वाढली आणि सार्वजनिक भांडवली खर्च सरकारी उद्दिष्टे पूर्ण करण्यात अयशस्वी झाला. जागतिक बँकेच्या अलीकडील अहवाल 'साउथ एशिया डेव्हलपमेंट अपडेट टॅक्सिंग टाईम्स' नुसार, भारताचा आर्थिक



विकास दर आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६.५ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ६.३ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता आहे. याचे मुख्य कारण म्हणजे रेपो दरात कपात आणि नियामक सरलीकरणामुळे खाजगी गुंतवणुकीला चालना मिळू शकते, परंतु जागतिक आर्थिक मंदी आणि धोरणात्मक अनिश्चिततेमुळे हा फायदा मर्यादित असू शकतो.

जागतिक बँकेच्या अहवालात असेही म्हटले आहे की कर कपातीमुळे खाजगी वापराला चालना मिळेल, तर सार्वजनिक गुंतवणूक योजनांच्या चांगल्या अंमलबजावणीमुळे सरकारी गुंतवणूक वाढेल. तथापि, व्यापार धोरणांमधील बदल आणि जागतिक विकासातील मंदीमुळे भारताच्या निर्यात क्षेत्राला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. शिवाय, जागतिक आर्थिक अनिश्चिततेमुळे दक्षिण आशियाच्या आर्थिक शक्यता देखील कमकुवत झाल्या आहेत आणि बहुतेक देशांसाठी वाढीचा अंदाज कमी करण्यात आला आहे, असे अहवालात नमूद केले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने () मंगळवारी भारताच्या वाढीचा अंदाज कमी केला. जानेवारीमध्ये अंदाजित ६.५ टक्के व्याजदर आता चालू आर्थिक वर्षासाठी ६.२ टक्के करण्यात आला आहे. फिच रेटिंग्जने चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) वाढीचा अंदाज ६.४ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. आर्थिक घडामोडींमध्ये मंदी असताना, आरबीआयने मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठीचा विकासदराचा अंदाज ७.२ टक्क्यांवरून ६.६ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.

## पाकिस्तानातही सोन्याचा भाव गगनाला भिडला; १० ग्रॅमचा दर ३ लाखांच्या पुढे

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

भारतातच नव्हे, तर शेजारील पाकिस्तानातही सोन्याच्या किंमतींनी उच्चांक गाठला आहे. पाकिस्तानातील सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याने नवा विक्रम रचला असून, १० ग्रॅम सोन्याची किंमत ३,३४,३७० पाकिस्तानी रुपयांवर पोहोचली आहे. यामुळे बाजारात खळबळ उडाली असून, सामान्य नागरिकांसाठी सोने खरेदी करणे अवघड झाले आहे.वैश्विक बाजारातील सोन्याची वाढती मागणी, आर्थिक अनिश्चितता आणि केंद्रीय बँकांकडून सोन्याची खरेदी यामुळे किंमतींनी उसळी घेतली आहे. याशिवाय, पाकिस्तानी रुपयाची घसरण आणि वाढती महागाई यामुळेही सोन्याचे भाव वाढले आहेत.कराची, लाहोर आणि इस्लामाबादसारख्या शहरांमधील सराफा बाजारात सोन्याच्या किंमतींनी



खरेदीदार आणि गुंतवणूकदारांना धक्का दिला आहे. लग्नाच्या हंगामात सोन्याच्या दागिन्यांची मागणी वाढली असताना, या किंमती सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लावत आहेत. मात्र, काही गुंतवणूकदार सोन्याला सुरक्षित पर्याय मानत आहेत.जागतिक पातळीवरही सोन्याच्या किंमतींनी विक्रम मोडले आहेत.

## राजकीय तणावाचे बाजारात पडसाद; सेन्सेक्स घसरून बंद

नवी दिल्ली : दि. २५ प्रतिनिधी

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेला भू-राजकीय तणाव, कार्पोरेट कंपन्यांची अपेक्षेपेक्षा कमी कमाई आदी घटकांमुळे गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतलाय. परिणामी, आज शुक्रवारी सलग दुसऱ्या सत्रात भारतीय शेअर बाजार घसरला.आजच्या सत्रात सेन्सेक्स सुमारे १,१०० अंकांनी घसरला. तर निफ्टी ५० निर्देशांक २३,९०० पर्यंत खाली आला. त्यानंतर दोन्ही निर्देशांक काही प्रमाणात सावरले. सेन्सेक्स ५८८ अंकांनी घसरून ७९,२१२ वर बंद झाला. निफ्टी २०७ अंकांनी घसरून २४,०३९ वर स्थिरावला.१३ क्षेत्रीय निर्देशांकांपैकी १२ निर्देशांक लाल



रंगात बंद झाले. फार्मा, मेटल आणि ऑटो शेअर्समध्ये अधिक घसरण दिसून आली. तर आयटी निर्देशांकाची कामगिरी राहिली. बीएसई मिडकॅप २.४ टक्के आणि स्मॉलकॅप २.५ टक्के घसरला.बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २५ एप्रिल रोजी ८.८ लाख कोटींनी कमी होऊन ४२०.८३ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले. २४ एप्रिल रोजी बाजार भांडवल ४२९.६३ लाख कोटी रुपयांवर होते. याचाच अर्थ गुंतवणूकदारांच्या कमाईत आज ८.८ लाख कोटी रुपयांची घट झाली.पहलगाम दहशतवादी हल्ल्यात ( ) २६ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा जोखीम टाळण्याकडे कल दिसून आला. तसेच काही प्रमाणात प्रॉफिट बुकिंग झाल्याने बाजारात घसरण झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.आज बँकिंग आणि फायनान्सियल शेअर्समध्ये अधिक घसरण झाली. सेन्सेक्सवर अदानी पोर्ट्सचा शेअर्स ३.६ टक्के घसरला. ॲक्सिस बँक, , बजाज फिनसर्व्ह, पॉवर ग्रिड, बजाज फायनान्स, टाटा मोटर्स, टाटा स्टील, एनटीपीसी, मारुती, एसबीआय, भारती एअरटेल हे शेअर्सही १ ते ३.५ टक्क्यांपर्यंत घसरले. तर टीसीएस, इन्फोसिस, टेक महिंद्रा हे शेअर्स तेजीत राहिले.बँकिंग शेअर्सवर सलग तिसऱ्या दिवशी दबाव राहिला. गेल्या तीन दिवसांत निफ्टी बँक २ टक्केहून अधिक खाली आला आहे. २३ एप्रिल रोजी बँक निफ्टीने ५६ हजारांच्या अंकाला स्पर्श करुन नवा उच्चांक नोंदवला होता.




अजिंक्य भारत
आपला विदर्भ



अकोला, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५




# थोडक्यात

## जिल्ह्यात 'हिवताप जनजागृती महिना' व जागतिक हिवताप दिन विविध उपक्रमांनी साजरा

**अकोला :** २५ एप्रिल 'जागतिक हिवताप दिना'निमित्त एकाच दिवशी जनजागृती करणे पुरेसे नाही, या विचाराने संपूर्ण एप्रिल महिना (१ ते ३० एप्रिल) 'हिवताप जनजागृती महिना' म्हणून अकोला जिल्ह्यात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जात आहे. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास निर्मूलनासाठी आरोग्य सेवक, सहाय्यक, पर्यवेक्षक व आशा वर्कर्स यांच्या मदतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत. यात डास अळी व जलद ताप सर्वेक्षण, ॲबेटींग, टाक्यांवर संरक्षक जाळी बसवणे, गप्पी मासे सोडणे आणि आरोग्य शिक्षणद्वारे जनजागृती यांचा समावेश आहे.जागतिक हिवताप दिनाचे औचित्य साधून जिल्हा हिवताप कार्यालय, अकोला येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय डॉ. भंडारी, उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ होते. तसेच सहायक संचालक (हिवताप) अकोला व जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अतुल बी. शंकरवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आली. कार्यक्रमास सर्व कर्मचारी उपस्थित होते.२०३० पर्यंत भारत हिवतापमुक्त करण्याचे केंद्र शासनाचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर, रांगोळ्या, गटसभा यांसारख्या माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. परिसराची स्वच्छता, पाणी साठ्यांना झाकणे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे, मच्छरदाणीचा वापर, व भंगाराची विल्हेवाट ही प्रभावी उपाययोजना आहेत. हिवतापाची लक्षणे दिसल्यास तात्काळ आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी व उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले.

## अपात्र ग्रामपंचायत सदस्याला,अमरावती अपर आयुक्तांकडून स्थगिती

**अकोट :** तालुक्यातील आसेगाव बाजार गट ग्रामपंचायत सदस्या सौ. मंजुषा उमेश धांडे ( मंजुषा भीमराव गवई ) यांना अकोला जिल्हाधिकारी यांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे, अकोट तालुक्यातील सदस्य / सरपंच यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येत असून त्यांना ग्रामपंचायत सदस्य सरपंच राहण्यास निरहँ ठरवण्यात येत असल्याचा आदेश २०.१.२०२५ रोजी पारित करण्यात आला असून त्यांना अपात्र करण्यात आले होते. अकोला जिल्हाधिकारी यांचे आदेशाविरुद्ध अपर आयुक्त अमरावती त्यांच्याकडे गट ग्रामपंचायत आसेगाव बाजार येथील सदस्या मंजुषा उमेश धांडे यांनी अपील दाखल केले होते. अपर आयुक्त,अमरावती यांनी २२/०४/२०२५ रोजी अंतरिम आदेश पारित केला. जिल्हाधिकारी अकोला यांचे प्रकरण क्रमांक /अकोट/ २/ २०२५ यामधील पारित आदेश २० /१ / २०२५ मधील अनुक्रमांक १७ च्या होणाऱ्या कार्यवाहीस महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम १६ (२) अन्वये दाखल प्रकरणाचे पुढील सुनावणी दिनांक ०५/०६/२०२५ पर्यंत ''जैसे थे' चा आदेश देण्यात आला आहे.

आसेगाव बाजार गट ग्रामपंचायत सदस्या सौ मंजुषा उमेश धांडे यांना अपर आयुक्त, अमरावती यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे थोडासा दिलासा मिळाला आहे.

## आजपासून संस्कृती संस्कार शिबिराचे आयोजन

**अकोला :** श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती गायत्री नगर, कौलखेड व वंडर किड्स फ्री स्कूल आरोग्य नगर, कौलखेड रोड, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीच्या प्रचंड प्रतिसादामुळे याही वर्षी सहा ते अठरा वर्ष वयोगटातील मुला-मुली करिता दिनांक २६ एप्रिल ते दहा मे २०२५ दरम्यान सकाळी ६.३० ते ११.३० दरम्यान अध्यात्म, विज्ञान आणि संस्कृती असा त्रिवेणी संगम म्हणजेच संस्कृती संस्कार शिबिराचे आयोजन गायत्री मंदिर सभागृह गायत्री नगर कौलखेड रोड अकोला येथे करण्यात आले आहे. या शिबिराचा शुभारंभ आज सकाळी ८.३० वाजता ह भ प प्रशांत महाराज ताकोते, ह भ प शिवाजी महाराज मानकर, व ह भ प मनोहर महाराज डुकरे यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी परिसरातील नागरिक व समितीचे सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. समितीच्या वतीने संत तुकाराम महाराजांच्या बीजेच्या पर्वावर भव्य दिव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते. असाच एक नवीन उपक्रम म्हणजे आजच्या पिढीमध्ये असणारे टीव्ही, मोबाईल व पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण दूर सारत त्यांना भारतीय परंपरा, संस्कृती संस्कार तसेच सामाजिक बांधिलकीची शिकवण देण्यासाठीचा एक विशेष प्रयत्न व त्यावर भर. शिबिराकरिता शहरातून चांगलाच प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत १०० चे वर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शिबिरामध्ये हरिपाठ, पावल्या, टाळ- मृदंग, गायन, संस्कृत श्लोक, अभंग, बासरी वादन, विविध विषयांवर व्याख्याने, पक्षी निरीक्षण, निसर्ग भ्रमंती, सूर्यनमस्कार, योग, प्राणायाम, लेझीम, लाठीकाठी, धनुर्विद्या, शिवकालीन युद्ध कला, साहसी व मनोरंजक खेळ व इतरही बरेच पाठ विद्यार्थ्यांकडून घेतले जाणार असून दिनांक १० मे रोजी लेखी व तोंडी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# नायब तहसीलदाराला जीवे मारण्याची धमकी ; आरोपींवर मोक्काची मागणी

## महसूल विभाग आक्रमक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ :** पातूर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार बळीराम चव्हाण यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपींविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महसूल प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने जिल्हाधिकारी अकोला यांना निवेदन सादर करत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

२१ एप्रिल रोजी बळीराम चव्हाण यांनी अवैध वाळू माफियांविरुद्ध केलेल्या कारवाईनंतर, चिडलेल्या आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी, जातीय शिवीगाळ आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. यावेळी त्यांच्या सोबत असलेल्या शासकीय वाहनचालक मुजाहीद यांनाही मारहाण झाली. इतकेच नव्हे, तर आरोपींनी शासकीय वाहन जाळण्याची धमकी दिल्याने कार्यालयात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

या प्रकरणातील आरोपी अरविंद पाटील, सचिन निमकाळे आणि इतर तिघे अद्याप फरार असून, / अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल असतानाही पोलिसांकडून अटक झालेली नाही. यामुळे महसूल कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना अधिकच तीव्र झाली आहे.संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्याम धनमने, पातूर तहसीलदार डॉ. राहुल वानखेडे आणि स.म.अ. अभय राठोड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात, आरोपींविरोधात मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची स्पष्ट मागणी केली आहे.या प्रकरणी पोलीस प्रशासनाकडून तात्काळ कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> पातूर येथील नायब तहसीलदार आणि वाहनचालकांवर झालेला हल्ला अतिशय गंभीर आहे. वाळू माफियांचा प्रशासनावर असलेला दबाव धक्कादायक असून, आरोपींना मोक्का अंतर्गत अटक करून कडक शासन करणे आवश्यक आहे. प्रशासनाची सक्षमता आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा टिकवण्यासाठी अशा घटनांना कठोर उत्तर देणे गरजेचे आहे.
>
> **डॉ. राहुल वानखेडे,**
> तहसीलदार पातूर

# आरटीई प्रवेश : ११६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दुसऱ्या प्रतीक्षा यादीत निवड झालेल्या २२८ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आणखी एक संधी देत प्रवेशाची मुदत १५ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली होती.या प्रक्रियेअंतर्गत २२८ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात आली, त्यापैकी केवळ ११६ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला असून ११२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. बालकांचा मोफत आणि शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार, अल्पसंख्याक शाळा वगळता मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता १ मधील किंवा पूर्व प्राथमिक वर्गातील वंचित, दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत जिल्ह्यातील १९१ खाजगी विनाअनुदानित शाळांमधील १९९२ रिक्त जागांसाठी ऑनलाईन सोडतीद्वारे १९६८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना १० मार्चपर्यंत प्रवेशासाठी शेवटची संधी देण्यात आली होती. निर्धारित वेळेपर्यंत १४०४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. तर सोडतीद्वारे निवड झालेल्या ५६४ विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसापर्यंत प्रवेश मिळाला नसल्याने आता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली आहे. आरटीई अंतर्गत ५२५ विद्यार्थ्यांना पहिल्या प्रतीक्षा यादीत

# पातुर तालुक्यातील खेट्री सरपंचाचा केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातुर, दि. २५ :** पातुर पंचायत समिती अंतर्गत खेट्री ग्राम पंचायतचे सरपंच जहुर खान यांचा दिल्लीत जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते २२ एप्रिल रोजी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, राष्ट्रीय पंचायत दिनानिमित्त २२ एप्रिल रोजी दिल्ली येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये देशभरातील सरपंचांनी सहभाग नोंदविला होता. खेट्री येथे क्षयरोग मुक्त गाव , महिला बचत गट उपक्रम




### राष्ट्रीय पंचायत दिनानिमित्त दिल्लीत कार्यक्रम

राबविणे, स्वच्छता मोहीम, दलित वस्ती काँक्रीट रस्ते बांधकाम, समशानभूमी व कब्रस्तान मध्ये लाईट लावणे, आदी कामाबाबत सरपंच जहुर खान यांनी सरपंच संवाद ॲपवर माहिती टाकल्याने राज्यातून एकमेव अल्पसंख्याक स्टार सरपंच म्हणून त्याची निवड झाली, आणि त्यांना दिल्ली येथे कार्यक्रमात आमंत्रण देऊन बोलावले, तेथे त्यांना जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले, त्यामुळे त्यांचे गावासह जिल्ह्यात कौतुक होत आहे.

> **सरपंचाच्या कामाची घेतली केंद्राने दखल !**
>
> गाव स्तरावर शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम राबविण्यासाठी सरपंच जहुर खान यांनी पुढाकार घेतल्याने त्यांच्या कामाची केंद्राने दखल घेऊन त्यांना दिल्ली येथे केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# चिंचोली संगम पुलाची उंची वाढणार

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिली मंजुरी, रिपब्लिकन युवा सेनेच्या पाठपुराव्याला यश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २५ :** तालुक्यातील चिंचोली (संगम) येथील नाल्यावरील पुलाची उंची वाढवण्याच्या ग्रामस्थांच्या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला अखेर यश आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या पुलाची उंची ५० फुटांपर्यंत वाढवण्याच्या कामास मंजुरी देण्याचे तातडीचे आदेश सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ यांना दिले आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ही विशेष दखल घेण्यात आली.

चिंचोली (संगम) गावाला कयाधू आणि पैनगंगा या नद्यांचा वेढा असल्याने वारंवार पूरस्थिती निर्माण होते. त्यातच गावातील नाल्यावरील पुलाची उंची कमी असल्याने पाण्याची पातळी वाढल्यास गावचा संपर्क तुटतो आणि रहदारीचे मार्ग बंद होतात. यामुळे अनेकदा वित्त व जीवितहानीच्या घटनाही घडल्या आहेत. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन रिपब्लिकन युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मागील काही वर्षांपासून पुलाची उंची वाढवून ५० फूट करण्यास मंजुरी मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. यासाठी सामाजिक बांधकाम विभाग उमरखेड, पुसद, यवतमाळ मंडळ आणि अमरावती प्रादेशिक विभागाकडे अनेकदा मागणी करण्यात आली. मात्र, संबंधित विभागांकडून वेळकाढूपणा होत असल्याने, रिपब्लिकन युवा सेनेने हा विषय राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर तसेच यवतमाळचे नवनियुक्त जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिला. पाठपुराव्याचे गांभीर्य आणि मागणीची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम मंडळाला तातडीने पूल मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यास सांगितले. या पाठपुराव्यावेळी रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पाटील चिंचोलकर, तालुकाध्यक्ष गौतम नवसागरे, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, तालुका उपाध्यक्ष राजू आगीरे, तालुका कार्याध्यक्ष साहेबराव कदम, तालुका सचिव विनोद इंगोले यांच्यासह चिंचोली (संगम) येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निर्णयामुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# उमरखेड तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## ४५ जागा महिलांसाठी राखीव, तहसील कार्यालयात सोडत संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २५ :** तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींसाठी २०२५-३० कालावधीकरिता सरपंच पदाचे आरक्षण तहसील कार्यालयात जाहीर झाले. बुधवार (दि. २३) रोजी झालेल्या या सोडतीत ४५ पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली. एससी, एसटी, नामाप्र व सर्वसाधारण प्रवर्गांचे आरक्षण निश्चित झाल्याने अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला.

आगामी २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी उमरखेड तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया बुधवार, २३ एप्रिल रोजी येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व आरक्षण धोरणाचा आधार घेऊन ही सोडत काढण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, तहसीलदार राजेश सुरडकर, सचिन फटाले, बोधगिरे, प्रदीप सोयाम यांच्यासह महसूल अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींचे पदाधिकारी व गाव पुढारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोडतीनुसार एकूण ९२ पैकी ४५ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले आहे.

प्रवर्गनिहाय आरक्षणात अनुसूचित जाती महिला (९): दहागाव, पळशी, कोपरा (खु.), सोईट (म.), कुपटी, तिवरंग, खरूस (बु.), बिटरगाव (खु.), हातला. अनुसूचित जाती खुले (९): सुकळी, मन्याळी, सावळेश्वर, हरदडा, लोहरा, विडुळ, डोंगरगाव, चिंचोली (स.), वानेगाव. अनुसूचित जमाती महिला (७): ब्राह्मणगाव, चुरमुरा, टाकळी (वन), मुरली, नागापूर (रु.), पिंपळगाव (वन), सोनदाबी. अनुसूचित जमाती खुले (७): सोईट (घ.), निंगनूर, चिंचोली (वन), टेंभुदरा, भवानी, दराटी, खरूस (खु.). नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला (७): करंजी, मोहदरी, माणकेश्वर, अंबाळी, पिंपळदरी, बोरी (वन), कोरटा. नागरिकांचा मागास प्रवर्ग खुले (७): टाकळी (रा.), अकोली, देवसरी, तरोडा, सुकळी (ज.), मोरचंडी, दिंडाळा. सर्वसाधारण महिला (२२): सिंदगी, गांजेगाव, मरसुळ, बोरी (चा.), कारखेड, उंचवडद, दिघडी, बेलखेड, चिंचोली (ढा.), धानोरा (सा.), जेवली, बोथा (वन), बाळदी, चातारी, वरुडबीबी, खरबी, नारळी, नागापूर (प.), साखरा, कृष्णापुर, बोरगाव, चिल्ली (ज.). सर्वसाधारण खुले (२४): परजना, मुळावा, चालगणी, पार्डी (बं.), पिरंजी, मार्लेगाव, तिवडी, कुरळी, पोफाळी, कळंबूला, झाडगाव, पिंपरी (दि.), नागेशवाडी, जनुना, टाकळी (इ.), थेरडी, अमडापूर, मेट, लिंबगव्हाण, बिटरगाव (बु.), कोपरा (बु.), धनज, अमानपूर असे आरक्षण देण्यात आले आहे.

# आ.रवी राणा यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

## पहलगाम हल्ल्यातील मृतकांना चला आपण श्रद्धांजली अर्पण करू या, रक्तदान करूया

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** वर्षभर २४/७ जनतेसोबत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी असलेले आ. रवी राणा यांचा वाढदिवस २८ एप्रिल रोजी आहे. परंतु जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ लोकांच्या मृत्यू मुळे संपूर्ण देशात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २७ निष्पाप प्रवाशांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आमदार रवी राणा यांच्या वाढदिवसानिमित्त २८ एप्रिल रोजी मोर्शी रोडवरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्यामध्ये पहलगाममध्ये मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरूंना श्रद्धांजली वाहण्यासाठी हजारो लोकांना सहभागी होऊन श्रद्धांजली



वाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच आमदार रवी भाऊ राणा हे वाढदिवसाच्या शुभेच्छा देणाऱ्यांकडून पुष्पगुच्छ किंवा हार स्वीकारणार नाहीत. म्हणून पुष्प गुच्छ किंवा पुष्प हार आणू नये. केक कापून नये. फटाके फोडू नये. अशी विनंती युवा स्वाभिमान पक्षातर्फे करण्यात आली आहे. वाढदिवस असला तरी पहलगामच्या शहीदांना श्रद्धांजली म्हणूनच हे रक्तदान शिबीर होणार आहे. गोर गरीबांच्या सेवे आणि मदतीसाठी विविध सामाजिक उपक्रम देखील आमदार रवी भाऊ राणा यांनी आयोजित केले आहे. गोर गरीब आणि गरजू लोकांसाठी नेहमी तत्पर आमदार रवी राणा यांच्या पुढाकाराने दरवर्षी प्रमाणे वाढदिवसानिमित्त, राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षातर्फे २८ एप्रिल रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात महाआरोग्य आणि रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरूंना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी हजारो लोकांना भव्य रक्तदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाने केले आहे. या महाआरोग्य शिबिरात नाक, कान, घसा, कर्करोग, मॅमोग्राफी, सामान्य शस्त्रक्रिया, बालरोग, श्वसन रोग, मूत्रपिंड, त्वचारोग, यकृत, दंत रोग, स्त्रीरोग, हाडांचे आजार, सांधे बदलणे, हृदयरोग यासह संपूर्ण आरोग्य तपासणी मोफत केली जाईल. याशिवाय, वैद्यकीय उपचार देखील मोफत असतील. ईसीजी, डोळ्यांची तपासणी, शस्त्रक्रिया आणि चष्मे सुद्धा मोफत वाटले जातील. सामाजिक उपक्रमांमध्ये स्वयंरोजगारासाठी बेरोजगारांना चारचाकी लोट गाडी वाटल्या जातील.

विधवा आणि परित्यक्त महिलांना शिलाई मशीन वाटप केले जाईल. मुलांना बॅट बॉल किट वाटले जातील. भजन महिला मंडळाला भजन साहित्य वाटप करणार. तसेच, विविध क्षेत्रांचे पीआर कार्ड वितरित केले जातील. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील गरीब आणि सामान्य जनतेसह लोकांना शासकीय योजनांचे लाभ प्रदान करण्यात येणार आहे. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरूंना श्रद्धांजली वाहण्यासाठी रक्तदान करणाऱ्यांना १६ जीबी पेन ड्राइव्ह किंवा ब्लूटूथ, सन्मान चिन्ह आणि प्रशस्तिपत्र दिले जाईल. युवा स्वाभिमान पक्षाने मतदारसंघातील सर्व जनतेला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# उमरखेडमधील २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२५:** येथील नागचौक परिसरातील एका २३वर्षीय तरुणाचा महागाव तालुक्यात लग्न समारंभावरून परत येत असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी, दि. २५ एप्रिल दुपारी सुमारे बारा वाजताच्या सुमारास घडली. चेतना अचानक मृत्यू हृदयविकाराने झाला की उष्माघाताने, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

चेतन मनोज पवार (वय २३) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो शुक्रवारी सकाळी महागाव येथे एका लग्न समारंभासाठी गेला होता. लग्नसोहळा आटोपून भर दुपारी उमरखेडकडे परत येत असताना वाटेत त्याला तीव्र अस्वस्थता जाणवू लागली आणि तो कोसळला. उपस्थित काही जणांनी त्याला तातडीने महागाव येथील रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्याला तपासून मृत

### हृदयविकार की उष्माघाताची बळी; लग्नसमारंभातून परतताना काळाचा घाला

घोषित केले. त्याच्या आकस्मिक निधनाचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच सर्वत्र शोककळा पसरली. चेतनचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. प्राथमिक अंदाज मात्र उन्हाळ्याच्या तीव्र तडाख्यामुळे त्याला उष्माघाताचा त्रास होऊन मृत्यू ओढवला असावा, असा वर्तविण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच उमरखेड येथील भाजपा शहराध्यक्ष अतुल खंडारे आणि भाजपाचे अन्य कार्यकर्ते तातडीने महागाव येथे दाखल झाले. त्यांनी चेतनचा मृतदेह ताब्यात घेऊन पुढील प्रक्रियेसाठी उमरखेड येथे आणला. येथे त्याच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समजेल.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५







# बियाणे विक्रीसाठी साथी पोर्टलचा वापर बंधनकारक

## कृषी विभागाचे कृषी निविष्ठा विक्रेत्यांना निर्देश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** जिल्ह्यातील सर्व बियाणे उत्पादक आणि निविष्ठा विक्रेत्यांना १ मे २०२५ पासून साथी (सीड ऑथेंटिकेशन, ट्रेसेबिलिटी ॲण्ड होलिस्टिक इनव्हेंटरी) पोर्टलचा वापर बियाणे विक्रीसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. यासंदर्भात कृषी विभागाने सर्व बियाणे उत्पादक आणि निविष्ठा विक्रेत्यांना आदेश दिले आहेत.

बियाण्यांच्या उत्पादनापासून ते विक्री पर्यंतच्या प्रक्रियेवर नियंत्रण आणि पारदर्शकता ठेवण्यासाठी केंद्र शासनाने साथी हे पोर्टल तयार केले आहे. मागील खरीप हंगामात या पोर्टलवरूनच बियाण्यांचे वितरण करण्याचे निर्देश होते. मात्र, त्यांची योग्य अंमलबजावणी झाली नव्हती. त्यानंतर कृषी विभागाकडून यासंदर्भात राज्यातील सर्व जिल्ह्यातील निविष्ठा विक्रेत्यांना साथी पोर्टलव्दारे बियाणे विक्रीसाठी आवश्यक प्रशिक्षण देऊन या खरीप हंगामापासून साथी पोर्टलचा वापर करूनच बियाणे विक्री बंधनकारक केली आहे. साथी पोर्टलचे लॉगिन आयडी व पासवर्ड सर्व बियाणे उत्पादक व निविष्ठा विक्रेत्यांना देण्यात आले असून, पहिल्या वेळी पोर्टलवरून लॉगिन करावे व प्रोफाईल अद्ययावत करावे आणि त्यानंतर मोबाइल ॲप्लिकेशनचा वापर करून बियाणे विक्री करता येणार आहे.

### जिल्ह्यातील निविष्ठा विक्रेते

- बियाणे वितरक १९९४,
- रासायनिक खत वितरक ८४२
- किटकनाशक वितरक ८०४



### कारवाई करू – डॉ. तुषार जाधव

साथी पोर्टलमुळे गुणत्तापूर्ण बियाणे उत्पादन आणि वितरण सुनिश्चित होणार आहे. साथी पोर्टलमुळे बियाण्याची उपलब्धता व वितरण यांची सद्यः स्थिती सहज समजू शकेल. यासंदर्भात शासनाच्या आदेशानुसार सर्व बियाणे उत्पादक व निविष्ठा विक्रेत्यांना निर्देश दिले असुन या खरीप हंगामापासून साथी पोर्टलव्दारेच विक्री करण्यात येईल. जे विक्रेते पोर्टलव्दारे विक्री करणार नाहीत, अशा विक्रेत्यांच्या तपासण्या करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी सांगितले.

# अद्ययावत रोड सेफ्टी व्हिजन व्हेईकल जिल्ह्याच्या सेवेत दाखल

## जिल्हाधिकारी अजित कुंभार : लोकशिक्षणासाठी रोड सेफ्टी व्हिजन वाहन उपयुक्त

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** जिल्ह्यात अपघात प्रवण स्थळांची संख्या शून्यावर आणणे आवश्यक आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी विविध उपाययोजना अंमलात आणतानाच प्रभावी लोकशिक्षण देणे गरजेचे आहे. बचाव कार्याबरोबरच लोकशिक्षणासाठी रोड सेफ्टी व्हिजन व्हेईकल उपयुक्त ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी व्यक्त केला.

प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे रोड सेफ्टी व्हिजन हे अत्याधुनिक सुविधा असलेले वाहन जिल्ह्याच्या सेवेत दाखल झाले. त्याला हिरवी झेंडी दाखवून जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रादेशिक



परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, उपवनसंरक्षक कुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम अभियंता प्रसाद पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन दराडे, अनिरूद्ध देवधर, संदीप तायडे, संदीप तुरकणे, किरण लोणे, मनोज शेळके आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या प्रस्तावानुसार जिल्हा नियोजन समितीने या वाहनासाठी ३३ लक्ष रूपये निधी उपलब्ध करून दिला. त्यातून हे वाहन निर्माण झाले आहे. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, वाहनात सर्व्हेलन्स कॅमेरा, सर्चलाईट, कटर, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम अशा अनेक सुविधा आहेत. अपघात घडूच नयेत यासाठी शिस्त निर्माण करणे आवश्यक आहे. बचाव कार्याबरोबरच जनजागृतीसाठी हे वाहन उपयुक्त ठरेल. अपघातप्रवण स्थळांची संख्या शून्यावर आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.श्री. भुयार म्हणाले की, वाहनात सर्व्हेलन्स कॅमेरा, सर्चलाईट सुविधा आहेत. या व्हेईकलने साडेसात टनपर्यंत वजन असलेले वाहन ओढून नेता येते. एखादी व्यक्ती वाहनात अडकली असेल तर त्याला बाहेर काढण्यासाठी लागणारे ङ्कटरफसुद्धा या वाहनात आहे. महामार्गावर असलेल्या गावांतून, ग्रामीण भागातूनही बैलगाडी, ट्रॅक्टर, दूधविक्रीसाठी येणारे विक्रेते अशी वाहतूक होते. अनेकदा चुकीच्या दिशेने येणाऱ्या वाहनांचे अपघात होतात. ते टाळता येणे शक्य आहे. त्यासाठी या उपक्रमाद्वारे लोकशिक्षण देण्यात येईल. या वाहनाद्वारे वाय-फाय सेवेचा वापर करून वाहतूक शिकाऊ परवानाही मिळवता येणे शक्य आहे. त्यााचप्रमाणे,केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा प्रसारही याद्वारे करण्यात येणार आहे, असे श्री. भुयार यांनी सांगितले.

# चाकूने हल्ला करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** अकोट येथील सत्र न्यायालयाने रमजान महिन्याच्या २६व्या रोजी मशीदमध्ये घुसून नमाजीवर चाकूने हल्ला करणाऱ्या आरोपी साकीब अलीचा अटकपूर्व जमानत अर्ज फेटाळला. अकोट सत्र न्यायालयाचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी हा निर्णय दिला. आरोपी साकीब अली आबीद अली (३७), बाकरपूरा अकोट, याने जिदान नावाच्या नमाजीवर मशीदमध्ये हल्ला केला, त्याला गंभीर जखमी केलं.



तपासानुसार, २७ मार्च २०२५ रोजी रमजान महिन्याच्या २६व्या रोजी अकोटच्या बाकरपूरा मशीदमध्ये जागरण सुरू होते. त्या वेळी पोहे वाटत असताना आरोपी साकीब अली आणि जावू अली यांनी जिदानवर हल्ला केला. जिदानला चाकूने पाठीवर, खांद्यावर आणि दंडावर चार ते पाच वार करून जखमी केले. या हल्ल्यानंतर जिदानला तात्काळ पोलिस ठाण्यात आणण्यात आले, आणि अधिक उपचारासाठी अकोला रेफर करण्यात आले.

सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात हजर होऊन जमानत अर्जाचा विरोध केला, आणि सांगितले की आरोपीने साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता आहे. त्याने पूर्वी देखील अकोट पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा केला आहे, आणि त्याच्या अपराधीतेला मदत होण्याचा धोका असल्यामुळे त्याची अटक आवश्यक आहे. पोलीस आरोपीच्या अटकेसाठी प्रयत्नशील आहेत.अकोट शहर पोलीस स्टेशनचे धनंजय गावंडे या प्रकरणाच्या तपासावर आहेत, आणि अजून तपास पूर्ण झाला नाही.

## टंचाई पाण्याची...



महान येथुन येणारी मुख्य जलवाहिनी खडकी परिसरात खूप दिवसांपासून लीकेज असल्यामुळे दिवसभर हजारों लीटर पाण्याचा अपव्यय होत आहे एकीकडे कडक उन्हाळा असल्याने पिण्यासाठी गोड पाण्याची नितांत गरज असुन परिसरातील नागरिक या लीकेज मधुन पाण्याचा भरना करताना दिसुन येत आहे... ( छाया. संजय ताथुरकर )

# खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाच्या उदिष्टात २० टक्क्यांनी वाढ

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

### खरीपासाठी १३२० कोटी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट

**अकोला, दि. २५ :** यावर्षीच्या खरीप हंगामासाठी पीककर्ज वाटपाला सुरुवात करण्यात आली असुन यंदा खरीप हंगामातील उदिष्टामध्ये २० टक्यांनी वाढ करीत १३२० कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटपाचे उदिष्ट ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.बँकाकडून दरवर्षी शेतकऱ्यांना एक वर्षाकरिता बिनव्याजी पीककर्जाचे वाटप करण्यात येते. पीककर्ज वाटपाकरिता शासनाच्या वतीने जिल्ह्याला खरीप व रब्बी हंगामासाठी दरवर्षी उद्दिष्ट देण्यात येते. मागील वर्षी जिल्ह्याला मिळालेले १५०० कोटींचे उद्दिष्ट यावर्षी सुद्धा कायम ठेवण्यात आले आहे. मात्र, खरीप हंगामातील उद्दिष्टामध्ये २० कोटींनी वाढ करण्यात आली असुन यावर्षी खरीपाचे १३२० कोटी रुपयांचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. तर रब्बी हंगामातील पीक कर्ज उद्दिष्टा गतवर्षीपेक्षा २० कोटींनी कमी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील भौगोलीक परिस्थिती, पर्जन्यमान पाहता खरीप प्रमुख हंगाम आहे. त्यामुळे पीककर्ज वाटपाच्या उदिष्टात या हंगामात वाढ करण्यात आली आहे.

# कॉंक्रिट रोडवर उडवले कोट्यवधी रुपये

## शहरातील विकासाचा समतोल साधणार कसा?

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** शहरातील विकासाचा समतोल साधला जात नसल्याची ओरड नागरिकांकडून होत आहे. हद्दवाढ भागात चालायला धड रस्ते नसताना काही रस्त्यांवर मात्र कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली जात असल्याची परिस्थिती आहे. यामुळे नागरिकांमध्ये भेदभावाची भावना निर्माण होत असून याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

हद्दवाढ भागाचा अकोला महापालिकेत समावेश होऊनही या परिसरात मूलभूत सोयी सुविधांची वानवा आहे. हद्दवाढ भागातील नागरिकांनी वारंवार आंदोलन करूनही महापालिका प्रशासनाने याकडे डोळेझाक केली आहे. त्यामुळे या परिसरात पाणीपुरवठ्यासह सर्विस लाईन, विद्युत व्यवस्था व रस्त्यांची मोठी समस्या असून हा बॅकलॉग कधी भरला जाईल असा सवाल उपस्थित होत आहे. या परिसरात महापालिका नवनवीन प्रकल्प राबवित असतानाही परिसरातील नागरिकांना मूलभूत सोयी सुविधांपासून दूर ठेवत आहे. खडकी परिसरात कचरा संकलनासाठी ट्रान्सफर स्टेशन उभारण्यात आले आहे. तसेच इलेक्ट्रिक बसेससाठी या परिसरात डेपोचे काम सुरू आहे. शिवापूर परिसरात जिल्हा रुग्णालय उभारणीचे काम सुरू आहे. हद्दवाढ भागात महापालिका विविध प्रकल्प उभे करीत असताना या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या सोयी सुविधांसाठी कामे करताना दिसत नाही. याउलट शहरात गरज नसतानाही सिमेंटचे कोट्यवधी रुपयांचे रस्ते बांधण्यात आले आहेत. हे कमी म्हणून की काय शहर बस डेपोसाठी खडकी परिसरात ५ कोटी रुपयांचा कॉंक्रीट रस्ता तयार झाला आहे. जुना आरटीओ रोड दोन कोटी रुपयांचा निधी खर्च करून बांधण्यात आला आहे. या परिसरात कॉंक्रीट रस्त्याची कुठलीही आवश्यकता नसताना राजकीय नेत्यांच्या दबावापोटी हे काम करून मनपा अधिकाऱ्यांनी आपले उखळ पांढरे करून घेतले आहे. आता पुन्हा उमरी परिसरात जाण्यासाठी नवा रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या लगत रेल्वे लाईनला लागून हा रस्ता होणार आहे.



### कॉंक्रीट रस्त्याची गरज नव्हती ?

जुना आरटीओ रोड, पीडीकेव्ही रेल्वे लाईन लगत असे दोन रस्ते टाकण्यात आले. यातील आरटीओ रोड तयार झाला आहे. तत्कालीन आयुक्त यांनी राजकीय दबावात येऊन जुना आरटीओ रोड टाकला का? असा सवाल उपस्थित होत आहे. तसेच पीडीकेव्ही रेल्वे लाईन लगत आता रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. आमदार यांच्या निधीतून हा रस्ता होणार आहे. या परिसरात नागरी वस्ती नसतानाही रस्ता टाकला कसा असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# अवैध सावकारांविरुद्ध धाडसत्र ; दस्तऐवज जप्त

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २५ :** अवैध सावकारी प्रकरणात अकोल्यात मोठी कारवाई करण्यात आली असून, तीन ठिकाणी धाड टाकून मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. डॉ. प्रविण एच. लोखंडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तीन व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०२४ अंतर्गत कलम १६ अन्वये धाड कार्यवाही झाली. दिपक , नितिन आणि संतोष यांच्यावर ही कारवाई झाली. तीन वेगवेगळ्या पथकांनी संबंधितांच्या घरी धाड टाकली. या कारवाईत कोरे धनादेश, नोंदवह्या, खरेदीखत, स्थावर मालमत्तेचे दस्तऐवज,



स्टॅम्पपेपर, भाडेकरारनामे, बँक पासबुक आदी दस्तऐवज जप्त करण्यात आले. संपूर्ण कारवाई पोलीस बंदोबस्तात पार पडली.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतीही व्यक्ती अधिकृत परवाना नसताना व्याजाने पैसे देत असल्यास त्यांच्याविरुद्ध तक्रार आवश्यक पुराव्यासह आपल्या तालुक्याच्या उपनिबंधक / सहाय्यक निबंधक कार्यालयात दाखल करावी. तसेच कर्जाची गरज असल्यास अधिकृत बँका, नोंदणीकृत पतसंस्था अथवा परवानाधारक सावकारांकडूनच कर्ज घ्यावे.

आजपर्यंत या कार्यालयामार्फत अवैध सावकारीप्रकरणी एकूण १५२.५३ एकर शेतजमीन, ४९३९.५० चौ. फूट जागा व एक फ्लॅट परत करण्यात आले असून, २०१ प्रकरणांवर कारवाई झाली आहे. यातील ५८ प्रकरणांत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तर १०१ प्रकरणांमध्ये चौकशी सुरु असल्याची माहिती डॉ. प्रवीण लोखंडे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,यांनी दिली.

## जुनी गाडी खरेदी करताय?

# आता विक्रेत्याकडे ‘परवाना’ नसला, तर धोका तुमचाच!

## आरटीओ चा धडाकेबाज निर्णय

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. २५ :**जुनी गाडी खरेदी करताय? सावध व्हा! कारण आता गाडी खरेदी-विक्रीचा व्यवहार ‘परवान्याशिवाय’ शक्यच नाही. पुणे आरटीओने घेतलेल्या निर्णयामुळे जुन्या वाहनांच्या व्यवहारात पारदर्शकता येणार असून, ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी ‘अधिकृत विक्रेता परवाना’ बंधनकारक करण्यात आला आहे. कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल अशी आता परिस्थिती निर्माण झाली आहे.

नवीन वाहनांच्या गगनाला भिडलेल्या किमतीमुळे अनेक ग्राहक जुनी वाहने खरेदी करण्याचा पर्याय निवडतात. मात्र, हीच संधी अनेक फसवणूकखोरांच्या हातात गेल्याने सामान्य ग्राहक अडचणीत येत होते. वाहन नावावर नोंद न झाल्याने अपघात, चलान आणि गुन्हेगारी नोटिसा मूळ मालकाच्या नावावर येत होत्या. ही धोकादायक साखळी तोडण्यासाठीच आरटीओ पुढे सरसावले आहे. पुढील काळात कोणतीही जुनी गाडी विकण्यासाठी विक्रेत्याला आरटीओकडून ‘अधिकृत विक्रेता’ म्हणून नोंदणी करावी लागणार आहे.

त्यासाठी २९ ए अंतर्गत अर्ज करावा लागेल आणि मंजुरीनंतर २९ बी प्रमाणपत्र दिलं जाईल. या परवान्यामुळे विक्रेता गाडी स्वतःच्या नावावर नोंद करू शकतो आणि नंतर अधिकृतरित्या दुसऱ्याला विकू शकतो.



दुचाकी अथवा चार चाकी गाडी खरेदी करणे हे सर्वसामान्य नागरिकांचे स्वप्न असते नवी नाहीतर जुनीच सही अशी मानसिकता अलीकडे बडावली आहे, ‘‘ग्राहकांची सुरक्षितता हे आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे. परवाना पद्धतीमुळे व्यवहार नियमबद्ध व पारदर्शक होतील. फसवणूक थांबवणं हीच या निर्णयामागची भूमिका आहे.’’

**-स्वप्निल भोसले,**उपप्रादेशिक परिवहन अधिकारी , पुणे

### फसवणुकीचा गेम संपणार!

आरटीओच्या नव्या निर्णयामुळे ‘गाडी विकली पण नाव बदललं नाही’ अशा प्रकरणांना पूर्णविराम मिळणार आहे. ग्राहक गाडी घेताना विक्रेत्याचा अधिकृत परवाना तपासू शकतील आणि कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित व्यवहार सुनिश्चित करतील.

### फक्त पुणे नव्हे, लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात

ही योजना सध्या पुण्यात लागू करण्यात आली असली, तरी लवकरच ती इतर शहरांमध्येही राबवली जाणार आहे. त्यामुळे आता जुनी गाडी घेण्यापूर्वी गाडीची किंमतच नव्हे, तर विक्रेत्याचा आरटीओ परवाना तपासणेही तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

## थोडक्यात

### पैशांसाठी विवाहितेचा छळ; सासरच्या ८ जणांविरूध्द गुन्हा दाखल

**खामगाव :** स्थानिक मिल्लत कॉलनीमधील माहेर असलेल्या आयशा सिध्दीका सैय्यद शहेबाज (२०) यांचे सैय्यद शहेबाज सैय्यद सलीमोद्दीन (२४) रा. बड़े प्लॉट याचेसोबत लग्न झाले आहे. लग्नानंतर पत्ती सैय्यद शहेबाज सैय्यद सलीमोद्दीन, सासरे सैय्यद सलीमोद्दीन सैय्यद अलीमोद्दीन (५५), सासु शमीम परवीन सैय्यद सलीमोद्दीन (५०), दिर सैय्यद सलमान सैय्यद सलीमोद्दीन (२२), दिर सैय्यद साकीब सैय्यद सलीमोद्दीन (१९) सर्व रा. बड़े प्लॉट, नणंद आयेशा सदफ शेख आवेज (२१) व नंदोई शेख आवेज शेख रशीद (२६) दोघे रा. जुनाफैल, आजत सासरे हाजी यासीम मुकादम (६८) रा.मालेगाव जि. नाशिक यांनी आयशा सिद्दीका यांना माहेरवरून १ लाख रूपये आणण्याचा तगादा लावुन पैसे आणले नाही तर नांदवणार नाही, असे म्हणुन तिचा सतत शारिरीक व मानसिक छळ केला. तसेच तिन वेळा तलाक देण्याचा गुन्हा केला. ह्या घटना ७जानेवारी २४ ते १२ मे २४ दरम्यान बड़े प्लॉट येथे घडल्या. आयशा सिद्दीका यांच्या फिर्यादीवरून उपरोक्त आरोपीविरुध्द पोस्टेमध्ये कलम ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पीएसआय पाटील करीत आहेत.

### श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त गुरुचरित्र पारायणाचे आयोजन



**डोणगाव :** येथील जवळा रोड स्थित जयस्वाल लेआउट मधील श्री स्वामी समर्थ केंद्राकडून श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप सप्ताह २० ते २६ एप्रिल पर्यंत आयोजित करण्यात आलेला आहे. या सप्ताहामध्ये दररोज सकाळी ५.१५ ते ७.१५ पर्यंत गुरुचरित्र पारायण होते. नंतर वेगवेगळ्या दिवशी दुर्गा सप्तशती, भागवत, स्वामी चरित्र घेतल्या जाते. दररोज सायंकाळी साडेपाचला विष्णुसहस्त्रनाम घेतले जाते. तसेच रोज श्री स्वामी समर्थ महाराजांची त्रिकाळ आरती होते. गुरुचरित्र पारायणाला २७५ महिला सेवेकरी तर २५ पुरुष सेवकरी बसलेले आहेत. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त २६ एप्रिल रोजी सकाळी साडेदहाला महाआरती नंतर खिचडी प्रसादाचे वाटप होणार आहे. विशेष म्हणजे या सर्व सप्ताहाचे नियोजन महिला सेवेकरी यांनी केलेले आहे.

# अक्षयतृतीयेपूर्वीच सोन्याला लाखाची चमक

## सोन्याला बुलडाण्यात २४ कॅरेटला ९८ हजार, तर २२ कॅरेटला ९७ हजार २०० रुपये भाव

अजिंक्य भारत / प्रतिनिधी
बुलडाणा दि.२५

मार्च महिन्याच्या शेवटी गुढीपाडवा व रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या भावात चांगलीच वाढ झाली होती. त्यानंतर एप्रिल महिन्यात मात्र चांदी व सोन्याच्या भावात चांगलीच घसरण झाल्याचे दिसून आले. ही घरसरण लग्न सराई संपेपर्यंत अशी राहिल अशी आशा असताना आता हळूहळू सोन्याला लाखाची झळाळी मिळाली तरीही त्याचा दर आणखीच वाढू लागल्याने येत्या अक्षयतृतीये पर्यत सोने लाखाच्या पार जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



मागील महिन्यात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनिश्चितता आणि अमेरिका-चीन व्यापार युद्धामुळे सोने आणि चांदीच्या किमतीत बरीच अस्थिरता होती. यातच शेअर बाजार तेजीत असताना दुसरीकडे सोन्याच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. विशेष म्हणजे, मागील महिन्याच्या तुलनेत सोन्याचे भाव तब्बल ८ हजारांनी वाढल्याचे चित्र आहे. सोन्याने सध्या उच्चांकी भाव गाठला असूनही लग्नसराई सुरु खरेदी करण्यासाठी महिला वर्गामध्ये प्रचंड उत्साह दिसत होता. गुंतवणुकीच्या दृष्टीनेही अनेकांनी सोने खरेदी केली. सोमवारी सकाळपासून सोन्याची दालने ग्राहकांच्या गर्दीने फुललेली होती. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. गुंतवणूकदारांसाठी भाव वाढल्यामुळे सुवर्ण संधी सोन्याने उच्चांकी भाव गाठल्याने गुंतवणूकदारांसाठी मोठी संधी निर्माण झाली आहे. जागतिक अनिश्चितता आणि चलन बाजारातील अस्थिरता यादरम्यान सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोने हा सर्वात विश्वासार्ह पर्याय आहे.लग्नसराईत सोन्याची मागणी वाढली सोमवारी बुलडाण्यात २४ कॅरेट सोन्याचे भाव ९८ हजार रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचे भाव ९७ हजार २०० रुपये असे होते. यात तीन टक्के जीएसटी लावला असता हा भाव थेट लाखाच्या वर जात असल्याने सोन्याला लाखाची झळाळी आली. सोन्याचे गंठण, पैंजण नेकलेस खरेदी सोन्याच्या भावाने एक लाखापर्यंतचा आकडा गाठला असला तरी महिलांनी सोन्याचे नेकलेस, गंठण, अंगठ्या, विविध आकाराच्या दागिन्यांना पसंती दिली. तर चांदी मध्ये पैजण, जोडवे यांना सर्वाधिक मागणी होती.

## जागतिक हिवताप दिनानिमित्ताने आरोग्य सेवक यांना उत्कृष्ट पुरस्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेंदुर्जन दि.२५

दरवर्ष जागतिक हिवताप दिनाच्या निमित्ताने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आरोग्य सेवक यांना उत्कृष्ट पुरस्कार दिला जातो त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा २५ एप्रिल रोजी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आरोग्य सेवक यांना जागतिक हिवताप दिनानिमित्त उत्कृष्ट पुरस्कार देण्यात आला.

बुलढाणा जिल्ह्यामधून तीन आरोग्य सेवक यांना उत्कृष्ट पुरस्कार देण्यात आला यामध्ये सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला कार्यरत असलेले दत्तात्रय पुंजाजी काटे आरोग्य सेवक साखरखेर्डा यांनी आरोग्य सेवा देत सर्व प्रकारच्या आजाराचे कार्य चोखपने पार पाडल्या बद्दल २५ एप्रिल २०२५ रोजी जागतिक हिवताप दिना निमीत्त जिल्हा हिवताप कार्यालय येथे हिवताप दिन साजरा करण्यात आला होता.



यामध्ये मा जिल्हा आरोग्य अधिकारी गिते व जिल्हा शल्यचिकित्सक भुसारी व हिवताप अधिकारी चौव्हाण यांचे हस्ते दत्तात्रय काटे, आरोग्य सेवक यांना पुरस्कार देऊन सन्मानचिन्ह देण्यात आले. या कार्यक्रमाला इतर मान्यवर उपस्थित होते. यांचे तालुक्यातून सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## जीवनात अभ्यासाप्रमाणे खेळालाही महत्व - मुंदडा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२५



स्थानिक एस. डी. वरणगांवकर विद्यालयात संस्थेचे संस्थापक सचिव रावसाहेब वरणगांवकर यांच्या स्मृती प्रित्यार्थ संपन्न झालेल्या क्रीडा सप्ताहाचे बक्षीस वितरण आज दिनांक २५ एप्रिल रोजी संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशजी मुंदडा, तालुका वकील संघाचे अध्यक्ष अधिवक्ता संजय बडगुजर, घाटपुरीचे सरपंच कुळसुंदर तसेच रावसाहेब वरणगांवकर बहु. शिक्षण संस्थेच्या सचिव रेणुका वरणगांवकर हे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गणेश वरणगांवकर होते. याप्रसंगी क्रीडा सप्ताहात झालेल्या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली नंतर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे वितरित करण्यात आली. कार्यक्रमात समायोचीत भाषणे झाली. जीवनात जसे अभ्यासाचे महत्व आहे तसेच खेळाचे सुद्धा महत्व आहे असे प्रकाशजी मुंदडा यांनी आपल्या भाषणात सांगितले.

पुढील सत्रात सुद्धा विद्यार्थ्यांनी विविध क्रीडांमध्ये आपल्या शाळेचे नांव उज्वल करावे असे आपल्या अध्यक्षीय भाषणात गणेश वरणगांवकर यांनी सांगितले. कु. जान्हवी जावरकर, कु.धनश्री ठोंबरे, कु. आदित्या सापधरे , ऋषिकेश गावंडे रितेश मुहरसिंग इत्यादी विद्यार्थ्यांना बक्षीसे प्राप्त झाली. कार्यक्रमाचे संचलन धनंजय पिंपळे तर आभार प्रदर्शन विवेकानंद भोंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## दहशतवादी भ्याड हल्ल्याला जशाच तसे उत्तर द्या- शिंगणे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.मही दि.२५



जम्मू काश्मीरमधील पहल-गाम येथील मिनी स्विझिलन्ड समजल्या जाणाऱ्या पर्यटनास्थळी पाकिस्तानी पुरस्कृत दहश-तवाद्यांनी भ्याड हल्ला करून नि:शपाप भारतीयांचा धर्म विचारून बळी घेतला आहे. हा भ्याड हल्ला मानवतेला काळिमा फासण-ारा असून केंद्र सरकारने आता जशाच तसे उत्तर द्यावे अशा तीव्र शब्दात सभापती समाधान शिंगणे यांनी भावना व्यक्त केल्या. दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता देऊळगांव मही गावकऱ्यांच्या वतीने बसस्टॉप पासून ते डिग्रस चौकापर्यंत निषेध रॅली काढण्यात आली.

रॅली दरम्यान पाकिस्तान मुर्दाबाद, दहशतवादी मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या. पुढे बोल-तांना सभापती शिंगणे म्हणाले की, दहशतवादी भ्याड हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरला असून देशात संतापाची लाट निर्माण झाली आहे. जोपर्यंत दहश-तवादी संघनेचा खातमा होत नाही तोपर्यंत पहलगाम सारख्या असंख्य पर्यटनास्थळी भारतीय नागरिकांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो असे ते बोलत होते. यावेळी सरपंच वसुदेव पाटील शिंगणे, शिव-सेना युवानेते संभाजीराजे शिंगणे,धर्मराज खिल्लारे, डॉ. जे. पी ताठे, डॉ. महेश दंदाले, संदीप राऊत, तुळशीराम पंडित, मन्नान पठाण,बाबूजी कोटेचा, कैलास राऊत,भरत शिंगणे, राम प-हाड, आदिल पठाण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिवसे-ना युवा नेते रविंद्र इंगळे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष भास्कर शिंगणे, उपाध्यक्ष सुरेश झिने, माजी सरपंच उमेश शिंगणे, माजी सरपंच रामकिसन म्हस्के,शेख. शगीरभाई नागनगांववाले,डॉ. जाकीर,मो. कलीम, सुभाष इंगळे, शेख मुस्लिम, डॉ. स्वप्नील मुंढे इस उगले,गजानन पाटील,विजय राऊत,विशाल उबरहंडे,अनिल शिंगणे, भगवान चंद,विकास शिं-गणे, शंभू शिंगणे,रवि मुळे, नितीन देशमुख,शाम छबीले यांच्यासह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## माठे फाउंडेशनने आतापर्यंत चर्मकार समाजातील १६१ लग्न जुळलविले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
संग्रामपूर दि.२५

चर्मकार समाज बांधवांच्या उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या माठे फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून राज्यस्तरीय वधु वर परिचय पुस्तिकेच्या माध्यमातून समाजातील उपवर-वधूचे विवाह जुळवणीचे कार्य करण्यात येत आहे. आतापर्यंत फाउंडेशनच्या माध्यमातून १६१ वे लग्न जुळले असून २०२५ वर्षातीले ४ थे लग्न जुळले आहे.

श्रीमती चंद्रकला व स्व. नारायण सुरडकर मोताळा, ह मु पुणे यांची सुकन्या चि.सौ. का. दुर्गाताई व सौ राधिका व सुनीलराव डांगे देवधाबा, ह मु खामगाव यांचा सुपूत्र चि



प्रेमराज ह्यांचा शुभ विवाह २२ एप्रिल रोजी खामगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

आपण जन्म घेतलेल्या समाजाचे काही देणे लाग-ते म्हणून माठे फाउंडेशनच्या वतीने समाजाची निस्वार्थ सेवा करण्यात येत आहे. यामध्ये सम ाजातील उपवर मुलांमुलींचे लग्न जुळविण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. यासाठी समाजबांधवांचे सहकार्य मिळत असून यापुढेही समाज बांधवांनी सहकार्य करावे असे आवाहन माठे फाऊंडेशनच्या संचालकांनी केले आहे.

## सहकारी पतसंस्थाच्या अध्यक्षपदी राधेश्याम चांडक यांची बिनविरोध निवड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२५

बुलढाणा जिल्हा नागरी व पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था संघ म. बुलढाणा र. न ११४ ह्या संघाच्या व्यवस्थापन समितीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध संपन्न झाली. यामध्ये संघाचे अध्यक्ष म्हणून राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी जी.जे.आमले, सहाय्यक निबंधक, बुलड-ाणा यांनी कामकाज पाहिले.

बुलडाणा जिल्हा ना-गरी व पगारदार पतसंस्था संघाची स्थापना ११ मार्च १९९१ रोजी स्थापना करण्यात आली. या



संघाच्या ३२० पतसंस्था सभासद आहेत. संघ हा जिल्ह्यातील पतसंस्थांना विविध प्रकारच्या सेवा पुरवीत आहे. आदरणीय भाईजी यांच्या नेतृत्वात संघाने आतापर्यंत दैदिप्यमान कामगिरी करून राज्यामध्ये सर्वोत्कृष्ठ संघ म्हणून बुलढाणा जिल्हा पतसंस्था संघाला ओळख निर्माण करून दिली आहे. संघाचे सन २०२५ ते २०३० या कालावधीची पंचव-ार्षिक निवडणूक अविरोध पार पडली. यावेळी संघाचे उपाध्यक्ष म्हणून सौ स्वातीताई वाकेकर, व मानद सचिव म्हणून सुरेन्द्रप्रस-ाद पांडे यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच नवनिव-ाचित संचालक गोविंद मापारी, पंडितराव देशमुख, मंगेश व्यवह-ारे, मख्खनलाल मुंदडा, सौ. स्वाती कन्हेर , शंकर सकळकर, दीपक देशमाने श्रीसतीश कायंदे आदींची निवड करण्यात आली. यानंतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर प्राधिकृत निर्णय अधिकारी जी. जे. आमले यांनी सर्व निर्वाचित पदाधिकारी व संचालक यांचा सत्कार केला.

## दे. राजा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतींपैकी २४ ठिकाणी सरपंचपद महिलांसाठी राखीव,

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.राजा दि.२५

आगामी ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडण-ुकीसाठी देऊळगाव देऊळगाव राजा तालुक्या-तील तालुक्यातील ४८ ग्रामपंचायत पैकी २४ ठिकाणी सरपंच पदाचे आरक्षण महिलांसाठी जाहीर करण्यात आले आहे. शुक्रवारी बुलढ-ाणा जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतच्या सरपंच पदाच्या महिल-ांसाठी आरक्षणाची प्रक्रिया पार पडली. दि.१६ एप्रिल रोजी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण देऊळगाव राजा तहसील कार्यालयात काढण्यात आले होते.

सदर ४८ ग्रामपंचायती पैकी (एस सी) प्रवर्गासाठी ११ (एस टी प्रवर्ग) एक ओबीसी प्रवर्ग १२ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी २४ ग्रामपंचायती अशा एकूण ४८ ग्रामपंचायतीं-चे आरक्षण प्रवर्गानुसार काढण्यात आले होते. दि.२५ एप्रिल शुक्रवारी सकाळी अकरा वाजता बुलडाणा येथे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर जिल्हाधि-कारी सदाशिव शेलार, निवडणूक विभागाच्या उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे देऊळगाव राजाच्या तहसिलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच पदाच्या महिलांस-ाठीच्या आरक्षण प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम अनुसूचित जाती प्रवर्गास-ाठी आरक्षण काढण्यात आले. यामध्ये दे-ऊळगाव राजा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायती पैकी अनुसूचित जातीकरीता (एस.सी) महिला सरपंच पद आरक्षित झालेल्या सहा ग्रामपंच-ायती १) पिंप्री आंधळे २) रोहणा ३) गारखेड ४)टाकरखेड वायाळ ५) डोड्रा ६) मेहुणा राजा अनुसूचित जमातीकरीता (एस.टी) सरपंच पद आरक्षित करण्यात येत असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये एकमेव अंढेरा ग्रामपंच-ायतचा समावेश असून त्या ठिकाणी महिलेला सरपंच पदाची संधी मिळणार आहे.नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता (ओबीसी) सरपंच पद महिलेसाठी आरक्षित करण्यात येत असलेल्या ग्रामपंचायती १)वाकी बुदृक २) पांगरी वाडी ३) शिवणी आरमाळ ४) बोरखेडी बावरा ५) असोला जहॉगिर ६ )गारगुंडी सर्वसाधारण प्रवर्गाकरीता (ओपन) सरपंच पद महिलेसाठी आरक्षित करण्यात येत असलेल्या ग्रामपंचायती १)सावखेड भोई २) मेंडगाव ३)गोळेगाव ४) तुळजापुर ५) दगडवाडी ६) पळसखेड झाल्टा ७) चिंचोली बुरकूल ८) आळंद ९) नागन-गाव १०) गोंधनखेड ११) दगडवाडी १२) सरंबा याप्रमाणे एकूण ४८ ग्रामपंचायतीं-पैकी २४ ग्रामपंचायतीं मध्ये आरक्षणा नुस-ार महिला सरपंचपदी विराजमान होणार आ-हेत. सदर सरपंचपदाचे आरक्षण हे येणाऱ्या निवडणुकांसाठी जाहीर करण्यात आले आहे. यावेळी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरक्षण प्रक्रियेला देऊळगाव राजा तहसील कार्यालयातील निवडणूक विभागा-चे नायब तहसिलदार प्रविण घोटकर महसूल सहाय्यक प्रशांत वाघ ऑपरेटर अमोल जाधव यांचेसह जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील ना-गरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार
## नायब तहसीलदार पाटील यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२५

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानातील सन २०२४-२५ या वर्षातील पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे २१ एप्रिल रोजी करण्यात आले.

यावेळी खामगावचे नायब तहसीलदार निखिल पाटील यांचा मुख्यमत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२४-२०२५ वर्षाच्या स्पर्धेच्या निकालात खामगाव तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार निखिल पाटील यांना राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेमधील वाढ, लोकाभिमुखता व निर्णयक्षमता आणण्यासाठी, तसेच सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिम ानता अभियान व स्पर्धा राबविण्यात येत



आहे. सर्वोत्कृष्ट उपक्रम अंतर्गत शासकीय अधिकारी श्रेणीमध्ये मध्ये नायब तहसीलदार निखिल राजू पाटील हे गडचिरोली जिल्ह्यातील तहसील कार्यालय कुरखेडा येथे कार्यरत असताना त्यांनी तहसील कार्यालयाचे मोबाईल ॲप सुरू करून या माध्यमातून नागरिकांना ऑनलाइन सेवांची माहिती एकाच ॲप द्वारे पुरविण्याची सेवा उपलब्ध करून दिली होती. या अभियानातंर्गत राज्यस्तरावर प्राप्त प्रस्तावांपैकी राज्यस्तरीय स्पर्धेत प्रशासकीय गतिमानता व सर्वोकृष्ट उपक्रम या वर्गवारीत राज्यस्तरीय निवड समितीमार्फत पुरस्कार विजेते जाहीर करण्यात आले. यामध्ये नायब तहसीलदार निखिल पाटील यांना द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. पारितोषिक वितरण मुख्यमंत्री यांचे हस्ते मुंबई येथे नागरी सेवा दिन २१ एप्रिल रोजी करण्यात आले. यावेळी यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### कोंडोली येथील राऊत यांना डॉक्टरेट पदवी प्रदान




**कोडोली :** येथील ज्ञानेश्वर अंबादास राऊत यांना कृषी वनस्पतिशास्त्र या शाखेत प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्यासह डॉक्टरेट (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील ३८व्या दीक्षांत समारंभा नुकताच संपन्न झाला यावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत डॉ. ज्ञानेश्वर अंबादास राऊत यांना कृषी वनस्पतिशास्त्र या शाखेत प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्यासह डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

### पिंपळगाव इजारात चार घरांसह मंगल कार्यालय जळून खाक

**मंगरूळपीर :** तालुक्यातील पिंपळगाव इजारा येथे २४ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास लागलेल्या आगीत चार घरे व एक मंगल कार्यालय जळून खाक झाले. यात सुमारे १५ लाख रुपयांचे साहित्य भस्मसात झाल्याचा अंदाज आहे. या आगीत सदानंद घुसे, वंदना प्रकाश आहे, प्रल्हाद डायरकर आणि केसरबाई ढोनेकर यांच्या घरातील घरगुती साहित्य, धान्य, शेतमाल, कपडे, पाईप यांसह मौल्यवान वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याशिवाय गावातील सेवालाल महाराज मंदिराजवळील मंगल कार्यालय देखील आगीच्या विळख्यात सापडले. येथे १०० गाद्या, ५० चरया, लाईट वायरिंग, पाण्याच्या टाक्या आणि सुमारे १५० प्लास्टिक खुर्च्या जळून गेल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### पेट्रोल पंपावर दुचाकीने घेतला अचानक पेट

**वाशिम :** शहरातील शर्मा पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या दुचाकीने अचानक पेट घेतल्याची घटना एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. मात्र, पेट्रोलपंपावरील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अपघात टळला. सध्या जिल्ह्यात तापमानात मोठी वाढ झाल्याने आगीच्या घटना वाढत आहेत. २४ एप्रिल रोजी दुपारी वाळकी येथील एक व्यक्ती आपल्या दुचाकीला पेट्रोल भरण्यासाठी शर्मा पेट्रोल पंपावर आला असता, त्या वाहनाने अचानक पेट घेतला. यामुळे काही क्षणासाठी परिसरात भीती आणि धावपळ निर्माण झाली. तथापि, पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत अग्निशमन पावडर यंत्राचा वापर करून आग तत्काळ विझविली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

### कारंजात आग लागून भाजीपाल्याची तीन दुकाने खाक

**कारंजा लाड :** शहरातील झांशी राणी चौकात रस्त्याच्या कडेला असलेल्या भाजीपाला विक्रेत्यांच्या दुकानांना २४ एप्रिल रोजी दुपारी अचानक आग लागून दोन ते तीन ठेले पूर्णतः जळून खाक झाले. अग्नीशमन विभागाच्या तत्काळ कारवाईमुळे आगीवर नियंत्रण मिळिवण्यात यश आले. प्राप्त माहितीनुसार, झांशी राणी चौकातील रस्त्याच्या दुभाजकालगत नेहमीप्रमाणे भाजीपाला विक्रेत्यांचे ठेले उभे होते. २४ एप्रिल रोजी दुपारी अचानक या ठेल्यांना आग लागली. आगीची माहिती मिळताच रुग्णवाहिकेचे शुभम खाँडे आणि श्री गुरु मंदिरचे पॅरामेडिक रमेश देशमुख यांनी तात्काळ फायरमन शुभम झोपाटे यांना कळवले. यानंतर चालक बालू कठोये, फायरमन नरेंद्र भोयर, राहुल गुल्हाणे, सचिन ठाकूर, कैलास बारबोले, शुभम झोपाटे, संकेत अगामे, अनुराग बारबोले, सोनू खान आणि इमरान खान यांनी घटनास्थळी पोहोचून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत २ ते ३ ठेले पूर्णतः जळून खाक झाले होते. या घटनेमुळे थोडा वेळ झांसी राणी चौकात वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

### लोणी बुद्रुक येथे आरा मशीनला भीषण आग

रिसोड : तालुक्यातील श्री क्षेत्र लोणी बुद्रुक येथील गांधारी रस्त्यालगत गट क्र. २३६ मध्ये असलेल्या आरा मशीनला दुपारी ३ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. आरा मशीन परिसर लाकडांनी भरलेला असल्याने आगीने झपाट्याने रौद्र रूप धारण केले, आणि त्यात परिसरातील तीन ते चार घरेही आगीच्या विळख्यात सापडली. या घटनेत लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. लोणी बुद्रुक येथील गणेश ग्यानुजी घायाळ यांच्या सामायिक मालकी असलेल्या आरा मशीनला दुपारी ३ वाजताच्या दरम्यान भीषण आग लागली.

### गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

**रिसोड :** तालुक्यातील सवड येथे एका युवा शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता च्या दरम्यान उघडकीस आली. विशाल लक्ष्मण कोल्हे (३० वर्ष राहणार सवड ) असे मृताचे नाव आहे. त्याने त्याच्या सवड शेत शिवारातील शेतात लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. विशाल च्या आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही.

# पीकविम्यासाठी ‘स्वाभिमानी’चे ठिय्या आंदोलन

## ५ मेपर्यंत मोबदला न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**वाशीम, दि. २५ :** खरीप हंगाम २०२४ मधील पीकविमा आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई अद्याप मिळालेली नाही, त्याचा तीव्र निषेध करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी एकदिवसीय ठिय्या आंदोलन केले. युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात जिल्ह्यातील हजारो शेतकरी सहभागी झाले.



वाशिम जिल्ह्यातील शेतकरी अजूनही खरीप २०२४ मधील अतिवृष्टी आणि निसर्गाच्या कोपामुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी संघर्ष करत आहेत. पीकविमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी विमा हप्ते भरूनही अद्याप त्यांना विमा रक्कम प्राप्त झालेली नाही. शासनाकडून जाहीर झालेली अतिवृष्टीची नुकसान भरपाई सुद्धा वितरित झालेली नाही. यावेळी इंगोले म्हणाले, शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी आणि शासनाने वेळोवेळी फसवले आहे. ५ मेपर्यंत विमा आणि अतिवृष्टीच्या मदतीचे पैसे मिळाले नाही तर आम्ही तीव्र आंदोलन करू. याशिवाय उच्च न्यायालयात याचिका दाखल करून कायदेशीर लढाही दिला जाईल, असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, प्रशासनाकडून शेतकऱ्यांनी केलेल्या या आंदोलनाची दखल घेतली जाते का? याकडे लक्ष लागले आहे.

येत्या १ मे रोजी पालकमंत्री दत्ता भरणे, तर ४ मे रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाशिम जिल्ह्यात येणार आहेत. यापूर्वीच शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून त्यांना पीकविमाचा मोबदला देण्यात यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. इंगोले यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शेतकऱ्यांचे पैसे मिळाले, तर स्वागत करू; अन्यथा मंत्र्यांना रोषाला सामोरे जावे लागेल.

खरीप हंगाम २०२४ मध्ये वाशिम जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कपाशी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते; परंतु आजतागायत बहुसंख्य शेतकऱ्यांना ना पीकविमाचा मोबदला मिळाला, ना शासनाने जाहीर केलेली नैसर्गिक आपत्तीची मदत. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या काय?

१. खरीप २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट आणि तात्काळ पीकविमा रक्कम देण्यात यावी.
२. शासनाकडून जाहीर झालेली अतिवृष्टीची नुकसान भरपाई तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी.
३. रब्बी हंगाम २०२३ साठी फक्त काही शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळालेली आहे. ही रक्कम सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट देण्यात यावी.

**राज्याचे उपमुख्यमंत्री लवकरच वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या भेटीच्या वेळी हे निवेदन त्यांना वैयक्तिकरित्या देण्यात येणार असून, त्यानंतरही जर शासन आणि विमा कंपनीने योग्य प्रतिसाद दिला नाही, तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने न्यायालयीन लढाई लढण्यात येईल. शेतकऱ्यांचे हक्क मिळवण्यासाठी कोर्टाची पायरी चढण्यास मागेपुढे पाहिले जाणार नाही, असा ठाम इशारा संघटनेकडून देण्यात आला. या आंदोलनामुळे जिल्हा प्रशासनासह विमा कंपनीवरही दबाव वाढण्याची शक्यता आहे. हजारो शेतकऱ्यांच्या भावना आणि उद्विग्नतेचा विस्फोट आजच्या आंदोलनात प्रकर्षाने दिसून आला.**

## विळेगाव फाटा ते अंतरखेडा रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**कारंजा, दि. २५ :** : कारंजा-अमरावती मुख्य रस्त्यावर असलेल्या विळेगाव येथुन अंतरखेडा या जोडगावी जाण्यासाठी केवळ २ किमीचा डांबरी रस्ता आहे. मात्र, या रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत बिकट असून, वाहन चालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गाची अवस्था इतकी खराब झाली आहे की, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात खेर्डीवरील पुलाचे काम सुरू असल्यामुळे कारंजा-मूर्तिजापूर मार्गावरील वाहतूक विळेगाव-भडशिवणी-अंतरखेडा या रस्त्यावर वळवण्यात आली होती. त्यामुळे या मार्गावर वाहतूक भार प्रचंड वाढला आणि डांबरी रस्त्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. रस्त्याचे बांधकाम चार वर्षांपूर्वी झाले असले तरी, आजपर्यंत संबंधित ठेकेदाराने देखभाल दुरुस्तीचे कोणतेही काम केले नाही. कामाच्या निकृष्ट दर्जामुळे रस्ता लवकरच खचला आणि चाळण झाला आहे. यासंदर्भात वारंवार बांधकाम विभागाकडे तक्रार करण्यात आली, मात्र त्यांनी ठेकेदारावर कोणतीही कारवाई केली नाही.

याबाबत विळेगाव सरपंच इंदूबाई शंकरराव घुले, भाजपचे कारंजा तालुका सरचिटणीस संजय घुले यांनी वाशिम येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन रस्ता दुरुस्तीची मागणी केली आहे. गावकऱ्यांचाही या मागणीला जोरदार पाठिंबा असून लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## पुलाच्या बांधकामामुळे पुराचे पाणी शेतात शिरण्याची भीती

### शेतकऱ्याची प्रशासनाकडे तक्रार: कॉलम भिंतीची दिशा बदलण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**इंझोरी, दि. २५ :** इंझोरी ते म्हसणी रस्त्यालगत असलेल्या नाल्यावर सुरू असलेल्या पूल बांधकामामुळे पुराचे पाणी शेतामध्ये वळवले जात असल्याची तक्रार शेतकरी विष्णू गोविंदराव राठोड यांनी जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता आणि तहसीलदार मनोरा यांच्याकडे केली आहे.



इंझोरी ते म्हसणी रस्त्यालगत असलेल्या नाल्यावर उंच कॉलम भिंतीचा पूल मंजूर करण्यात आला आहे. सध्या या पुलाचे काम सुरू आहे. मात्र, या कॉलम भिंतीची दिशा पुराच्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाऐवजी शेताच्या दिशेने केल्याने, पावसाळ्यात शेतात पुराचे पाणी शिरून २२ एकर क्षेत्राचे नुकसान होण्याची भीती राठोड यांनी व्यक्त केली आहे. विष्णू राठोड यांनी तक्रारीत असेही नमूद केले की, उजाड बिडगाव, जामणी व दापुरा या गावांतील नाल्यांचे पाणी पावसाळ्यात इंझोरी गावालगतच्या नाल्यातून वाहते. त्यामुळे रस्ता अनेकदा बंद पडतो. शासनाने ही बाब लक्षात घेऊन येथे नवीन उंच पूल मंजूर केला. परंतु, ठेकेदाराने कॉलम भिंत चुकीच्या दिशेने उभी केल्यामुळे पुराचे पाणी थेट त्यांच्या शेतात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संदर्भात राठोड यांनी ठेकेदार आणि अभियंत्यांना तोंडी सूचनाही दिल्या.मात्र, ठेकेदाराने कुठलाही बदल करण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रार केली असून, कॉलम भिंतीची दिशा बदलावी, अन्यथा नुकसान झाल्यास शासनाने भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

## दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ कारंजात तीव्र निदर्शने

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**कारंजा लाड, दि. २५ :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भाजपा कारंजा शहर आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने २३ एप्रिल रोजी स्थानिक जयस्तंभ चौक येथे तीव्र निदर्शने करण्यात आले.

यावेळी भारत माता की जय तथा पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना दोन मिनिटे मौन धारण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



भाजपा जिल्हा कार्यकारी अध्यक्ष राजु पाटील राजे यांच्या सुचनेनुसार आणि भाजपच्या कारंजा शहर अध्यक्ष प्राजक्ता माहितकर यांच्या नेतृत्वात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. तसेच भारताने या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर द्यावे आणि आतंकवादयांना भर चौकात फाशी द्यावी अशी भावना शहर अध्यक्ष माहितकर यांनी व्यक्त केली. या प्रसंगी संचालन तथा प्रास्ताविक संदिप काळे यांनी केले. यावेळी भाजपा माजी तालुकाध्यक्ष राजीव काळे,तेजपाल भाटिया, सस्तीकर, शुभांगी कौंडण्य, अनिता कोळसे, प्रीती धाकतोड, शुभांगी रावळे , रजनी दहातोंडे, सोनाली विरूळकर, अर्चना देसाई , भाजप कामरगाव मंडळ अध्यक्ष संजय लाहे, संदीप कुऱ्हे , विनीत गोलेछा, जिग्नेश लोढाया, किरीट रायचुरा, अतुल धाकतोड,गोपाल पुणेवार,प्रभाकर घोडसाड , समीर देशपांडे, निलेश कडू, अमित संगेवार, मोहन पंजवाणी, जावेद कामनवाले, लक्ष्मण कालीवाले, प्रदीप लाहे, निखिल घुडे, विनय गुल्हाने, अरुण घोडसाळ, मयूर लळे, सविज जगताप, राम देशमुख, सुनील गुल्हाने , पंकज राय, रवी शहाकार, शंतनू बोरकर, किशोर सोळंके, अनंता राईतकर, गजानन खोडे, दीपक फड, श्रेयस लाहे, , ब्रिज वानखडे यांच्यासह इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## गोर बंजारा समुदायाला अनुसूचित जमातींचे आरक्षण द्या

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**मंगरूळपीर, दि. २५ :** आदीम सभ्यता जोपासत समान बोली,एकसमान वहीवाट, समान धाटी,विशीष्ट भुप्रदेशात गावकुसाबाहेर असलेल्या २९ घटकराज्यातील गोर बंजारा समाजाला आदीवासी चे आरक्षण द्यावे अशी मागणी गोर सेनेने भारत सरकारला निवेदनातून केली आहे.देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना मंगरुळपीर तहसिलदार मार्फत पाठविलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.



निवेदनात नमुद गोर सेनेने म्हटले आहे की,गोर बंजारा समाज महाराष्ट्रात आणि भारतातील इतर राज्यांमध्ये राहतो. आमच्या समुदायाची एक वेगळी वांशिक ओळख आहे, अद्वितीय सामाजिक-सांस्कृतिक परंपरा, भाषिक वारसा आणि ऐतिहासिक पद्धती ज्या भारतीय राज्यघटनेने परिभाषित केल्यानुसार अनुसूचित जमातींच्या वैशिष्ट्यांशी जवळून जुळतात. मान्यताप्राप्त एसटी समुदायांसोबत समान सांस्कृतिक आणि सामाजिक वैशिष्ट्ये सामायिक करूनही, गोर बंजारा सर्व राज्यांमधील अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये समान रीतीने समाविष्ट केलेले नाहीत. यामुळे विषमता, उपेक्षितपणा आणि आदिवासी समुदायांच्या उत्थानासाठी संवैधानिक अधिकार आणि फायद्यांपासून वंचित ठेवण्यात आले आहे.याआधी केंद्र सरकारच्या पातळीवर सरकारने आमचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याचा प्रयत्न केला, पण ते यशस्वी होऊ शकलले नाहीत.आपली एकच संस्कृती, वेष, अनोखी भाषा आहे आणि इतर सर्व पैलूंमध्ये आपल्याला लमाणी, लंबाडा, सुगली, बंजारा, नायक, नायक बंजारा, सिरकी बंजारा, बाजीगर असे संबोधले जाते.आपले गोर बंजारा प्राचीन काळापासून ब्रिटीश आणि मोगलांसह इतर परकीय आक्रमकांविरुद्ध लढले आणि बलिदान दिले गेले. गोर बंजारा समाजाचा गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ मध्ये समावेश करण्यात आला असून, ब्रिटिशांनीही गोर बंजारा यांना जमाती म्हणून मान्यता दिली आहे. परंतु, स्वतंत्र भारत सरकारने गोर बंजारा यांना अनुसूचित जमाती म्हणून मान्यता दिलेली नाही.

## मालेगाव तालुक्यात ४२ ग्रामपंचायतीत महिलाराज

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**मालेगाव, दि. २५ :** तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले असून, यंदा ४२ ग्रामपंचायतीवर महिलांचे वर्चस्व राहणार आहे. अनेक गावांमध्ये सरपंचपद महिलांसाठी राखीव झाल्याने इच्छुक पुरुष उमेदवारांचे मनसुबे धुळीस मिळाले आहेत.



ग्रामपंचायतीतील आरक्षण सोडत प्रक्रिया तहसील कार्यालयात नुकतीच पार पाडली. तालुका स्तरावर यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत प्रशासनाच्या देखरेखीखाली पारदर्शक पद्धतीने आरक्षण जाहीर करण्यात आले. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिलांसाठी राखीव जागांची नोंद घेण्यात आली आहे. आरक्षणाच्या घोषणेनंतर काही ठिकाणी नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून, आरक्षण प्रक्रियेवर आक्षेपही नोंदवले गेले आहेत, तर काही इच्छुकांनी न्यायालयीन लढाईचा इशाराही दिला आहे.

यंदा आरक्षणामुळे अनेक ग्रामपंचायतीमध्ये महिलांचे नेतृत्व दिसून येणार आहे. काही नवख्या महिलांसह अनुभवी महिला कार्यकर्त्यांचीही निवडणूक लढण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे ग्रामीण राजकारणात महिला नेतृत्वाचे नवे पर्व सुरू होण्याची चिन्हे दिसून येत आहेत, ग्रामपंचायतींमध्ये महिलांचा वाढता सहभाग ही लोकशाही प्रक्रियेच्या बळकटीसाठी सकारात्मक बाब मानली जात आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागातील राजकारण लवकरच तापणार आहे. सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच इच्छुकांनी गाव पातळीवर तयारी देखील सुरु केली आहे. अनेकांच्या गाठी भेटी घेण्यावर भर दिला जात असून, सामाजिक कार्यातही सक्रीय सहभाग वाढला असल्याचे दिसून येते.

### सरपंचपद रिक्त राहण्याची शक्यता

मालेगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. ५ गावांत अनुसूचित जमातीसाठी तर ८ गावांत अनुसूचित जाती महिला वर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले; मात्र काही गावांत संबंधित समाजाची लोकसंख्या नसल्याने या ठिकाणी सरपंच पदे रिक्त राहण्याची शक्यता आहे. गतवर्षीही असाच प्रकार घडला होता. स्थानिकांनी वास्तवाला धरून आरक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे.

## सोनलचे पाणी सोडले: टंचाईवर मात करण्यास मदत



**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**शेलूबाजार, दि. २५ :** परीसरातील अडाण नदी काठावरील ४० गावे सध्या तिव्र पाणी टंचाईचा सामना करत आहे. म्हणून सोनल प्रकल्पाचे पाणी सोडण्यासाची मागणी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग वाशीम यांच्या कडे सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कोठाळे यांनी लावुन धरली होती.आज पाणी सोडण्यात आले. यासाठी आमदार शामभाऊ खोडे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत दादा ठाकरे, खरेदी विक्री संघाचे संचालक नारायणराव बारड यांनी यासाठी पाठपुरावा केला. तसेच कार्यकारी अभियंता पिदडी शाखा अभियंता उपासने यांच्या साकारात्मक भुमीके मुळे पाणी सुटु शकले. . शेतकऱ्यांनी सुद्धा पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा सावता परिषदेचे कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी केले आहे.

# अकोट शहर स्वयंघोषित बंद







अकोट: येथील पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज विविध पक्षांकडून तसेच सकल मराठा व सर्व व्यापारी संघटनेच्यावतीने बंद पाळण्या आला. यावेळी शहरातील प्रमुख बाजारपेठेतील दुकाने छोटे व्यवसाकांनी आपली दुकाने बंद ठेवल्याचे दिसून आले.

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २५ :** येथील पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ २५ एप्रिल रोजी अकोट शहर बंदचे आवाहन विविध पक्षांकडून तसेच सकल मराठा व सर्व व्यापारी संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.जम्मू काश्मीर येथील पुलवामा हल्ल्यात २८ नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. त्या घटनेचा निषेध म्हणून २५ एप्रिल रोजी अकोट शहर स्वयंघोषित बंद ठेवण्यात आला आहे.सदर बंद शहरातील सर्व संघटना सर्व व्यापारी संघटना व छोटे-मोठे व्यवसायिक स्वतः हून आपले दुकाने बंद ठेवण्यात आली आहे.पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्लाने संपूर्ण समाजमन सुन्न झाले असून,त्याचा सर्वच स्तरातून व क्षेत्रातून तीव्र निषेध व्यक्त होत आहे.हे हल्ले पुन्हा होऊ नये, यासाठी त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, अशा भावना जनमाणसातून व्यक्त होत आहेत.या आकोट शहर बंदने शासनानी याची दखल घेतली पाहिजे म्हणून सर्व व्यावसायिक व व्यापारी संघटनेच्यावतीने आज अकोट शहर बंद ठेवण्यात आले आहे.

## थोडक्यात

### मुंबई ते नागपूर एकेरी विशेष रेल्वे गाडी २८ एप्रिलला

**अकोला :** ग्रीष्मकालीन रेल्वे प्रवाश्यांची गर्दीची मागणी लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते नागपूर दरम्यान एकेरी विशेष गाडी २८ एप्रिल पासून चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्रमांक ०१०१७ विशेष दिनांक २८.एप्रिल .२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ००.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी नागपूर येथे १५.३० वाजता सुटेल. ही गाडी दादर, ठाणे, कल्याण, नासिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धाया रेल्वे स्थानकांवरून एक वातानुकूलित द्वितीय, दोन वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, ६ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅनसह धावणार आहे.

### संत गोरोबाकाका पुण्यतिथी सोहळा आज



**अकोला :** डाबकी रोड येथील गजानन नगर स्थित संत गोरोबाकाका मंदिरामध्ये कुंभार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी विठ्ठल भक्त संत गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथी सोहळा आज शनिवार दि.२६ एप्रिल रोजी होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा महाराष्ट्र कुंभार समाज विकास परिषद (अकोला) तसेच संत गोरोबाकाका उत्सव समिती यांच्या सयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी मूर्ती पूजन व तीर्थ स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण नथ्थुजी साविकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे तसेच आज शनिवार दि.२६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता ह.भ.प. महंत श्री श्री१००८ स्वामी सुरेश्वरानंदजी गिरी उर्फ दासगिरी महाराज ( रा.कृष्णाईनगर गोरक्षण आंबोडा तालुका अकोट ) यांचे मधुर वाणीतून काल्याचे कीर्तन पार पडणार असुन महाप्रसादाने कार्यक्रमाचे समापन होणार आहे. कार्यक्रमाला समस्त कुंभार समाज बांधवांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष महाराष्ट्र कुंभार समाज विकास परिषद अकोला तसेच गोरोबा उत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सर्व शाखीय कुंभार समाज उपवर युवक युवती परिचय पुस्तिकेचे विमोचन

**अकोला :** डाबकी रोड गजानन नगर स्थित असलेल्या संत गोरोबा कुंभार यांच्या मंदिर सभागृहात संत शिरोमणी विठ्ठल भक्त गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीचे औचित साधून सर्वशाखीय कुंभार समाज उपवर युवक युवती परिचय पुस्तिकेचे विमोचन शनिवार दि.२६ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता मा.जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे हस्ते होणार आहे. ग या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण साविकर हे राहणार असून कूंभार समाजातील प्रथमतः सर्वशाखीय कूंभार वर वधु परिचय समितीच्या अग्रीम पुढाकाराने समाजातील नव युवक युवतीचे ऋणानुबंध जुळणे सोयीस्कर होईल या उदात्त हेतूने समाजसेवेसाठी केलेला एक प्रयत्न असून त्या परिचय पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला कुंभार समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सर्व शाखीय कुंभार वधू वर परिचय समिती अध्यक्ष प्राध्यापक दिलीप अप्तुरकर यांच्या समवेत संतोष सरोदे, रामदास गाडेकर, पुंडलिकराव वनकर,प्रकाश चांदुरकर,नानासाहेब सौदागर, रामचंद्र मेहरे,राम मेहरे प्राध्यापक नंदकिशोर थुटे,ॲड. अरुण सौदागर सुनील साविकर, संजय वाडकर,पत्रकार राजेश साविकर,गणेश पासूळकर, चंद्रशेखर खोबरे,मनोज लोधे, रुपेश मांगुळकर,गोपाल मेहरे, रोहित हिवरकर,विजय पोहनकर ईत्यादी सदस्यांनी केले आहे.

### शिवणी येथे वैभव खांडेकर यांचा सत्कार

**शिवणी :** अकोला महानगर पालिका प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवणी येथील रहिवासी तथा संत गाडगेबाबा सहकारी सुत गिरणी शिवापुर येथील गुणवंत कामगार दादाराव खांडेकर यांचा मुलगा वैभव खांडेकर याची आयडीबीआय बॅकेच्या कृषी अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल त्याचा श्री समर्थ सदगुरु सेवा समिती शिवणी यांच्या वतीने समीतीचे अध्यक्ष तथा डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी उपकुलसचिव शांताराम मुरुमकार यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना शांताराम मुरुमकार यांनी वैभव खांडेकर याने अतिशय कठोर परिश्रम घेऊन मिळविलेल्या घवघवीत यशाचे कौतुक केले व त्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी त्याचे सावतराम मुरुमकार, शाहदत्ता मुरुमकार, प्रभाकर मुरुमकार, नाना मुरुमकार, मधुकर ढोरे, विश्वास लोडम, गजानन मुरुमकार आदींसह अनेकांनी त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी बोलतांना वैभव खांडेकर याने सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुदृढ आरोग्य हा जिवनाचा मुलभूत पाया असुन उत्तमोत्तम आरोग्य प्राप्तीसाठी योग महत्वाचा घटक-डॉ. राजेश डांगे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २५ :** आरोग्य हा जीवनातील यशाच्या पाया आहे सुदृढ आरोग् व उत्तमोत्तम आरोग्य प्राप्तीसाठी दैनंदिन जीवनात योगला महत्त्वाचा घटक मानले जाते.असे प्रतिपादन सनवाद आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ. राजेश डांगे यांनी केले आहे ते अकोट तालुक्यातील आसेगाव (बाजार)येथील श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री.शिवाजी विद्यालयातर्फे आयोजित उन्हाळी व्यक्तिमत्व विकास शिबीर २०२५ या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

विद्यार्थी जिवनाचे ध्येय काय? हे सांगतांना डॉ.डांगे पुढे म्हणाले की,शिक्षण,नोकरी,व्यवसाय, कला, क्रिडा ईतर सर्वच क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शांत व समाधानी तसेच व्यसन वाईट प्रवृत्तीपासून कोसोदुर राहण्यासाठी मन नेहमी सकारात्मक असणे गरजेचे ठरते असे मत डॉ.डांगे यांनी विषद केले. गुरुवार दि.२४ एप्रिल पासुन उन्हाळी व्यक्तीमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.गजाननराव पुंडकर (उपाध्यक्ष श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) हे होते.कार्यक्रमाचे उद्घाटक शाळा समिती निमंत्रीत सदस्य अशोकराव पाचडे तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. राजेशजी डांगे(सनवाद आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक) राजेश पुंडकर,पत्रकार राजेश साविकार,रमेश धांडे,जि.प.शाळा आसेगांव (बाजार)च्या मुख्याधापिका सुरेखा मोहोड तसेच लक्ष्मणराव कळसकार यांची उपस्थिती लाभली होती. सतत सहा दिवस चालणाऱ्या शिबिरामध्ये योग प्राणायाम, व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शन, खेळ व व्यायाम,शिष्यवृत्ती परिक्षा मार्गदर्शन,चित्रकला व हस्तकला,तसेच परिक्षा मार्गदर्शन तथा आरोग्य,सुरक्षा विषयक मार्गदर्शन आदि कार्यक्रम पार पडणार आहेत .

## पहलगाम येथील हल्ल्याच्या निषेधार्थ अकोट तालुका शिवसेना युवा सेनेचे तीव्र आंदोलन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २५ :** काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेकी मुस्लीमांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड गोळीबार आणि हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या अमानवी आणि कायर हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी अकोट तालुका शिवसेना-युवासेनेच्या वतीने दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी तीव्र आंदोलन करण्यात आले.शिवसेना पक्षनेतृत्वाच्या आदेशानुसार हे आंदोलन शिवसेना उपजिल्हाप्रमुख मनीष रामाभाऊ कराळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. अकोट तालुक्यातील विविध गावांमधून आलेले



शिवसैनिक, युवासेना कार्यकर्ते तसेच हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या निषेध आंदोलनात सहभागी झाले होते.या निषेध आंदोलनादरम्यान, उपस्थित कार्यकर्त्यांनी पाकिस्तानचा झेंडा जाळत त्याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. ''पाकिस्तान मुर्दाबाद'', ''भारत माता की जय'', ''अतिरेक्यांचा नाश होवो'' अशा घोषणा देत देश आला. तसेच पाकिस्तानचे अपडेट्स मिळवण्यासाठी त्यांना पायाखाली तुडवण्यात आले. या कृतीद्वारे कार्यकर्त्यांनी आपल्या देशभक्तीचा आणि राष्ट्रभक्तीचा रोष व्यक्त केला. तालुक्यातील अनेक हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. एकत्र येऊन त्यांनी एक सुरात देशद्रोह्यांच्या विरोधात आवाज उठवला.अकोट शहरातील प्रमुख चौकात हे आंदोलन पार पडले. परिसरात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आंदोलकांनी शांततेत परंतु जोशपूर्ण वातावरणात आंदोलन केले. या वेळी पोलिस प्रशासनाची दक्षता पाहायला मिळाली.अकोट तालुक्यातील नागरिक, विशेषतः युवा वर्गाने या आंदोलनाला भरभरून प्रतिसाद दिला. सोशल मीडियावरही या निषेध आंदोलनाचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. ''देशाच्या सुरक्षेसाठी आम्ही नेहमी सज्ज आहोत,'' असा संदेश यामधून देण्यात आला. देशात पर्यटनासारख्या क्षेत्रात वाढ होत असताना अशा अतिरेकी हल्ल्यांमुळे जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा मलीन होऊ शकते. म्हणूनच केंद्र आणि राज्य सरकारने या घटनांचा मुळापासून बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## मोर्णा मस्य सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी मनोहर सौंदळे तर उपाध्यक्षपदी दिलीप इंगळे यांची अविरोध निवड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातुर, दि. २५ :** २३ एप्रिल २०२५ निवडणूक निर्णय अधिकारी सहकारी संस्था पदुम अकोला व्ही एम बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मोरणा मस्य सहकारी संस्था मर्यादित पातुर ३१३ या संस्थेच्या अध्यक्षपदी मनोहर उत्तम सौंदळे व उपाध्यक्षपदी दिलीप शंकर इंगळे यांची अविरोध निवड करण्यात आली अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी अनुक्रमे प्रत्येकी एकच अर्ज आल्यामुळे सदरची निवड ही अविरोध करण्यात आली सदर सभेला संस्थेचे संचालक तथा संस्थेचे माजी अध्यक्ष पुंडलिक जयराम श्रीनाथ, सुरेश उत्तम सौंदळे गोपाल श्रीराम म्हात्रे, विनोद काशीराम श्रीनाथ,गजानन महादू करवते, समाधान महादू करवते, नवनीत



प्रकाश वानखडे,अनिता सुरेश मेसरे, लक्ष्मीबाई शालिग्राम माहुरे,प्रकाश सिताराम पाटील, प्रामुख्याने उपस्थित होते अविरोध निवडणुकीची घोषणा होऊन उपस्थिताचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावतीने आभार मानण्यात आले त्यांना निवडणूक सहकार अधिकारी श्रेणी दोन ओ ई बे यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच जिल्हा संघाचे व्यवस्थापक श्रीधर मोडक यांनी समन्वय साधून निवडणूक शांततेने पार पाडण्याकरता संबंधितांना सहकार्य केले सभेनंतर अविरोध निवड झालेल्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे मिठाई वाटून अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी गजानन दांडगे प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष वसंतराव जानोजी मेसरे संस्थेचे माजी संचालक सुरेश श्रीनाथ तसेच सामाजिक कार्यकर्ते संजू बकोरे व जिल्हा नवनिर्वाचित संचालक गणेश गाडगे यांनी उपस्थितांचे व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक मंडळ कटिबद्ध राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच मार्गदर्शक म्हणून पुंडलिकराव जयराम श्रीनाथ यांनी संस्थेचे कामकाज पहावे असे एकमताने ठरले .

## दिवसा घरफोडी करणाऱ्यास मुद्देमालासह दोन तासात अटक; अकोट ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २५ :** दि.२५/०४/२०२५ रोजी फीर्यादी शुभम तुळशीराम वानखडे वय ३० वर्ष रा.मुंडगाव यांनी रिपोर्ट दिला की,ते दिनांक २३/०४/२०२५ रोजी फिर्यादींचे घरी आलेले लग्नाचे पाव्हणे व त्यांची बहिण तिच्या सासरी निघून गेल्याने फिर्यादी व त्यांचे पत्नीने कपाटातील सोने व पैसे चेक केले असता,त्यांना त्यांचे पत्नीचे कपाटात ठेवलेले ११.१३० मिली ग्रॅम सोन्याचे टॉपस् व त्याची चैन असे एकुण १,००,०००/-रू. किंमतीचे तसेच कपाटात ठेवलेले रोख २५,०००/-रू. दिसुन आले नाहीत.नमुद सोने व रोख रक्कम ही दिनांक १८/०४/२०२५ रोजी फिर्यादींचे घराचे व कपाटाचे



कुलूप तोडुन चोरून नेले होते. अशा रिपोर्ट वरून पोस्टे ला अपराध न२२२/२५ कलम ३३१(३), ३०५ (५), ३५१ (२) बीएनएस प्रमाणे दि.२५/०४/२५ चे ०१.०० वा गुन्हा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला आहे.सदर गुन्ह्यातील आरोपी याचा शोध घेणेकामी तपासपथक रवाना करूण तपासाचे चक्रे फिरवुन गुन्ह्यातील आरोपी साहील उर्फ गोलु विकास गाडगें वय २३ वर्ष यास अवघ्या दोन तासाचे आत छडा लावुन घटणेसंबंधी उकल करूण आरोपीस गुन्ह्यासंबंधाने विचारपूस करुण गुन्हयात गेलेला ११.१३० मिली ग्रॅम सोन्याचे टॉपस् व नगदी २५०००/रु बाबत आरोपीस विश्वासात घेवुन सदर गुन्ह्यातील गेला माल सोन्याचे टॉपस् चैन एकुण १,००,०००/-रू. चा माल हस्तगत करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे.

## श्री क्षेत्र श्रद्धासागर आकोट येथे बालसंस्कार शिबिराचे आयोजन १ मेपासून

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २५ :** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट व्दारा दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा दि. १ मे ते ३० मे दरम्यान श्रीक्षेत्र श्रध्दा सागर, आकोट येथे बालसंस्कार व सर्वांगीण विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. बालसंस्कार शिबिरांचे आद्यजनक श्री संत वासुदेव महाराज यांनी बालसंस्कार शिबिरांचे गावोगावी आयोजन करून संस्कार रुजविले आहेत. त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे स्मरण करीत संस्था प्रतिवर्षी बाल संस्कार शिबिराचे आयोजन करीत आहे.या बालसंस्कार व सर्वांगीण विकास शिबीरामध्ये तज्ञ मार्गदर्शक / शिक्षकांची नेमणूक



करण्यात आली आहे. या निवासी शिबीरासाठी विद्यार्थी प्रवेश मर्यादित आहेत. प्रथम येण्या-या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. प्रवेश निशुल्क राहील. शिबिरात आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, ज्ञान- विज्ञान, संगणक प्रशिक्षण, योगासने, प्राणायाम, मनोरंजन, संगीत, खेळ व कला विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात फक्त १२ वर्षावरील मुलांना प्रवेश मिळणार आहे, असे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट व्दारा कळविण्यात आले आहे.

### ३० मे रोजी वारकरी शिक्षण संस्थेचा शुभारंभ

स्वानंद सुखनिवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था,श्री.क्षेत्र आळंदी देवाची यांची मान्यताप्राप्त उपशाखा श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे सुरू होत आहे.या वारकरी शिक्षण संस्थेचा शुभारंभ दिनांक ३० मे २०२४ रोजी वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठ महाराज मंडळींच्या हस्ते संपन्न होणार आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्यालयात आपल्या नावाची नोंद करावी.

## अकोट रेल्वे स्टेशनला सीसीआय कमल नयन मृणाल यांची भेट

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २४ :** येथील रेल्वे स्टेशनला २४ एप्रिल रोजी वाशिमचे मुख्य वाणिज्य निरीक्षक (सीसीआय) कमल नयन मृणाल यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी रेल्वे स्टेशनचे निरीक्षण केले. सोबतच उपस्थित प्रवासी व निवेदन करते यांच्याशी संवाद साधला आणि समस्या जाणून घेतल्या.

दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत वाशिमचे मुख्य वाणिज्य निरीक्षक कमल नयन मृणाल, मुख्य माल पर्यवेक्षक अजय यांनी २४ एप्रिलला दुपारच्या सुमारास रेल्वे स्टेशनची पाहणी केली. याप्रसंगी पूर्णा अकोला खंडवा रेल्वे संघर्ष समिती सदस्य विजय जितकर, व्यापारी संघाचे रमण अग्रवाल, अनुपम शर्मा, पत्रकार रवींद्र इंगळे,अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन आकोट शाखा अध्यक्ष मीरा अग्रवाल, निक्की अग्रवाल, संगीता अग्रवाल, सविता अग्रवाल, अमृता वर्मा यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

### पाणपोईचे उद्घाटन

सध्या उन्हाची तीव्रता वाढली आहे. वाढते तापमान पाहता रेल्वे स्थानकावर पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन शाखा अकोटच्यावतीने शीतल पेयजलाची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर पाणपोईचे उद्घाटन सीसीआय कमल नयन मुणाल यांच्या हस्ते करण्यात आले.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलडाणा, शनिवार २५ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा दौरा



**बुलडाणा :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.

त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून म. राज्य परिवहन महामंडळ कार्यशाळेच्या मागे, कऱ्हाळे ले आऊट, जि. बुलढाणा येथे आगमन व मोटारीने कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता टिळक नाट्य क्रीडा मंदिर, बुलढाणा येथे जाहिर आभार सभा. दुपारी २ वाजता मोटारीने कऱ्हाळे ले आऊट हेलिपॅडकडे प्रयाण व आगमन. दुपारी २.४५ वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण करतील.

### उष्माघाताने महिलेचा मृत्यू

**खामगाव:** तालुक्यातील कुन्हा (पारखेड) येथील रहिवासी स्वाती गोपाल काळे (२५) या महिलेने २२ एप्रिल २५ रोजी दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत शेतामध्ये उन्हात काम केले. त्यामुळे तिला ऊन लागल्याने २३ एप्रिल २५ रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास संडास व वांत्या होत असल्यामुळे सामान्य रूग्णालयात उपचारार्थ भरती केले होते. काल २४ एप्रिल रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी मारोती गोपाल काळे यांनी खामगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भान्यासुसं नुसार मर्ग दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. भगवान काळबागे करीत आहे.

### हर्ष इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंगचा उत्कृष्ट निकाल

**खामगाव :** नुकत्याच जाहीर झालेल्या बेसिक बी एस सी नर्सिंग चा निकाला मध्ये हर्ष इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग खामगांव यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यामध्ये दुसऱ्या सेमिस्टर चा निकाल (७३%) तिसरे सेमिस्टर चा (६०%) चौवथ्या सेमिस्टर चा (८०%) असा उत्कृष्ट निकाल लागला. यामध्ये दुसऱ्या सेमिस्टर मध्ये दीपांशु वाडेकर याने प्रथम क्रमांक मिळवून ७८%, तर व्दितीय क्रमांक चेताली चिचोळकर ७७%, तिसऱ्या सेमिस्टर मध्ये निकिता मिसाळ ६३% प्रथम क्रमांक व्दितीय क्रमांक गोपाळ इंगळे ६८% व चौवथ्या सेमिस्टर मध्ये वैष्णवी पडुळकर ७९% प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक पायल आराख ७८% घेऊन हर्ष इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग चा उत्कृष्ट निकाल दिला. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे संस्थाध्यक्ष जनार्दन हरिभाऊ हेंड पाटील व संस्थेचे सचिव हर्षद जनार्दन हेंड पाटील तसेच प्राचार्या यांनी कौतुक करत सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छ दिल्या.

# कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी ना.शिंदे साधणार संवाद

## आ.संजय गायकवाड यांची माहीती: बुलडाण्यात २७ एप्रिल रोजी आगमन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा, दि.२५

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यभरात आभार दौरा काढत आहेत. या दौऱ्याअंतर्गत ते २७ एप्रिल रोजी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. यानिमित्य आभार सोहळा हा स्थानिक जिजामाता क्रिडासंकुल नजिकच्या मोकळ्या मैदानावर घेण्यात येणार असून येथे जवळपास सात हजार नागरिकांची उपस्थित राहणार असल्याची माहीती आमदार संजय गायकवाड यांनी आज २५ एप्रिल रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून दिली.**



आ. गायकवाड पुढे म्हणाले की, सोहळ्यासोबतच स्थानिक विश्राम भवनात जिल्ह्यातील शिंदे सेनेतील सर्व विभागाचे जिल्हा प्रमुख व लोकप्रतिनिधी यांची बैठक आयोजित करण्यात आली असून यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्वांशी संवाद साधणार आहे. संघटनात्मक मजबुतीच्या दृष्टीनेही ही बैठक महत्वपूर्ण मानली जात आहे.

या सोहळ्यांसाठी राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सावंत, आ.प्रकाश आबिडकर उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमाला शिवसेना, युवा सेना, किसान सेना, अल्पसंख्यांक सेना, महिला आघाडी आणि तसेच सर्व पदाधिकारी कार्यकरत्यानी उपस्थित रहावे, असे आवाहन बुलडाणा विधानसभा आमदार संजय गायकवाड यांनी केले आहे.यावेळी कुणाल गायकवाड,गजानन दांदडे यांची उपस्थिती लाभली.

**महाराष्ट्र पोलीस सारखे अकार्यक्षम डिपार्टमेंट जगात नाही : आ.संजय गायकवाड**

महाराष्ट्र पोलीस सारख अकार्यक्षम डिपार्टमेंट जगात कोणताच नाही. असा आरोप आ.संजय गायकवाड यांनी केला.दि.२७ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौ-या निमित्त माहिती त्यांनी पत्राकार परिषदेत दिली.यावेळी बोलतांना आ. गायकवाड म्हणाले की, माझ्या मुलाला धमकीचे पत्रा आले आहे. माझी गाडी उडविण्याचा प्रयत करण्यात आला. काय चौकशी केली पोलिसांनी? महाराष्ट्र पोलीस सारख अकार्यक्षम डिपार्टमेंट जगात नाही, असे आ.संजय गायकवाड म्हणाले.शासनाने कोणताही कायदा केला की पोलिसांचा हप्ता वाढतो, जिल्ह्यात गुटखाबंदी केली हप्ता वाढला, दारूबंदी केली की दारू सुरू करण्यासाठी हप्ता वाढला. या राज्याची आणि देशाची पोलिसांनी इमानदारीने काम केले तर देशाची पूर्ण घाण साफ होतील असे ते म्हणाले.

## जि.प.शाळेच्या पडक्या इमारतीला आग; सागवान जळाले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२५



खामगाव येथील नांदुरा रोडवरील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेच्या पडक्या इमारतीला आग लगल्याची घटना आज सकाळी ११ वाजता घडली आहे. या आगीमध्ये इमारतीच्या छतावरील लाखो रुपयाचे सागवान जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच अतिशामक दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले व पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आग नेमकी कशामुळे लागली याबाबत अद्याप अधिकृत माहिती प्राप्त झाली नाही.

या जिल्हा परिषदेच्या अशाच एका पडक्या इमारतीला गेल्या काही महिन्यापूर्वी आग सागवान लाकडे जळून लागून नुकसान झाले होते.

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम; प्रशांच्या समस्या व निराकरणासाठी प्रत्येक बुधवारी ‘प्रवासी राजा दिन’ व ‘कामगार पालक दिन’

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२५

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्योक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ''प्रवासी राजा दिन'' व दुपारी ३ ते ५ या वेळेत ''कामगार पालक दिन'' आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मे महिण्यासाठी वेळापत्राक जाहिर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाचे कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्राक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील चिखली आगार येथे बुधवार दि. ७ मे, खामगाव आगार येथे बुधवार दि. १४ मे, मेहकर आगार येथे बुधवार दि. २१ मे, मलकापुर येथे बुधवार दि. २८ मे, जळगाव जामोद येथे दि. ४ जुन व शेगांव आगार येथे बुधवार दि. ११ जुन रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

## साखरखेर्डा झालं सैराट ; एकास बसस्थानकावर मारहाण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.२५



येथील मुलींना फुस लाऊन पळवून नेऊन लग्न लावून त्यांचे फोटो सोशल मिडियावर टाकण्याचे प्रकार वाढल्याने गावात अशांतता निर्माण झाली आहे. असाच एक प्रकार २४ एप्रिल रोजी साखरखेर्डा बसस्थानकावर घडला असून एका व्यक्तिस एका गटाने मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून सात व्यक्तिंवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

साखरखेर्डा येथील एका वर्षात किमान २० ते २५ मुलींना फुस लाऊन पळवून नेऊन परस्पर विवाह लावण्याचे प्रकार घडले आहेत. काही प्रकरणात मुलींचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असल्याने पोलीस स्टेशन मध्ये तंक्रार देऊनही काही उपयोग झाला नाही. मुलगा आणि मुलगी यांचे वय लग्नाचे झाल्याने त्यांनी स्वत: च्या मर्जीने विवाह केल्याने पोलीस कोणतीच कारवाई करीत नाही. काही वेळातच दोघांचे लग्न झाल्याचे फोटो सोशल मिडिया वर व्हायरल होत असल्याने समाजात अस्वस्थता निर्माण होत आहे. २१ एप्रिल रोजी असाच एक प्रकार घडल्याने समाजात अस्वस्थता निर्माण झाली. त्याचा परिणाम लगेच दिसून आला. पळवून नेलेल्या युवकांच्या मित्राला काही युवकांनी चांगलाच चोप दिला. हा प्रकार घडत नाही तोच सहा महिन्यांपूर्वी घडलेल्या घटनेचा राग समाजात आजही कायम राहिल्याने विजय हनुमान जैस्वाल यांच्या मुलाने आपल्या मुलीला पळवून नेऊन लग्न करून संसार थाटला आहे. त्याअनुषंगाने २४ एप्रिल रोजी विजय जैस्वाल हा बसस्थानकावरून घरी परत जात असताना मुलीच्या नात्यातील काही युवकांनी त्याला गाठून बसस्थानकावर बेदम मारहाण केली. त्यात विजय जैस्वाल हा गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हरीश अनिल जैस्वाल यांच्या फिर्यादीवरून सात व्यक्तिंवर पोलिसांनी कलम प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत मुलींना फुस लाऊन पळवून नेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. यामागे मोबाईल फोन हे माध्यम आहे. मोबाईल फोनवरून मुलींना आपल्या मायाजाल मध्ये ओढून त्यांना खोटे अमिश दाखवून पळवून नेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आई-वडीलांचे दुर्लक्ष याचा गैरफायदा घेऊन मुलीही आई वडीलांना फसवित आहे. त्यामुळे साखरखेर्डा गावात सैराट सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. यातून काही अनुचित प्रकार घडू नये हीच अपेक्षा.

# सकल मातंग समाज जनआंदोलनात सहभागी व्हा- मा.आ.ससाने

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेगाव दि.२५



मातंग समाज भावी पिढीच्या कल्याणासाठी २० मे रोजी आझाद मैदान मुंबई येथे आयोजित केलेल्या मातंग समाज जन आक्रोश महाआंदोलनात हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी आमदार नामदेवराव ससाने यांनी केले २० मे रोजी मुंबई येथे आझाद मैदानावर होणाऱ्या मातंग समाज जन आक्रोश महाआंदोलनाच्या प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने २४ मे रोजी शेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता बैठकीत मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते संताराम तायडे होते. पुढे बोलतांना माजी आमदार ससाने म्हणाले की कार्यकर्त्यांनी गाव गावात जाऊन समाजाला आरक्षण वर्गिकरणाचे महत्व सांगून त्यांना ह्या महा आंदोलनात. सहभागी होण्यासाठी प्रावृत करावे असेही माजी आमदार ससाने यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. डॉ. अंकुशराव गोतावळे यांनी अनुसुचित जाती आरक्षणाचे उपवर्गिकरण होणे किती आवश्यक आहे.

याबाबत अगदी अभ्यास पुर्ण भाषणां मधून आरक्षणाचा मातंग समाजाला किती अल्पप्रमाणात लाभ झाला याचे आकडेवारी सह सांगून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले तर मारोती वाडेकर यांनी आरक्षण वर्गिकरण करण्या करिता मातंग समाजाच्या प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तींनी येत्या २०मे रोजी असेल त्या परिस्थितीत व मिळेल त्या वाहनाने मुंबईला आझाद मैदानावर येऊन या महा आंदोलनात सहभागी व्हावे तसेच मातंग समाजातील प्रत्येक व्यक्तीने तन मन व धनाने सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. महिलांनी आता मागे न राहता पुरुषांच्या दोन हात पुढे राहून ह्या महा आंदोलनात मोठ्या संखेने सहभागी व्हा असे आवाहन माजी आमदार ससाने यांच्या सुविद्य पत्नी महिला नेत्या सौ अनुषा ससाने यांनी महिलांना केले. प्रस्ताविक मातंग समाजाचे युवानेते संजय बोदडे यांनी केले. त्यानंतर जेष्ठ नेते वामनराव बोरशे व बबनराव बोदडे संताराम तायडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सुत्रसंचलन वामनराव गुडेकर यांनी तर आभारप्रदर्शन भास्करराव आघाम यांनी केले.

यानप्रसंगी कृष्णा नाटेकर महादेव अडायके संजय बापट,आशिष सावळे, मुकेश गवई, महेंद्र वानखेडे, अनिल सकळकर, संजय जाधव, मनोहर तायडे, उमेश बाभूळकर, देविदास फुटवाईक, ओंकार सोनोने,गजानन तायडे,संपत भालेराव, रामेश्वर पाटेकर, रंजित सुर्यवंशी, रेखाताई निखाडे,सिंधूताई पदमणे इत्यादीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यटकावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बुलडाण्यात जाहीर निषेध

### संगम चौकात शिवसेना पक्षाच्यावतीने पाकिस्तान विरोधात जोरदार घोषणाबाजी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडणाणा दि.२५



जम्मू काश्मीर मधील पहलगाम भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ ते २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. ही घटना अतिशय निंदनीय असून या हल्ल्याचा निषेध म्हणून बुलढाणा जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दिनांक २४एप्रिल २५ रोजी संगम चौक बुलडाणा येथे पाकिस्तान मुर्दाबाद निषेध असो निषेध असो दहशतवाद्यांचा निषेध असो अशा जोरदार घोषणाबाजी देत निषेध नोंदविण्यात आला.

यानप्रसंगी संपर्क प्रमुख प्रा नरेंद्र खेडेकर, आ. सिद्धार्थ खरात, प्रवक्त्या सौ जयश्रीताई शेळके, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, वसंतराव भोजने, सह संपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, जिल्हा संघटक गोपाल बछिरे, डी एस लहाने सर, जिल्हा समन्वयक संदिप दादा शेळके, युवासेना जिल्हा प्रमुख नंदु कऱ्हाडे, अँड सुमित सरदार, म आ उप जिल्हा प्रमुख संजीवनी वाघ, प्रा आशिष रहाटे, सुनील घाटे, बद्रि बोडखे, तुकाराम काळपांडे यांचे सह शिवसेनेच्या सर्वच आघाडीचे जिल्हा प्रमुख, उप जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, विधानसभा संघटक, तालुका संघटक, उप तालुका प्रमुख , विभाग प्रमुख, उप विभाग प्रमुख यांचेसह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मलकापूर येथे जैन ऐक्य रॅलीत उमळला जनसानार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.२५




जैन समुदायावर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात, मुंबईतील जैन मंदिर पाडण्याच्या विरोधात, जैन संतांवरील अमानुष हल्ल्यांविरोधात, जैन तीर्थक्षेत्रांच्या संरक्षणासाठी आणि मंगळवार, २२ एप्रिल रोजी पर्यटकांवर झालेल्या क्रूर अमानुष दहशतवादी अत्याचारांविरुद्ध गुरुवार, २४ एप्रिल रोजी सकल श्री जैन संघ मलकापूरच्या वतीने भव्य जैन एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

जैन कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांसह माता-भगिनी, पुरुष-मुलांनी सहभागी होऊन श्वेत वस्त्र परिधान करून, निषेध म्हणून हाताला काळ्या पट्ट्या बांधून, हातात जैन ध्वज आणि घोषणा फलक घेंउन सम्मिलित होत संघिक एकतेचा संदेश दिला. सकल जैन संघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भाजप, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पदाधिकारी, मुस्लिम धार्मिक बांधव आणि इतर धार्मिक मित्र सहभागी झाले होते. एकता रॅली समाप्त होईपर्यंत लोकांनी स्वयंस्फूर्त आपापल्या व्यवसाय, व्यापार, उद्योग, नोकऱ्या इत्यादींपासून विश्रांती घेतली आणि रॅली यशस्वी करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने सहभागी झाले. आज सकाळी ठीक १०:४५ वाजता, रॅली श्री सुमतीनाथ भवन येथून सुरू झाली आणि तहसील कार्यालयात पोहोचल्यानंतर तिचे सभेत रूपांतर झाले. सर्वप्रथम पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या देश बांधवांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळण्यात आले नंतर तहसीलदार याना निवेदनातील मानण्या वाचुन दाखवत तहसीलदारांना निवेदन देऊन सभेची सांगता झाली.

संघपतीच्या सर्वश्री उत्तमचंद आबाद, भरतकुमार दंड , सुहास (बंडू) चवरे, यांचे नेतृत्वात तथा सकलश्री जैन संघ मलकापूरच्या प्रमुख व अमूल्य उस्थितित रैली काढण्यात आली. सकल संघाच्या समस्त विश्वस्त मंडळांसह सर्वश्री सागर कोचर, रमणिकलाल पटणी, सुगनचंद आबड, सुगनचंद भंसाली, संतोष संचेती, शिरीष बुरड, वर्धमान पारख, राहुल कोचर, अंकित कोरडिया, उल्हास संचेती, दिशांत चवरे, डॉ. नीरज क्षीरसागर, राहुल जंगम, सचिन क्षीरसागर, प्रदीप चवरे, संजय पेठकर, दिनकर फुलसुंगे, संदेश निरखे, समीर जटाळे, नवल सराफ, आनंद जैन, संदीप नहार, दिनेश दोशी, परेश घिरणीकर, विजय गोठी, डॉ. योगेश पाटणी, नीरज चवरे, आशिष बांगडे, जय डागा, सर्वेश संचेती, दर्शन भंसाली आदी सर्व तरुणांनी परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५

## थोडक्यात

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती :** केंद्र शासनाच्या बालकविकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविण्यात आले आहेत. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वय ५ वर्षापेक्षा अधिक आणि १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य क्षेत्रांमध्ये विशेष कामगिरी केली असल्यास त्यांना पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी पात्र उमेदवारांनी .. या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. इच्छुक विद्यार्थी, त्यांच्या वतीने पालक, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आदी संस्थाही प्रस्ताव सादर करू शकतात. पात्र विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांनी केले आहे.

### चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी अटक




**अमरावती, दि. २४ :** पती-पत्नीत नातेवाईकाकडे घराला कुलूप लावून गेले होते. आरोपीने घराच्या दाराचे कुलूप तोडून लॉकरमधून सोन्याचे दागिने व नगदी ५५ हजार रुपये एकूण १ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. त्या गुन्ह्यातील एका विधीसंगशित बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व चोरून नेलेला मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. फिर्यादी अशोक मुंडवाईक, हे २१ एप्रिला दुपारी ४.३० वाजताच्या दरम्यान पत्नी सोबत नातेवाईकाकडे गेले होते व त्याच दिवशी नातेवाईकाकडे परत आले. फिर्यादी लोखंडी गेटचे दार उघडून घरात गेले असता बेडरूममधील साम ान अस्ताव्यस्त पडले होते. दोन्ही लोखंडी आलमाऱ्या उड्यया होत्या. लॉकरमध्ये १८ ग्रॅम सोन्याचे दागिने व ५५ हजार रुपये दिसून आले नाही. याबाबत गुन्हे शाखेच्या पोलिसांना माहिती मिळाली व त्यावरून एका विधीसंघर्ष बालकाला ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याने गुन्ह्यात वापरलेली दुचाकी ताब्यात घेतली. सदर गुन्ह्यात आशिष उर्ष छोटा जंगली सापसिंग सागर रा. विलासनगर हा आरोपी फरार होता. गुन्ह्येशाखेच्या युनीट दोनच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले व राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहो. आरोपी हा घरफोडीतील सराईत गुन्हेगार आहे. त्याने किती चोऱ्या केल्या याबाबत चौकशी करीत आहेत. ही कारवाई गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय वानखडे, गजानन ढेवले, मनोज ठोसर, राईलीवाले यांनी केली आहे.

# ग्रामपंचायत कामावर बीडीओंचे लक्ष

## जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी घेतला आढावा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** जिल्ह्यात चिखलदरा आणि चांदुर रेल्वे तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा केला जात असला तरी मेळघाटातील अनेक गावाचे नागरिक पाण्यासाठी दाही दिशा भटकत आहे. हे वास्तव्य अजिंक्य भारत ने मंगळवारच्या पंकज प्रकाशित केले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या सिओ संगीता महापात्र यांनी मंगळवारी दुपारी पाणीटंच आढावा घेण्यासाठी तातडीची भिशी घेतली. व त्यांनी ग्रामपंचायतींनी अधिक सक्षमपणे उपाययोजनांची कामे करावीत असे सांगत जिल्ह्यातील सर्व भिडे यांना त्या त्या भागात वारंवार भेटी देण्याचे निर्देश दिले.

उन्हाळ्याच्या दिवसातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा प्रशासनातर्फे दरवर्षी तातडीच्या उपायोजना आखल्या जातात. प्रशासनाच्या मते यंदा जिल्ह्याच्या सर्व चौदा तालुक्यातील सात ते सात गावांमध्ये पाणीटंचाई असून तिच्यावर १००० ३४ उपाययोजनाद्वारे नियंत्रण मिळवले जाणार आहे. यापैकी ज्या उपायोजना १५ लाखापर्यंतच्या खर्चाच्या आहेत अशी कामे ग्रामपंचायतला दिली जातात. यंदाही शंभरहून अधिक कामे ग्रामपंचायत नाच दिली आहेत. मात्र या कामाबाबतचा नेहमीचा अनुभव हा काहीसा नकारात्मक आहे. ग्रामपंचायत प्रशासन स्वतः कामे घेते परंतु स्वतः न करता ती बाह्य यंत्रणेद्वारे करून घेतली जातात. त्यामुळे पाणी टंचाईचे निवारण योग्यरीत्या होत नाही. असे घडू नये म्हणून स्वतः गटविकास अधिकाऱ्यांनी लक्ष घालून ग्रामपंचायत न सक्षम करावी व त्यांच्या मार्फत ही कामे करून घ्यावी असे निर्दे शशी व महापात्र यांनी गट विकास अधिकारी यांना दिले आहे.




शिवच्या मते सध्या दोनशेहून अधिक कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिली आहे यामधील शंभरहून अधिक कामे स्वतः ग्रामपंचायत घेतली असून ४० पेक्षा अधिक ठिकाणी प्रत्यक्ष कामाचा प्रारंभही झाला आहे. मात्र ही कामे ठरलेल्या मुदतीत होण्यासाठी ग्रामपंचायत मी स्वतः लक्ष घालून ती करून घेतली जाय पाहिजे.

जोपर्यंत ते वनरशिपच्या भूमिकेत येणार नाहीत तोपर्यंत त्या गावाला पाणी मिळण्याचा मार्ग सुकर होणार नाही त्यामुळे सरपंच व ग्रामसेवकांनी योग्यरित्या सांगड घालून ती कामे तातडीने चढीच लावावी अशी ही आव्हान जिल्हा परिषद संगीता महापात्रा यांनी केले आहे.

### दहा गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा



चिखलदरा तालुक्यातील नऊ आणि चांदुर रेल्वे तालुक्यातील एक अशा दहा गावांमध्ये पाण्याचा स्त्रोत नाही. त्यामुळे तेथील रहिवाशांना बाहेरूनच पाणी पुरवावे लागते. परिणामी या दहा गावांमध्ये सध्या टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. तो पुरेसा प्रमाणात केला जावा अशा सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. कुठल्याही गावात पाणीटंचाई भासू नये यासाठी जिल्हा परिषद लक्ष ठेवून आहे. गटविकास अधिकारी यांनी तातडीने पाणीटंच अहवाल द्यावा.

**संजीता महापात्र,** सीईओ जि प.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी त्वरित करावी

## काँग्रेस कमिटीच्यावतीने तहसील कार्यालय येथे धरणे आंदोलन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २५ :** निवडणूक पूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार राज्य सरकारने अद्यापपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली नसल्यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला असुन येत्या काही काळात कर्जमाफीची घोषणा राज्य सरकारने न केल्यास शेतकरी आत्महत्या वाढतील अशा प्रकारची भीती निर्माण झाली असुन सर्व शेतकऱ्यांना त्वरित कर्जमाफी देण्यात यावी. या मागणीसाठी मोर्शी तालुका व शहर काँग्रेस च्या वतीने सरकारविरोधात तहसिल कार्यालयासमोर तिव्र घोषणाबाजी करण्यात आल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या सरकारचं करायचं तरी काय,खाली मुंडक वरती पाय. असा कसा देत नाही,घेतल्याशिवाय राहत नाही.अशा गगनभेदी घोषणाने परिसर दुमदुमून गेला होता.शेवटी एक लेखी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने तहसीलदार विनोद वानखडे यांच्यामार्फत थेट जिल्हाधिकारी अमरावती यांना रवाना करण्यात आले. सर्वप्रथम भुषण कोकाटे अध्यक्ष मोर्शी शहर काँग्रेस कमिटी यांनी नुकत्याच पेहलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान शेतकऱ्यांच्या मागण्या राज्य सरकारने तात्काळ मंजूर कराव्या अशा प्रकारचे मत व्यक्त केले.याप्रसंगी तालुकाध्यक्ष रमेश काळे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त करतांना राज्य सरकार द्वारा शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यात आली नाही तर यापुढे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आणखी तिव्र आंदोलन मोर्शी तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने उभारण्यात येईल असे सांगितले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान त्या शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावे,२०२४-२०२५ मध्ये सोयाबीन पिकाची अतिवृष्टीमुळे झालेली नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांना विनाविलंब देण्यात यावी.शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम देण्यात यावी. सिंचनाकरिता शेतीला दिवसा पाणीपुरवठा करण्यात यावा, सोयाबीन,तूर,कपाशी, चना या उत्पादनाला भाव नसल्याने भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे.घरकुल लाभार्थी यांना त्वरित अनुदानाचे हप्ते वितरित करण्यात यावे. अशा प्रकारच्या मागण्या सुद्धा निवेदनाद्वारे शासनाकडे रेटून धरण्यात आल्या. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे मिलिंद कांबळे (तालुकाध्यक्ष अनुसूचित जाती सेल) अल्पजा बडासे (तालुकाध्यक्ष महिला काँग्रेस)पवन काळमेघ (अध्यक्ष युवक काँग्रेस) रमा इंगळे(तालुकाध्यक्ष अनु जाती महिला काँग्रेस) प्रा.दिलिप मालपे (उपाध्यक्ष खरेदी विक्री संस्था मोर्शी)पंकज विधळे(संचालक खरेदी विक्री संस्था मोर्शी)मुरलीधर डहाने (माजी जि.प. सदस्य),राजाभाऊ साठवणे,संजय कळसकर,देविदास विघे,अतुल खोडस्कर, चंद्रकांत जवंजाळ, श्रेयस तायवाडे,ॲड. स्वराज श्रीराव,चैतन्य मेंढे,सतिश इंगळे, विलास ठाकरे, निळूभाऊ इंगळे,राजेंद्र लाखोडे,बंडू मोहोड, विनोद साबळे,प्रमोद श्रीखंडे,आकाश तायवाडे,अंबादास राऊत,राजकुमार साबू, गजानन तायवाडे,संजय मोहोकार,अफसरखॉ पठाण,मनोज टेकाडे, शे.रहीम शे बब्बू,वसीम कुरेशी,नितीन ठाकरे, प्रकाश काळे तसेच इतर अनेक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.




### महाराष्ट्र दिन शहर परेड मैदानावर साजरा होणार

**अमरावती :** महाराष्ट्र राज्याचा ६६वा स्थापना दिवस १ मे रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त साजरा होणारा मुख्य शासकीय कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडीयमऐवजी पोलिस मुख्यालयाच्या शहर परेड मैदानावर सकाळी ८ वाजता होणार आहे. महाराष्ट्र दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे होणार आहे. यापूर्वी हा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आयोजित करण्यात येत होता. मात्र स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू असल्याने कार्यक्रमाच्या स्थळात बदल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने स्टेडीयम कार्यक्रमासाठी योग्य नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस पोलिस मुख्यालयाच्या परेड मैदानावर होणार आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी काँग्रेसचे ठिय्या आंदोलन



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २५ :** छत्रपती शिवाजी महाराज चौक दर्यापूर येथे दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटी व दर्यापूर शहर काँग्रेस कमिटी तर्फे आंदोलन करण्यात आले विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी भाजप सरकारने संपूर्ण कर्जमाफी करू असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते तसेच सर्व पिकांना हरभरा ,संत्रा सोयाबीन, तूर उडीद या सर्व पिकांना हमीभाव देऊ असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते पण प्रत्यक्षात एकही आश्वासन या तीन इंजिनच्या सरकारने पाळले नाही , घरकुलांचे पैसे, पीक विम्याचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा होत नसून पीक विम्यापासून दर्यापूर तालुक्यातील त्काही मंडळ वंचित झाले त्यांचा समावेश व्हावातसेच दिलेल्या खोट्या आश्वासनाच्या निषेधार्थ दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या नेतृत्वात बस स्टॅन्ड चौक येथे आंदोलन करण्यात आले यावेळी प्रथम काश्मीर पहेलगाम येथे झालेल्या भ्याड दहशवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर विविध मागण्यासाठी त्या चौकात प्रथम या आंदोलन करण्यात आले खोटे आश्वासन देणाऱ्या, ईडीची भीती दाखवून सत्तेचा गैरवापर करणाऱ्या भाजप सरकारचा विविध नारे देऊन निषेध करण्यात आला यावेळी शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे व माननीय यांचे निवेदन दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटी तर्फे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले यावेळी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे, उपसभापती राजू पाटील कराळे, खरेदी-विक्रीचे उपाध्यक्ष प्रभाकर पाटील कोरपे, जिल्हा काँग्रेस महासचिव संजय भाऊ बेलोकार प्रदीप बापू देशमुख ईश्वर भाऊ बुंदेले, गजानन भाऊ देवतळे प्रभाकर पाटील तराळ साहेबरावजी भदे,युवक काँग्रेसचे नितेश भाऊ वानखडे, अल्पसंख्यांक तालुका प्रमुख रफिक भाई सय्यद, जम्मू भाई पठाण, महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष शुभांगी ताई भदे, छायाताई ईचे, गजानन भाऊ देवताळे , अनिल पाटील भारसाकळे, दर्यापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष आशिष शिरभाते,अमोल पाटील धर्माळे मधु भाऊ पाचे अमोल भाऊ देशमुख ,सुभाष पाटील गावंडे, प्रकाश चव्हाण, अमोल धर्माळे, असलम घानिवाले, पप्पू होले, एड. निशिकांत पाखरे, राजेश खेडकर, प्रभाकर पाटील तराळ, राजेश राठी, अमोल जाधव,महेश कुरळकर, विनोद वानखडे, दत्ता पाटील कुंभारकर, नितीन गावंडे, नंदू मेहरे, प्रतीक बुंदिले, सुनील पुरी , बबलू कुरेशी,रामभाऊ साखरे, अरुण भाऊ डीके, रामेश्वर चव्हाण, इरफान इनामदार, शेख जुबेर, दादाराव इंगळे, दीपक मालखेड, मधु घाडगे, भैय्यासाहेब टेकाळे, अनिल गावंडे, देवेश वडाळ, दिलीप गवई, गोपाल फालके, मनोज बोरेकर, मंगल बुंदिले, शरद ठाकरे,सुदेश सिंग ठाकूर, रमेश होले, दिनेश तांबडे, डॉ. चंचल गजभिये, सुरेश मानकर, सचिन नवरंगे,नितीन लोडम, मनीष मोपारी, निळकंठ साखरे, नितीन उमक, अनिल गावंडे,चंद्रशेखर घाडगे,मदन काळे, प्रेमदास इंगळे, नंदू गावंडे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### राम शिंदे यांचा दौरा

**अमरावती :** विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे शनिवार, दि. २६ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार, शनिवार, दि. २६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी १२.१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पंजाबराव देशमुख मेडीकल, कॉलेज, पंचवटी चौक येथे सभापतीपदी निवड झाल्याबद्दल आयोजित नागरी सत्कार साहेळ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार अमरावती येथून शासकीय वाहनाने प्रयाण करतील.

## ६६ पैकी ३४ ग्रामपंचायतमध्ये ‘महिलाराज’

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वरुड, दि. २५ :** तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतिच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडली असून ६६ पैकी ३४ ग्रामपंचायतीचे नेतृत्व महिला करणार आहे. ग्रामपंचायतिच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालयाच्या सभागृहात गुरुवारी साडेअकरा वाजता पार पडली. यामध्ये २०२५-३० या पंचवार्षिकपेक्षा मागील २०२० ते २०२५ या आरक्षणाने येत्या पंचवार्षिक निवडणुकीत ३४ महिला सरपंच होणार आहे.यामध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गातून आरक्षण सोडत काढण्यात आली. अनुसूचित जाती महिला राखीव मध्ये शिंगोरी,पुसला,चिंचरगव्हाण, टेम्भूरखेडा, बेनोडा तर अनुसूचित जाती खुला प्रवर्ग राखीव मध्ये इत्तमगाव , बेसखेडा, जामगाव(खडका), आमनेर, पवनी समावेश आहे. अनुसूचित जमाती महिला राखीव मध्ये एकदरा, मोरचूद, उदापूर, लोणी, पेठ मांगरूळी, वाठोडा तर अनुसूचित जमाती खुल्या प्रवगाकरिता



पोरगव्हाण, गाडेगाव, लिंगा, सावंगी, मांगरूळी ग्रामपंचायती राखीव आहे. नागरिकांच्या मागास प्रवर्गातून करजगाव(गांधीवर), कुरळी, आलोडा, इसंब्री, ढगा, पळसवाडा येथे महिला सरपंच तर खुल्या प्रवर्गाकरिता अमडापूर, घोराड, नांदगाव, गव्हाणकुंडं ,चांदस, देऊतवाडा, राखीव आहे, सर्वसाधारण प्रवर्गातून शहापूर, वाडेगाव, पिंपळखुटा बु. मालखेड, झोलंबा, रोशनखेडा, सातनूर, तिवसाघाट, धनोडी, इसापूर, खडका, बहादा, बारगाव, सुरळी, वघाळ, सावंगा, राजूराबाजार या महिला राखीव तर खुल्या प्रवर्गात जरुड, डवरगाव, काटी, बेलोरा, वडाळा, काचूर्णा, जामठी गणेशपूर, हातुर्णा, उराड, झटामझीरी, पळसोना, बाभुळखेडा, वंडली, वाई खुर्द, गोरेगाव, जामगाव महेंद्री या ग्रामपंचायतीचा समावेश आहे.६६ पैकी ३४ ग्रामपंचायतीव महिला राज येणार आहे.या आरक्षणसोडती ईश्वरचिठ्ठीने तन्वीका कडुकार या ११ वर्षीय मुलीने काढली. यावेळी नियंत्रक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार,प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार पंकज चव्हाण,नायब तहसीलदार सुदर्शन शहारे सह महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांनी आरक्षण सोडतीचे कामकाज सांभाळले.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार

## १ मे रोजी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते पुरस्कार वितरण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



डॉ. विलास रामदासपंत नांदुरकर | श्री उमेश प्रभाकर लांडगे | सौ. उमा प्रकाश चांभारे | श्री प्रविण रंगरावजी अलटकर | सौ. प्रज्ञा किशोर बोंडे | श्री गजानन निळकंठराव देशमुख | डॉ. जयंत मधुकर चतुर | डॉ. प्रज्ञा एस. येनकर | डॉ. दिपक केवळरामजी कोचे | डॉ. पुनम टिकमचंद अग्रवाल | डॉ. जयंत वसंतराव निखारे

**अमरावती, दि. २५ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२५ विद्यापीठस्तर व महाविद्यालयीन स्तरावरील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना जाहीर झाला आहे. दि. १ मे, २०२५ रोजी ध्वजारोहण कार्यक्रमानंतर लगेचच विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहात आयोजित पुरस्कार प्रदान समारंभामध्ये कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. शाल व श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र आणि १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

सन २०२५ च्या विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी प्रथम श्रेणी अधिकारी सर्वसाधारण संवर्गात जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास रामदासपंत नांदुरकर, द्वितीय श्रेणी अधिकारी सर्वसाधारण वर्गवारीत अधीक्षक (सामान्य प्रशासन) श्री उमेश प्रभाकर लांडगे व महिला वर्गवारीत अधीक्षक (विकास) सौ. उमा प्रकाश चांभारे, तृतीय श्रेणी कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीत वरिष्ठ लघुलेखक (परीक्षा) श्री प्रविण रंगरावजी अलटकर व महिला वर्गवारीत वरीष्ठ सहाय्यक (वित्त) सौ. प्रज्ञा किशोर बोंडे, तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीत प्रयोगशाळा परिचर (रासायनिक तंत्रशास्त्र) श्री गजानन निळकंठराव देशमुख यांना पुरस्कार घोषित झाला आहे.

सन २०२५ च्या संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी सर्वसाधारण संवर्गात श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळचे प्राचार्य डॉ. जयंत मधुकर चतुर व महिला संवर्गात विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा एस. येनकर, शिक्षक सर्वसाधारण वर्गवारीत श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. दिपक केवळरामजी कोचे व महिला वर्गवारीत श्री आर.एल.टी., महाविद्यालय, अकोला येथील रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापक डॉ. पुनम टिकमचंद अग्रवाल तसेच सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीतून बॅ. रामराव देशमुख कला, श्रीमती इंदिराजी कापडीया वाणिज्य व न्या. कृष्णराव देशमुख विज्ञान महाविद्यालय, बडनेरा येथील वरिष्ठ लिपीक श्री जयंत वसंतराव निखारे यांना पुरस्कार घोषित झाला आहे. उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त सर्व प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

अजिंक्य भारत
# अमरावती जिल्हा
शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५


## थोडक्यात

### प्रा राम शिंदे यांचे आंबेडकरी संघटनांच्या वतीने होणार जंगी स्वागत



**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील समस्त धनगर समाज बांधवांच्या वतीने विधान परिषदेचे सभापती पदी निवड झाल्याबद्दल ना. प्रा राम शिंदे यांचा भव्य सत्कार शनिवार(ता.२६) रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. तत्पूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ना. प्रा. राम शिंदे यांचे आंबेडकरी चळवळीच्या विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्याचा एकमुखी निर्णय मंगळवार (ता.२२) रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे शहरात शनिवार (ता.२६) रोजी आगमन झाल्यानंतर दुपारी १ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करणार आहेत. यावेळी आंबेडकरी चळवळीतील विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई माहेरचा सेवा या उपक्रमांतर्गत राम शिंदे यांचा सत्कार करणार आहेत. या बैठकीला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा आंबेडकरी विचारवंत प्रा.डा. रवींद्र मुंद्रे, माजी प्राचार्य डॉ. गोपीचंद मेश्राम, मिलिंद देवरे, आनंद हिवराळे, भदंत बुद्ध प्रिय सुनील रामटेके ,साची फाऊंडेशनचे अध्यक्ष जगदीश गोवर्धन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे,डॉ. प्रफुल्ल गवई, भारत डोंगरे, भारत पाटील, अशोक वानखडे, वसंत सावळे, रमेश गजभिये, प्रा.डा. वासुदेव उईके, सुनील मेश्राम, केशव तंतरपाळे, विजय गणवीर, बाळकृष्ण खोब्रागडे, भाऊराव वावरे, एम एस सावळे, देवानंद ढोके, रणजीत चव्हाण, विजय तेलमोरे, सेवानंद वाकोळे, संजय भोवते, रुपराव बनसोड, व्यंकट खोब्रागडे, मनोहर घोडेस्वार,प्रा राजेश मेश्राम, उत्तम बोरकर, संदीप मेश्राम, सुधाकर सोमकुवर, डॉ. पुष्पा मुंद्रे, नकुल नाईक, यांच्यासह बहुसंख्येने विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### कश्मीरमधील ६४ प्रवासी सुरक्षित

**अमरावती :** पहलगाम येथील झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती कक्षातर्फे आतापर्यंत ६४ नागरिकांशी संपर्क करण्यात आला आहे. हे सर्व प्रवाशी सुरक्षित आहेत. जिल्हा आपत्ती कक्षातर्फे कालपर्यंत ४७ आणि आज १७ नागरिकांशी संपर्क साधण्यात आला आहे. याबाबतची माहिती मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, नियंत्रण कक्ष येथे पाठविण्यात आली आहे. सर्व प्रवाशी श्रीनगर येथे सुरक्षित असल्याची माहिती जिल्हा आपत्ती कक्षाने दिली आहे.

# गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या शाळांना ‘आयडॉल’ दर्जा

## शाळांची बँक तयार करणार, शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेतले जाणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** राज्यभरातील गुणवत्तापूर्ण अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आयडॉल - शिक्षक, आयडॉल शाळांची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय आयडॉल शाळांची बँक करण्यात येणार असून, आयडॉल शिक्षक व शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेणार आहे. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे शिक्षक आणि शाळांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थी व पालकांना करून देण्यासाठी आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा ही संकल्पना हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत निवड करण्यासाठी नवीन अध्ययन पद्धती, शासन ध्येय-धोरणांची अंमलबजावणी, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळामधील भूमिका अशा निकषांच्या आधारे आयडॉल शिक्षक व आयडॉल शाळा यांची निवड केली जाणार आहे. शिक्षकांची आचार विचाराची पद्धत, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिष्यवृत्ती, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उच्च शिक्षणातील सहभाग अशा निकषांवर समितीने शिक्षक आणि शाळांचे मूल्यमापन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.




शिक्षकांना मास्टर ट्रेनर म्हणून घेणार; शाळांना भेटी देण्याचे नियोजन आयडॉल शिक्षक, शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचेही नियोजन आहे. त्यानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व परिषद व अन्य संस्थांनी आयडॉल शिक्षकांना मास्टर ट्रेनर म्हणून घ्यावे, आयडॉल शाळांना भेटीचे नियोजन करावे, या शाळांमधील शिक्षकांना आणि अन्य सक्रिय सदस्यांना पालिकांच्या शाळांमध्ये अध्यापन मार्गदर्शक म्हणून घ्यावे, आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा यांच्या कामाचे चित्रीकरण, कागदपत्रे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, प्रशिक्षण संस्था यांनी वेळोवेळी करावे या सूचना दिल्या आहे.

### जिल्हास्तरीय समितीत यांचा समावेश

जिल्हास्तरीय समितीत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, दोन शिक्षणतज्ज्ञ हे सदस्य म्हणून व ज्येष्ठ अधिव्याख्याता यांचा समावेश असेल.

### तीन स्तरीय समितीची नियुक्ती

उपक्रमासाठी तालुका, जिल्हा, राज्य अशा तीन स्तरावर समिती नियुक्त केली आहे. तालुका समितीत गटशिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता, शिक्षण तज्ज्ञ, दोन केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी असतील.

## अमरावतीमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** अमरावतीमध्ये उष्णतेच्या लाटांचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये गेल्या ४ ते ५ दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे, हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावे, बाहेर जाताना छत्री, टोपी किंवा गॉगल वापरावे, मद्य, चहा, कॉफी आणि शीतपेये पिणे टाळावे, शिळे अन्न खाऊ नये, उन्हात काम करताना चेहरा आणि डोके ओल्या कपड्याने झाकावे, शक्यतो, दुपारी १२ ते ३ या वेळेत जास्त शारीरिक श्रम करणे टाळावे, चक्कर आल्यास किंवा अस्वस्थ वाटल्यास त्वरीत डॉक्टरांना भेटावे, ओआरएस आणि लस्सी, ताक, लिंबू पाणी यासारखी पेये प्यावे, प्राण्यांना सावलीत ठेवावे आणि त्यांना भरपूर पाणी द्यावे. त्याचप्रमाणे दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, गडद रंगाचे जाड कपडे घालू नये, तापमान जास्त असल्यास जास्त शारीरिक श्रमाची कामे करू नये, तसेच उष्माघात झालेल्या व्यक्तीची काळजी घेताना उष्माघात झालेल्या व्यक्तीला थंड ठिकाणी घेऊन जावे, ‸ पाणी यासारखी पेये द्यावे, तातडीने आरोग्य केंद्रात घेऊन जावे.

## समाजशास्त्रीय ज्ञानव्यवहार समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त-डॉ.तंगलवाड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** समाजशास्त्रातील अद्ययावत चर्चाविश्व समजून घेण्याच्या दृष्टीने तसेच त्यादृष्टीने अभिव्यक्तीसाठी अशा प्रकारचे अधिवेशन अत्यंत मौलिक ठरतात. त्यामुळे समाजशास्त्रीय ज्ञानव्यवहार सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त असल्याचे प्रतिपादन वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय केंद्रीय हिंदी विद्यापीठाच्या संस्कृतीविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. दिगंबर तंगलवाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग आणि विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर यांच्या संयुक्त



विद्यमाने ‘भारतीय समाज : प्रश्न आणि आव्हाने’ या विषयावर आयोजित दोनदिवसीय पंधराव्या राज्य अधिवेशनाचे समारोप सत्र नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर समारोप सत्राचे अध्यक्ष म्हणून विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजशास्त्र अभ्यासक डॉ. बी.एम. कहाडे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठातील समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. एच. किर्दक, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.बी.नायक, राज्यस्तरीय अधिवेशनाचे मुख्य संयोजक डॉ. किशोर राऊत उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ.बी.एम. कहाडे म्हणाले.विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद मागील अनेक वर्षांपासून विदर्भातील समाज जीवनाच्यादृष्टीने समाजशास्त्रीय अध्ययन व संशोधनावर भर देत आहे. विदर्भातील सामाजिक प्रश्न निवारणाच्या अनुषंगाने स्थानिक समाजशास्त्र अभ्यासकांमध्ये चेतना निर्माण करण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. आज विदर्भात अनेक भीषण समस्या आहेत. त्याकरीता हे अधिवेशन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. अधिवेशनाचे मुख्य संयोजक डॉ. किशोर राऊत यांनी समाजशास्त्राच्या ज्ञानव्यवहाराच्या दृष्टीने असणारे महत्त्व आणि अधिवेशन आयोजित करण्यामागील भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे प्रा. डॉ. सुरेश डोहाने यांनी मानले.

# शासकीय वाळू कंत्राटावर उपासमारीची पाळी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २५ :** सुमारे एक वर्षापूर्वी अमरावती जिल्हाधिकारी व गौण खनीकर्म अधिकारी कार्यालयाच्या वतीने मोर्शी तालुक्यातील निभार्णी येथील रेती घाटाचा जाहीर लिलाव करण्यात आला होता. सदर लिलाव मोरे ट्रेडिंग कंपनीचे संचालक संतोष दादाराव मोरे यांनी घेतला होता. शासकीय अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर अनामत रक्कम म्हणून शासनाकडे २० लाख रुपयांचा भरणा करण्यात आला होता. अमरावती येथील गौण खनीकर्म अधिकारी कार्यालय व मोर्शी महसूल अधिकारी कार्यालयाच्या वतीने परवानगी मे २०२४ रोजी दिल्यानंतर वर्धा नदी पात्रातील वाळूचे उत्खनन करून ट्रकने वाहतूक करून तळणी येथील शासकीय वाळू डेपोवर वाळू जमा करण्यात आली होती. सदर कंत्राट हा जून २०२४ मध्ये संपला



## गौण खनीकर्म अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

होता.तळणी येथील शासकीय रेती डेपोवर कंत्राटदाराच्या वतीने अंदाजे २०० ते ३०० ब्रास रेती जमा करून ठेवण्यात आली होती. कंत्राटदाराच्या वतीने त्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या नियमानुसार जमा असलेल्या रेतीवर नजर ठेवण्याकरिता सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आला होता. तसेच त्या ठिकाणी रेतीचे वजनमाप करण्याकरिता अंदाजे दहा लाख रुपये खर्च करून धरमकाटा सुद्धा लावण्यात आला होता. मोर्शी तहसील कार्याने ठरवून दिलेल्या जागेवर लोखंडी अँगल लावून तार कंपाउंड लावण्यात आले होते.मोर्शी तालुक्यातील विविध घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या धोरणानुसार चार ब्रास मोफत रेती देण्याची योजना असल्यामुळे व घरकुल लाभार्थ्यांनी ऑनलाइन नोंद करण्याकरिता असलेल्या पोर्टलसाठी तळणी येथील शासकीय वाळू डेपोवर कंत्राटदाराच्या वतीने संगणक प्रणाली सुद्धा लावण्यात आली होती. पण गेल्या वर्षभरापासून तालुक्यातील कोणत्याही घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्यात आली नाही.रेती उत्खनन ते वाळू डेपो तयार करण्याकरिता कंत्राटदाराचे ५० ते ६० लाख रुपये खर्च झाले असल्यामुळे सदर कंत्राटदाराला आर्थिक अडचणीला सामना करावा लागत आहे. सदर कंत्राटदाराने लाखो रुपये उसनवार व बँकेचे कर्ज घेतले असल्यामुळे कर्जदाराचे मासिक हप्ते सुद्धा थकले आहे. त्यामुळे सदर कंत्रादरावर उपासमारीची पाळी आली आहे.तरी संबंधित विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मौजा तळणी शिवारातील शासकीय वाळू डेपो लवकरात लवकर सुरू करावा म्हणून कंत्राटदाराच्या वतीने अनेक वेळा संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला असला तरी संबंधित विभागाने याकडे लक्ष दिले नाही.

## म्हाडाच्या जनता दरबारातील तक्रारी आठ दिवसात निघणार निकाली



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत म्हाडा कार्यालयात जनता दरबार आयोजित करण्यात आला. यात प्राप्त तक्रारी येत्या आठ दिवसांत सोडविण्याच्या सूचना संबंधितांना करण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या कार्यक्रमात लोकशाही दिनांतर्गत जनता दरबार आयोजित करून राज्यातील जनतेचे प्रश्न तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार गृहनिर्माण विभागाने म्हाडा प्राधिकरण आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागीय कार्यालयात जनता घेण्यात येत आहे. अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने मंगळवार, दि. २२ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता मंडळाचे मुख्य अधिकारी विशाल देशमुख यांनी जनता दरबारात नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. तसेच नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवण्यावर भर देण्यात आला. जनता दरबारात ७ नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या. मुख्य अधिकारी श्री. देशमुख यांनी नागरिकांच्या अडचणी आणि समस्या जाणून घेत प्राप्त तक्रारींचे ८ दिवसात निराकरण करण्याचे आश्वासन दिले. जनता दरबारामध्ये उपमुख्य अधिकारी जयकुमार नामेवार, कार्यकारी अभियंता दिलीप कळसकर, मुख्य लेखाधिकारी अतुल देवके, मिळकत व्यवस्थापक स्वप्नील भारती उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचा समारोप

### विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिली माहिती




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** आपत्ती व्यवस्थापन व मदत कक्ष आणि भारतीय हवामान खात्याच्या वतीने आज आपत्ती व्यवस्थापन आणि हवामान बदल याबाबत कार्यशाळा उत्साहात पार पडली. अमरावती विभागातील स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, नागरिक आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला. कोर्यशाळेत येत्या मान्सूनच्या काळात आणि उन्हाळ्यात येणाऱ्या संभाव्य समस्यांबाबत माहिती सांगितली. उन्हाळ्यात प्रामुख्याने उष्णतेच्या लाटा आणि त्यानुषंगाने निर्माण होणाऱ्या समस्यांची माहिती देण्यात आली. भारतीय हवामान खाते हे आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत असल्यामुळे हवामानाबाबत अचूक अंदाज मिळत आहे. कमी, मध्यम आणि दीर्घ कालावधीबाबत हवामानाचा अंदाज व्यक्त करण्यात येतो. त्यामुळे हवामान खात्याकडून सूचना प्राप्त होताच यंत्रणांनी त्यानुसार सज्ज राहणे गरजेचे आहे. मान्सूनच्या कालावधीत पूर, वीज पडणे, गारपिठ यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवू शकते. कार्यशाळेत संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना कसा करायचा, प्रथमोपचार कसा द्यायचा आणि सुरक्षिततेसाठी कोणती काळजी घ्यायची याबद्दल तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. भूकंप, आग आणि पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी घ्यावयाची खबरदारी आणि आवश्यक उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला. नैसर्गिक आपत्तीबाबत माहिती देण्यासाठी विजेची माहिती देण्यासाठी दामिनी ॲप, पब्लिक ऑर्ब्जवेशन आदी ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. हर हर मौसम, हर घर मौसम मोहिम हवामान खात्यातर्फे राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी ॲपच्या उपयोगासोबतच वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अलर्टची नागरिकांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी कधीही येऊ शकणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने सज्ज राहणे आवश्यक आहे. कार्यशाळेतील ज्ञानाचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीतील आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी होणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर उपस्थित होते.

# नयना चिंचे आणि रुपेश रेंगे यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्गदर्शनासाठी कुलगुरुंचे निमंत्रण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** दुष्काळ व पाणीटंचाईवर कळंब तालुक्यातील खडकी येथील नयना चिंचे व राळेगाव तालुक्यातील झाडगाव येथील रुपेश रेंगे या युवकांनी संघटन करुन विधायक कार्यातून अफलातून मात केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे गावात आता जलक्रांती झाली. याचीच दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते यांनी थेट खडकी गावात या दोनही युवक-युवतीचा सत्कार केला. यावेळी अमरावती विद्यापीठाचे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून नयना चिंचे व रुपेश रेंगे यांनी स्वत:ला झोकुन देत कार्य केले. यासाठी त्यांनी गावातील विद्यार्थी, युवक व नागरिकांना एकत्र केले. सर्वांमध्ये एकजूट व विश्वास निर्माण केला. आणि सर्व एकाध्येयाने झपाटल्यागत कामाला लागले. गावातील पाणी गावातच कसे राहील यासाठी प्रयत्न केले. प्रामाणिक प्रयत्नामुळे गावातील व परिसरातील दुष्काळ पळऊन लावण्यात त्यांना यश मिळाले. त्यांच्या या कार्याची दखल थेट कुलगुरु डॉ मिलींद बारहाते यांनी घेतली. त्यांनी गावात येत या दोघांचाही सन्मानचिन्हे व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. थेट कुलगुरु गावात येऊन एखाद्या विद्यार्थ्यांचा सत्कार केल्याची ही पहिलीच घटना आहे.

यावेळी कुलगुरू यांनी आपल्या भाषणातून, या दोघांचेही कार्य इतरांसाठी प्रेरणादायी आहे. स्वप्रेरणेने त्यांनी हे कार्य केलेले



आहे. त्यामुळे स्वप्रेरणा अतिशय महत्वाची आहे. अभिनेते नाही तर हेच खरे आपले आदर्श आहे. त्यामुळेच त्यांचा थेट गावात येऊन विद्यापीठातर्फे सत्कार केला जात आहे.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, तसेच महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. नयना चिंचे व रुपेश रेंगे यांनी मनोगतातून आपल्या गावाकरिता पाण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाला विद्यार्थी विकास संचालक डॉ.राजीव बोरकर, विद्यापीठ प्रशासन विभागाचे उपकुलसचिव मंगेश वरखडे, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक रमेश जाधव, प्राचार्य डॉ. पवन मांडवकर, सरपंच जयश्री घोसले, उपसरपंच सुनिता कासार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.निलेश कडू यांनी केले. संचालन प्रा. स्वप्नील गोरे तर आभार यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ.निलीमा दवणे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.वीरा मांडवकर, प्रा.प्रशांत जवादे, कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल दौलतकर, प्रा. सुधीर त्रिकांडे, प्रा. सुशील बत्तलवार, डॉ.दत्तात्रय चव्हाण, माजी सरपंच संजय मोरे, अशोक उमरतकर, प्रा.सरोज लखविदे, डॉ.कैलास नेमाडे, डॉ.वेद पत्की, डॉ.एम. पी.राखुंडे आदींसह गावकरी तसेच इंदिरा गांधी महाविद्यालय राळेगाव, कला व वाणिज्य महाविद्यालय राळेगाव, इंदिरा महाविद्यालय कळंब, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव, नानीबाई घारपडकर महाविद्यालय बाभुळगाव, लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.अमरावती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नयना चिंचे व रुपेश रेंगे या दोघांनही कुलगुरुंनी निमंत्रित केले आहे. ते येणाऱ्या काळात वेगवेगळ्या महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वप्रेरणा जागृत करण्याचे काम करतील, अशी अपेक्षा आहे.

## घटना-घडामोडी



### महागाव येथे भाजपाचे तहसील कार्यालयासमोर निदर्शने

**महागाव :** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भारतीय जनता पक्षातर्फे येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात गुरुवारी (दि. २४) निषेध करण्यात आला. संतप्त कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत कठोर कारवाईची मागणी केली. केंद्र व राज्य सरकारने राष्ट्रीय सुरक्षेबाबत कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. केंद्र सरकारच्या पावलांना पाठिंबाही दर्शविण्यात आला. यावेळी भाजप पदाधिकारी दीपक आडे, बाजार समिती सभापती गुलाबराव जाधव, मंडळ अध्यक्ष योगेश वाजपेयी, सुनील टेमकर, नगरसेवक सुरेश पाटील नरवाडे, माजी जि. प. सदस्य भुसारे, सरपंच संघटना अध्यक्ष अमोल चिकने, श्रीधर भवनकर, निलेश नरवाडे, राजेश राठोड, अंबादास भिमटे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आर्णी येथे पदवी वितरण समारंभ

**आर्णी :** येथील राजकमलजी भारती कला, वाणिज्य व सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालयात नुकताच पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यात १४० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या. श्रीदत्त प्रासादिक शिक्षण मंडळाचे कोषाध्यक्ष प्रियदर्शनजी भारती अध्यक्षस्थानी होते. दिग्रस येथील प्राचार्य ए. आर. लाडोळे प्रमुख पाहुणे होते. प्राचार्य लाडोळे यांनी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर संधींबाबत मार्गदर्शन केले, तर अध्यक्षीय भाषणात भारती यांनी शुभेच्छा दिल्या. प्रा. रूपाली टेकाडे यांनी प्रास्ताविक व संचालन केले. प्रा. यु. डी. चव्हाण यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, प्रा. एस.व्ही. वानखडे, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### बसस्थानकावरून महिला बेपत्ता



**बाभूळगाव :** तालुक्यातील पालोती (नांदुरा) येथील चंचला विठ्ठल चापरे (वय ५५) या यवतमाळ येथील बसस्थानकावरून शनिवारी (दि. १९ एप्रिल) दुपारी बेपत्ता झाल्या. त्यांच्या भावसून गवराबाई पवार यांनी अवधूतवाडी पोलिसांत फिर्याद दिली आहे. गवराबाई पवार (वय ६५) व चंचला चापरे या दारव्हा येथून यवतमाळमार्गे बाभूळगावला जात होत्या. प्रवासादरम्यान दुपारी २ वाजता त्या यवतमाळ बसस्थानकावर पोहोचल्या. बाभूळगावची बस शोधण्यासाठी गवराबाई गेल्या असता चंचला जागेवर थांबल्या होत्या. गवराबाई परत आल्यावर चंचला तेथे नव्हत्या. त्यांचा सर्वत्र शोध घेतला असता त्या सापडल्या नाहीत. त्यामुळे गवराबाईने त्या हरविल्याची तक्रार नोंदविली. पोलिस तपास करत आहेत.

### रक्त तपासणी शिबिर बुधवारी

**पांढरकवडा :** महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त येथील वीरशैव लिंगायत हितसंवर्धक मंडळातर्फे बुधवारी (दि. ३०) मोफत आरोग्य तपासणी शिबिर व सायंकाळी रॅली, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहीद नागेश्वर जिड्डेवार रंगमंच येथे सकाळी ९ ते १ या वेळेत होणाऱ्या शिबिरात शुगर, थायरॉईड, किडनी, सीबीसीसह विविध रक्त तपासण्या मोफत होतील. तपासणीसाठी उपाशीपोटी यावे, असे सचिव प्रमोद पंचभाई यांनी कळविले आहे. सायंकाळी महात्मा बसवेश्वर चौकात प्रतिमेचे पूजन करून रॅली निघेल व रंगमंचावर सांस्कृतिक कार्यक्रम होईल. अध्यक्ष अरुण डोंगशनवार, उपाध्यक्ष मंगेश चांदेकर यांनी समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## निधन वार्ता

### पार्वतीबाई भोयर



**यवतमाळ :** नेर तालुक्यातील सोनखास येथील पत्रकार पांडुरंग भोयर यांच्या मातोश्री पार्वतीबाई व्यंकटराव भोयर (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. २५) सकाळी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले. पार्वतीबाई यांच्या निधनामुळे भोयर कुटुंबीयांवर दुःख कोसळले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्या सोनखास येथे वास्तव्यास होत्या. त्यांच्या साध्या व मनमिळाऊ स्वभावामुळे त्या परिसरात परिचित होत्या.

### दीपक भगत



**यवतमाळ :** येथील जुना उमरसरा परिसरात राहणारे दीपक उर्फ बंडू भगत (वय ५८) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गुरुवारी (दि. २४) पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उमरसरा येथील मोक्षधामात गुरुवारी दुपारी १ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या जाण्याने भगत कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## विदेशातून नियंत्रण; 'ॲप'आणि 'हॉटलाईन'द्वारे होते कोट्यवधींची उलाढाल

# आयपीएल सट्ट्याचा बाजार 'हायटेक'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ गणेश खडसे



**यवतमाळ, दि.२५:** आयपीएल क्रिकेट सामन्यांचा ज्वर चढलेला असतानाच, यवतमाळ जिल्ह्यात ऑनलाइन आणि ऑफलाइन क्रिकेट सट्ट्याचा बाजार प्रचंड तेजीत आला आहे. बेटिंग ॲप्स आणि हॉटलाइनच्या माध्यमातून प्रत्येक सामन्यावर लाखो रुपयांची बोली लावली जात असून, कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत आहे. मात्र, या अवैध धंद्याकडे पोलिसांचे सोईस्कर दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे या धंद्यावर दुबईतून नियंत्रण होत असल्याची माहिती आहे.

यंदाच्या आयपीएल हंगामात सट्टेबाजार चेन्नई सुपर किंग्सवर सर्वाधिक मेहेरबान असल्याचे चित्र आहे. चेन्नईच्या विजयासाठी सर्वांत कमी म्हणजे एकास एक असा भाव दिला जात आहे. त्याखालोखाल मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद या संघांवरही मोठ्या प्रमाणात बेटिंग लावले जात आहे. गेल्या वर्षी मुंबई इंडियन्स सट्टेबाजारामध्ये फेव्हरेट होती. यवतमाळातून चालणारे हे बेटिंगचे रॅकेट केवळ जिल्ह्यापुरते मर्यादित नसून, पांढरकवडा, वणी, घाटंजी, पुसद, नेर या परिसरातील सट्ट्यांवरही यवतमाळच्या बुकींचेच नियंत्रण असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. या बुकींनी स्वतःचे मोबाईल ॲप्लिकेशन तयार केले असून, एजंटांचे मोठे जाळे पसरवले आहे. एजंटमार्फत रोख रक्कम स्वीकारून ग्राहकांना ॲपसाठी आयडी आणि पासवर्ड दिला जातो. या आयडीवरून सामन्याचा विजेता, धावसंख्या, वैयक्तिक खेळाडूंची कामगिरी, अगदी षटकारांवरही बेटिंग लावले जाते. शिवाय, थेट हॉटलाईनवरूनही बेटिंग स्वीकारले जात आहे. आयपीएलच्या प्रत्येक हंगामात बुकी कोट्यवधी रुपयांची माया जमवतात. गेल्या वर्षी यवतमाळ पोलिसांनी एका बुकी अड्ड्यावर छापा टाकून कारवाई केली होती. मात्र, यावर्षी आयपीएल हंगाम सुरू होऊन इतके दिवस उलटले तरी सट्टेबाजी राजरोसपणे सुरू असूनही पोलिस यंत्रणेने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. शोधमोहीम पूर्णपणे थंडावल्याचे चित्र असल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.



### 'ॲप'द्वारे चालतो लाखोंचा खेळ; एजंटांचे मोठे जाळे!

**यवतमाळातील आयपीएल सट्टा आता हायटेक झाला आहे. बुकींनी खास बेटिंग ॲप्स तयार केले आहेत. ग्राहकांना एजंटकडे रोख रक्कम जमा करून ॲपसाठी आयडी-पासवर्ड मिळवावा लागतो. या ॲपवरून कोण जिंकणार, किती धावा निघणार, कोणता खेळाडू किती धावा काढणार किंवा बळी घेणार, षटकार किती होणार अशा प्रत्येक गोष्टीवर लाखो रुपयांचा सट्टा लावला जातो. याशिवाय हॉटलाईनची सोयही उपलब्ध आहे. हे सर्व व्यवहार विदेशातून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने चालतात.**

## शिक्षकाच्या कन्येची यूपीएससीत उत्तुंग भरारी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. २५ :** येथील गटशिक्षणाधिकारी मोहिनी प्रल्हाद खंदारे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२४ परीक्षेत देशात ८४४ वा क्रमांक मिळविला आहे. शासकीय सेवेत कार्यरत असताना मिळवलेल्या या यशाने त्यांनी जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे.

मोहिनी (मोनू) प्रल्हाद खंदारे ह्या मूळ फुलसावंगी येथील असून त्यांचे वडील पी.डी. खंदारे व आई प्रमिला खंदारे यांनी फुलसावंगीत अनेकांना शिकपविले आहे. वडील विस्तार अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत, तर बंधू विक्रांतजी खंदारे हे विद्यमान न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत. खंदारे दाम्पत्य सध्या पुसद येथे वास्तव्यास आहे. मोहिनी यांनी २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून उपशिक्षणाधिकारी पद प्राप्त केले होते. सध्या त्या बुलढाणा पंचायत समितीत गटशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. पुण्यात कोचिंग घेतले असले तरी त्यांनी स्व-अभ्यास पद्धतीवर विश्वास ठेवून हे उत्तुंग यश संपादन केले आहे. त्यांच्या जिद्द, चिकाटीमुळे केंद्रीय प्रशासनाचे द्वार उघडले आहे. 'आम्हास वर्गशिक्षकांच्या कन्येचा अभिमान आहे!' अशी भावना फुलसावंगीत व्यक्त होत आहे.

## जनता दरबाराला अधिकाऱ्यांकडून केराची टोपली ?

### ७० दिवसांनंतरही ३८६ अर्जांवर कारवाई नाही, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ रवी काळे

**बाभूळगाव, दि. २५ :** जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व त्यांची कामे एकाच ठिकाणी व्हावीत, या उद्देशाने राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी ७ फेब्रुवारी रोजी येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात जनता दरबार आयोजित केला होता. मात्र, या दरबाराला ७० दिवस उलटूनही, प्राप्त ३८६ अर्जांपैकी एकाही तक्रारदाराला त्यांच्या अर्जावर काय कार्यवाही झाली, याबद्दल महसूल यंत्रणेकडून कळवण्यात आलेले नाही. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

शंभर गावांमधून आलेल्या नागरिकांनी या दरबारात मोठ्या आशेने आपल्या तक्रारी मांडल्या होत्या. परंतु, ७० दिवसांनंतरही अर्जदारांना त्यांच्या अर्जाच्या स्थितीबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना नागरिकांचे समाधान करण्याच्या स्पष्ट सूचना देऊनही, प्रशासकीय पातळीवर उदासीनता दिसून येत आहे. अनेक अर्ज संबंधित विभागाकडे न पाठवता भलत्याच विभागांना पाठवण्यात आल्याचे प्रकार समोर आले आहेत. संरक्षक भिंत, रस्ता, नाली बांधकाम, पांदण रस्ता किंवा परिवहन महामंडळाशी संबंधित अर्जदेखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवण्यात आले. अनेक अर्जांवर अधिकाऱ्यांनी गांभीर्याने न वाचता किंवा अर्जाचा विषय न पाहता शेरे (रिमार्क) लिहिल्याचे दिसत आहे. आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हे अर्ज आमच्या अखत्यारीत येत नसल्याचे सांगत, ते परत तहसील कार्यालयाकडे पाठवण्याचा प्रवास सुरू झाला आहे. या सर्व प्रकारामुळे, अर्जदारांना कोणतीही माहिती मिळत नसून, अर्जांची केवळ इकडून तिकडे टोलवाटोलवी सुरू आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अशा कार्यपद्धतीमुळे मंत्र्यांनी आयोजित केलेला जनता दरबार केवळ एक फार्स ठरतो की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आता चुकीचे शेरे लिहिणाऱ्या अधिकाऱ्यांवर मंत्री काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### अर्ज एकाचे, शेरा दुसराच

**मंत्र्यांच्या जनता दरबारात दाखल झालेल्या शेकडो अर्जांची प्रशासनाने अक्षरशः परवड केली. महसूल विभागाने अर्ज नीट न वाचताच त्यावर शेरे मारून ते भलत्याच विभागाकडे पाठविले. रस्ते, नाल्या, पांदन रस्ते, परिवहन संबंधित अर्जही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवले गेले. आता तो विभाग हे अर्ज परत पाठवत आहे. ७० दिवसांपासून अर्जांचा हा निष्फळ प्रवास सुरू असून, नागरिकांच्या समस्या मात्र 'जैसे थे' आहेत.**

## रविवारी मराठी चित्रपटासाठी ऑडिशन

**यवतमाळ, दि.२५ :** रियल गोल्ड फिल्म व प्रतिभा फाउंडेशनतर्फे एका आगामी मराठी चित्रपटासाठी येथे रविवारी (दि. २७ एप्रिल) ऑडिशनचे आयोजन करण्यात आले आहे. गोधनी रोड येथील गट संसाधन केंद्रात हे ऑडिशन होणार आहे. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हे ऑडिशन चालेल. या चित्रपटाचे चित्रीकरण जिल्ह्यातच होणार आहे. चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक नांदेडचे दीपक भवर पाटील असून, सहदिग्दर्शक यवतमाळच्या इंजि. प्रतिभा पवार आहेत. प्रतिभा फाउंडेशनचेही सहकार्य लाभले आहे. जास्तीत जास्त स्थानिक कलाकारांनी यात सहभागी होऊन आपल्या कलागुणांना वाव द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## अभय इंगळे यांचा ब्राह्मण समाजातर्फे सत्कार



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि.२५:** येथील ब्राह्मण समाजातर्फे भाजपाचे नवनियुक्त शहराध्यक्ष अभय इंगळे यांचा बुधवार, दि. २३ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला. भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त निघालेल्या दर्शन यात्रेचे स्वागत करताना हा सत्कार पार पडला.

भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त काढण्यात आलेली अहिल्यानगर ते जानापाव भार्गव दर्शन यात्रा मंगळवारी दिग्रस शहरात दाखल झाली. यावेळी समस्त ब्राह्मण समुदायाच्या वतीने यात्रेचे स्वागत करण्यात आले. याच स्वागत समारंभाच्या औचित्याने भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त दिग्रस शहराध्यक्ष अभय इंगळे यांचा शाल, श्रीफळ आणि आराध्य दैवत भगवान परशुराम यांची सुंदर प्रतिमा भेट देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. भाजपाने अभय इंगळे यांच्यासारख्या एका जागृत आणि समाजाच्या भावनांची जाण असलेल्या कार्यकर्त्याची निवड शहराध्यक्षपदी केली आहे, अशा शब्दांत पत्रकार सुरेंद्र मिश्रा यांनी यावेळी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. अभय इंगळे यांनी सत्काराबद्दल समाज बांधवांचे आभार मानले.

## ७४ ग्रामपंचायतींमधील आरक्षण जाहीर

### केळापूर तालुक्यातील ३७ गावांचा कारभार महिलांकडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २५ :** केळापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींसाठी २०२५-३० कालावधीकरिता सरपंच पदाचे आरक्षण नुकतेच जाहीर झाले. येथील नगरपरिषदेच्या बचत भवन येथे झालेल्या सोडतीत, पेसा व बिगर-पेसा क्षेत्रातील अनुसूचित जाती-जमाती, नामाप्र व महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. एकूण ७४ पैकी ३७ सरपंचपदे महिलांसाठी राखीव ठरली आहेत.

सन २०२५ ते २०३० या पाच वच्या कालावधीसाठी केळापूर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या एकूण ७४ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात आले. येथील नगरपरिषद बचत भवन येथे ही प्रकियिा पार पडली. यामध्ये बिगर-पेसा क्षेत्रातील २३ आणि पेसा कायद्यांतर्गत येणाऱ्या ५१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या २३ पैकी ११ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले आहे. अनुसूचित जाती (सर्वसाधारण) - पिंपरी रोड; अनुसूचित जमाती (महिला) - लिंगटी; अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) - वागदा; नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) - देहेली; नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) - किन्ही. सर्वसाधारण (खुला) प्रवर्गातील १८ जागांपैकी ९ जागा महिलांसाठी राखीव असून त्यात वार्ताहर, कवठा, सुन्ना, कोदोरी, वृंदावन टाकळी, उमरी रोड, पाथरी, वाठोडा घोन्सी या गावांचा समावेश आहे. तर सायखेडा, केळापूर, अकोली बु., तेलंगटाकळी, सोनबर्डी, पाटणबोरी, पिंपळखुटी, करणवाडी, रुंझा ही ९ गावे सर्वसाधारण (खुला) साठी राखीव आहेत. पेसा क्षेत्रातील सर्व ५१ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्यापैकी २६ ग्रामपंचायतींचे सरपंचपद हे अनुसूचित जमाती (महिला) साठी राखीव झाले आहे. यामध्ये अर्ली, बहात्तर, धारणा, घुबडी, करंजी, कारेगाव रामपूर, केगाव, खैरगाव बु., कोंडी, कोंघारा, कोठोडा, मांगुर्डा, मारेगाव, डोंगरगाव, मोहोदा, मोहदरी, मुंजाळा, पवार, पिंपरी, सखी बु., सिंगलदीप, सुसरी, ताडपत्री, टेंभू, वाई, मंगी या गावांचा समावेश आहे.

## बाबासाहेबांनी देश विकासाचा पाया रचला

### डॉ. अनिल काळबांडे : दराटी येथे महामानवांची संयुक्तरित्या जयंती साजरी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २५ :** रूढी, प्रथा, परंपरेशी संघर्ष करून शोषित, पीडित, दलितांसह माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आयुष्य वेचले. केवळ देशाचे कल्याण व्हावे, या राष्ट्रभक्तीतून आणि समर्पणातून त्यांनी देशाच्या विकासाचा पाया रचला, असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी केले. तालुक्यातील दराटी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी सरपंच सुनिता आडे होत्या. यावेळी भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार विजय खडसे, युवासेना प्रमुख श्रीपाल आडे, माजी सैनिक आनंदराव जाधव, उपसरपंच अर्जुन बडेवाड, गोपीनाथ घुले, ज्ञानेश्वर नगारे, स्वागत अध्यक्ष दिपक कांबळे, मुख्याध्यापक कैलास राठोड, अरुण आळणे, प्रविण गायकवाड, युवासेनाप्रमुख दया पाटील, भाजपा उपाध्यक्ष बबन जाधव, चंद्रशेखर शेंडे, डॉ. उदय जाधव आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. काळबांडे पुढे म्हणाले, 'एकेकाळी देशात किड्यामुंगीला जगण्याचा अधिकार होता, पण माणसाला नव्हता. बाबासाहेबांनी माणसांवर प्रेम करायला शिकवले. आम्हाला संपत्ती किंवा देशाची मालकी नको, फक्त माणसासारखे जगू द्या, यासाठी त्यांनी आयुष्य खर्ची घातले. शिक्षण हे शस्त्र देऊन त्यांनी आमचा विकास साधला. नितीन भुतडा यांनी केवळ जयंती साजरी न करता महापुरुषांचे विचार अंगीकारणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आमदार किसनराव वानखेडे यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व समाजाला एकत्र जोडण्याचे बाबासाहेबांचे कार्य ऐतिहासिक असल्याचे नमूद केले. माजी आमदार विजय खडसे म्हणाले की, शिक्षणाची दारे बंद असतानाही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बाबासाहेबांनी देशाचे संविधान लिहून देशाला नवी विचारधारा दिली. प्रास्ताविकात परशराम भरणे यांनी दराटी गाव सर्व सण-उत्सव एकत्र येऊन साजरे करत असल्याचे सांगून, गावाचा हा सामाजिक सलोखा इतरांसाठी आदर्श असल्याचे सांगितले. उत्तम कानिंदे यांनी संचालन केले, तर प्रविण मुनेश्वर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला दराटी येथील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्णीकरांची चिमुकल्या आराध्याला मदतीचा आधार



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २५ :** येथील मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमातील आठ वर्षीय दिव्यांग चिमुकली आराध्या हिच्या उपचारासाठी वृत्तपत्रातील बातमीनंतर मदतीचा ओघ सुरू झाला आहे. सोशल मीडियावरील आवाहनाला प्रतिसाद देत अनेकांनी मदत केली.

वृद्धाश्रमाचे संचालक खुशाल नागपुरे यांनी माहिती दिली की, आतापर्यंत ७,२०० जमा झाले आहेत. माजी उपाध्यक्ष कादर इसानी यांनी आराध्यासाठी दूध देणारी गाय, तर माजी नगराध्यक्ष आरीज बेग यांनी जागेसाठी मदतीचे आश्वासन दिले आहे. नागपुरे यांनी सर्वांचे आभार मानले असून, पुढील मदतीचे आवाहन केले आहे. यावेळी आरीज बेग, कादर इसानी, प्रमोद कुदळे, आरिफ शेख, जाकिर सोलंकी, परवेज बेग, मनोज माघाडे उपस्थित होते.

## थोडक्यात

### पाणी टंचाईबाबत आढावा बैठक

**यवतमाळ :** पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आज शनिवारी (दि. २६) सकाळी १०.३० वाजता येथील महसूल भवन येथे जिल्ह्याच्या पाणी टंचाईबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी तसेच सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील पाणी टंचाईची स्थिती, विभागाच्यावतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजना व संभाव्य उपाययोजनांची पालकमंत्री माहिती व आढावा घेणार आहे.

### हॉर्न का वाजविला म्हणून वाद

**कळंब :** गाडीला ओव्हरटेक करतांना हॉर्न का वाजविला म्हणून वाद करण्यात आला. यापकरणी मुलासोबत गाडीला ओव्हरटेक करतांना गाडीचा हॉर्न का वाजविला या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व थापडाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली तसेच कड्याने मारून जखमी केले. ही घटना २४ एप्रिलला घडली. याप्रकरणी अरूण थुलाराम भिंडवाई यांच्या तक्रारीवरून वतन कोंदाणे, वैभव कोंदाणे, यश वैद्य विरूध्द गुन्हा नोंद केला.

### सोन्याची पोत लंपास

**नेर :** बसस्थानक परिसरातुन सोन्याची पोत लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी बसमध्ये चढत असतांना महिलेच्या पर्समधुन ३६ ग्रॅमची सोन्याची पोत किंमत १,१४,१२० व नगदी २ हजार रूपये असा एकुण १,१६,१२० रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने हातचलाखीने चोरून नेला. ही घटना २४ एप्रिलला घडली. याप्रकरणी सौ. शितल रमेश राठोड यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### मसोला येथे घरफोडी

**आर्णी :** मसोला येथे घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने घराच्चा दरवाज्याचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील नगदी २२,००० रूपये चोरून नेले. ही घटना २० ते २४ एप्रिलला घडली. याप्रकरणी गौरव किसनराव भजभुजे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### गजाच्या तुकड्याने हल्ला

**आर्णी :** पाबळ येथे गजाच्या तुकड्याने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी आमच्या गावच्या मुलांना यात्रेत का फिरू देत नाही असे म्हणून वाद करून शिविगाळ केली व थापडाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली तसेच गजाच्या तुकड्याने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी छगन माणिक आडे यांच्या तक्रारीवरून सोहम बंडु पवार, मंगेश पवार, विनायक आशिष राठोड, पप्पु बाबुसिंग पवार विरूध्द गुन्हा नोंद केला.

### चना लंपास

**लाडखेड :** गोदामातील तुर व चणा लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी गोदामच्या शटरचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून गोदामामधील ९७ क्विंटल तुर व ३५ क्विंटल चणा असा एकुण ८,३७,००० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी दिनेश जगनारायण तिवारी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

# जिल्हा काँग्रेसमध्ये बदलाचे जोरदार वारे!

## प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा संघटनेला 'सक्षम'करण्याचा निर्धार; घराणेशाही, गटबाजीला चाप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ राजकुमार भीतकर







**यवतमाळ, दि.२५:** विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये नव्याने आलेले प्रदेशाध्यक्ष, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्ष संघटनेत आमूलाग्र बदल करण्याचे संकेत दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून यवतमाळ जिल्ह्यातही लवकरच जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि विविध सेल प्रमुखांच्या निवडी होणार असून, नेतृत्व बदलाचे वारे जोरदार वाहत आहेत.

काँग्रेसला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी प्रदेशाध्यक्ष सपकाळयांनी पक्ष संघटनेत मोठे फेरबदल सुरू केले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील स्थितीचा आढावा घेण्यासाठी त्यांनी आमदार संजय मेश्राम यांना निरीक्षक म्हणून पाठवले होते. पक्ष निरीक्षक श्री. मेश्राम यांनी सोळाही तालुक्यांचा दौरा करून कार्यकर्ते आणि नेत्यांशी संवाद साधला. यावेळी कार्यकर्त्यांनी पक्षातील घराणेशाही, इष्टमित्रांना आणि सगे सोयऱ्यांना मिळणारी पदे, निष्ठावंत आणि सक्षम कार्यकर्त्यांना डावलले जाणे, नेत्यांकडून होणाऱ्या चुका आणि गटबाजीवर उघडपणे नाराजी व्यक्त केली. काही नेते पक्षात राहूनही विरोधी पक्षांसाठी काम करत असल्याचे आणि विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांविरोधात काम केल्याचेही कार्यकर्त्यांनी पक्ष निरीक्षकांच्या निदर्शनास आणून दिले आहे. सध्या जिल्ह्यात काँग्रेसची अवस्था 'असून नसल्यासारखी'आहे. जिल्हाध्यक्ष कोणत्याही आंदोलनात वा मोर्चात दिसत नाहीत, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयूआयला नेतृत्व नाही. पक्ष दलित, मुस्लिम, ओबीसी, आदिवासी, बहुजन समाजापासून दुरावला आहे. ही मरगळ झटकण्यासाठी प्रदेश काँग्रेसने कंबर कसली आहे. विधानसभा निवडणुकीत पक्षाविरोधात काम केलेल्यांना 'साइडलाइन'करून निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे. तसेच, पक्षापासून दूर गेलेल्या ओबीसी समाजाला पुन्हा जवळ आणण्यावर अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि नेते खासदार राहुल गांधी यांचा भर आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी प्रवीण देशमुख, संजय ठाकरे, मनीष पाटील, राहुल ठाकरे व तातू देशमुख आदींच्या नावांची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. पक्ष कुणाच्या खांद्यावर जबाबदारी सोपवते, हे येणारी वेळच सांगणार आहे.

### घराणेशाही, गटबाजीने काँग्रेस पोखरली

- पक्ष निरीक्षक आमदार संजय मेश्राम यांच्या दौऱ्यात काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आणि घराणेशाहीचे विदारक चित्र समोर आले. मोजकेच नेते पक्ष चालवत असून, ते आपल्यानंतर कार्यकर्त्यांना डावलून स्वतःच्या वारसांना पुढे करत आहेत. आप्तस्वकीय आणि इष्टमित्रांनाच पदे वाटली जात असल्याने निष्ठावंत आणि सक्षम कार्यकर्ते प्रवाहाबाहेर फेकले जात असल्याची खंत कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या गटबाजीमुळेच पक्षाचे मोठे नुकसान होत आहे.

### जिल्हा काँग्रेसला महामानवांचा विसर?

- यवतमाळ जिल्हा काँग्रेस कार्यालयात एकेकाळी राष्ट्रपिता महात्मा गांधी, देशाचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त आदरांजली कार्यक्रम घेण्याची परंपरा होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या परंपरेला तडा गेला असून, हे कार्यक्रमच आयोजित केले जात नसल्याची खंत अनेक जुन्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखविली. पक्षाला महामानवांचाच विसर पडल्याची भावना वेदनादायी आहे.

CAPTION **काळ्या फिती बांधून निषेध**



**यवतमाळ :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा यवतमाळ येथील मुस्लिम समाजाने तीव्र निषेध नोंदवला. शुक्रवारी विशेष नमाजावेळी (जुम्मा) मुस्लिम बांधवांनी हाताला काळ्या फिती बांधून या अमानुष कृत्याचा निषेध करीत दहशतवादाविरुद्ध आपला संताप व्यक्त केला.

### अतिक्रमण हटाव मोहीम थंडावली

**यवतमाळ, दि.२५:** नगरपरिषदेने उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन सुरू केलेली अतिक्रमण हटाव मोहीम काही दिवसांसाठी पुढे ढकलली आहे. अतिक्रमणधारकांना नोटीस देऊन १५ दिवसांत स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याची ताकीद देण्यात आली आहे. मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी बसस्थानक चौकातील तीन ते चार दुकानांवर नगरपरिषदेचा बुलडोझर चालविण्यात आला. यावेळी तर दुकानदारांनी हा विषय न्यायालयात असल्याचे सांगितले, ज्यामुळे तीव्र विरोध झाला. तहसीलदार आणि मुख्याधिकाऱ्यांनी मध्यस्थी करून कायदेशीर बाजू ऐकून घेतल्यानंतर ही मोहीम तात्पुरती थांबवण्यात आली. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सध्या फक्त होर्डिंग बोर्ड तोडण्यात आले असून उर्वरित मोहीम गुरुवारी राबविण्यात येईल.

# दालमील गोडाऊनला आग

## अंबोडा येथील घटना, नायब तहसीलदारांनी केली मोक्का पाहणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि.२५:** तालुक्यातील अंबोडा येथील मातोश्री उर्मीलाबाई राऊत दालमीलच्या गोडाऊनला अचानक लागलेल्या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले.

दालमील पिसाई केंद्राच्या गोडाऊनमध्ये शुक्रवारी (दि.२५) पहाटे पाचदरम्यान लागल्याचे माधव राऊत यांच्या निदर्शनास आले. त्यांनी घरातील सर्वांना जागे करून दुसऱ्या घरी सोडले आणि लगेच आर्णी येथील नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहन विभागाला भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. गावातील मित्र मंडळींना फोन करून बोलावून घेतले. ते घटनास्थळी येईपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. त्यामुळे गोडावूनमधील धान्य, मशिनरी, फर्निचर, मोजकाटे, जळून खाक झाले होते. त्यात चना २५क्विंटल, तूर दाळ १५०क्विंटल, तूर २५०क्विंटल, चणाडाळ दहा क्विंटल, मूगदाळ ५क्विंटल, तुरकोंडा ५०क्विंटल, तूरकनोर २५ क्विंटल, टेबल ३, खुर्च्या ६, कुलर १, चक्की १, लाकडी रॅक २, तेल २५ पिपे, पॅकिंग मशिन ४, धागा बंडल २ बॉक्स, धान्य सफाई मशिन १ असे अंदाजे पंचेचाळीस लाखांचे नुकसान झाले असल्याची माहिती तहसीलदार आर्णी यांनी केलेल्या पंचनाम्यात नमूद आहे. या अचानक झालेल्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीमुळेदालमीलमध्ये धान्यमालक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# आयपीएल सट्ट्यावर पोलिसांचा छापा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२५:** येथील हॉटेल ग्रीन गॅन्सनमध्ये आयपीएल सामन्यावर सट्टा खेळणाऱ्या महेश श्रीरंग याला स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी, दि. २४ एप्रिल रोजी रात्री रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून लॅपटॉप, मोबाईल जप्त केले असून, ऑनलाइन सट्ट्याचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी हॉटेलमधील रूम नंबर २०९ मध्ये छापा टाकला, तेव्हा राजस्थान रॉयल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर बंगळुरू सामन्यावर सट्टा सुरू होता. संशयित आरोपी महेश श्रीरंग हा त्याच्या मोबाइलमधील 'रेड्डी अण्णा (लोट्स)', 'रॉकीज यूके' आणि 'ऑल पॅनेल' या ॲप्सच्या माध्यमातून ऑनलाइन क्रिकेट सट्टा खेळत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याने यापूर्वीही याच ॲप्सद्वारे मोठ्या प्रमाणात पैशांचे व्यवहार केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, या ॲप्सचे डेव्हलपर आणि क्रिकेट बुकीज यांचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा अधिक तपास करत आहे. ही यशस्वी कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक संतोष मनवर, सपोनि योगेश गटलेवार, अजय डोळे, विनोद राठोड, पोहवा प्रशांत हेडाऊ, पोहवा नीलेश राठोड, पोहवा रितुराज मेडवे व आकाश सहारे यांच्या पथकाने केली.

### प्राध्यापकाचे अपघाती निधन

**नेर (परसोपंत), ता. २५:**



येथील दि इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण यशवंत मिसाळ यांचे आज, शुक्रवारी (दि. २५ एप्रिल) उपचारादरम्यान नागपूर येथे अपघाती निधन झाले. काही दिवसांपूर्वी त्यांना दुचाकीने धडक दिली होती. जेवणानंतर शतपावली करताना आजंती रोडवर मागून आलेल्या दुचाकीच्या धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. प्रा. मिसाळहे पर्यावरणप्रेमी, प्रगतिशील शेतकरी, उत्तम वक्ता म्हणून परिचित होते. ते नेर पर्यावरण मंडळाचे सक्रिय सदस्य व महाविद्यालयात एनसीसीचे प्रभारी होते. त्यांच्या निधनाने नेर शहरावर शोककळा पसरली असून, तालुक्याचे मोठे नुकसान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई, वडील, आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.

# गुटखा तस्करीचे रॅकेट जिल्हाभर सक्रिय

## लाखो रुपयांचा गुटखा पोलिसांनी केला जप्त; वसंतनगर पोलिसांची कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २५:** वसंतनगर पोलिसांनी गुरुवार, दि. २४ एप्रिलला पुसद शहरातील नगर परिषद शाळा क्रमांक ३ जवळ छापा टाकून एक लाख ९१ हजार ४९६ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या कारवाईत हकीमोद्दीन करीमोद्दीन (वय ३६) आणि सय्यद मुक्तार सय्यद रशीद (वय २७), दोघेही रा. वसंतनगर, यांना अवैधरीत्या गुटखा बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू, पानमसाला उघडपणे विकला जातो. बाभूळगावातील एका गुटखा तस्कराने मध्यप्रदेशात तयार करण्यात येणारा बब्बू गोल्ड व मजा तंबाखू यवतमाळात वितरित करण्याचा व्यवसाय सुरू केला. या अगोदर या तस्करांवर पोलिसांनी छापा टाकून एक कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर गुटखा तस्कराने अकोला बाजार येथे एका एजंटमार्फत गुटखा साठवणूक व वाटपासाठी गोडावून तयार करण्यात आले. एवढेच नव्हेतर या तस्कराने १० बोरे सुगंधित तंबाखू विक्री केल्यास त्यावर एक चारचाही वाहन देण्याची ऑफर जारी केले. त्यामुळे वाहनाच्या लालसेपोटी यवतमाळ जिल्ह्यात खुलेआम सुगंधित तंबाखूची विक्री होत आहे. मात्र, पोलिस थातूरमातूर कारवाई करून कारवाई केल्याचा आव आणत आहे. सुगंधित तंबाखू तयार करण्यासाठी वापर करण्यात येणाऱ्या केमिकलमुळेकर्करोग होण्याची दाट शक्यता आहे. यवतमाळ जिल्ह्यात विक्री केल्या जात असलेल्या खऱ्र्यामुळे अनेकांना दुर्धर आजार झाले आहे. जिल्हा रुग्णालयात दररोज तंबाखूजन्य पदार्थ सेवन केल्याने आजाराचे रुग्ण रुग्णालयात येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे गुटखा, सुगंधित तंबाखू जप्तीची पोलिस व अन्न व औषध प्रशासनाने मोहीम हाती घेऊन जिल्ह्यातील तस्करांच्या मुसक्या आवळण्यात याव्यात, अशी मागणी जिल्ह्यातील सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.

# भाटंबा जि.प. शाळेतील विद्यार्थी शिकताहेत जपानची भाषा

## महेश चव्हाण या शिक्षकाचा अनोखा प्रयोग; तंत्रज्ञानाच्या मदतीने परदेशी भाषेचे शिक्षण देण्याचा उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ प्रा. महादेव गावंडे



**पुसद, दि.२५ :** 'जिल्हा परिषदेतील (झेडपी) शाळेतील मुलांना धड मराठी बोलता येत नाही,' हा गैरसमज पुसून टाकत, पुसद पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या भाटंबा येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक महेश चव्हाण यांनी थेट जपानी भाषा शिकविण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांना ते मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने जपानी भाषेचे धडे देत आहेत.

एकीकडे जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असताना, काटखेडा केंद्रातील भाटंबा शाळेतील शिक्षक महेश चव्हाण यांनी आपल्या कामातून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. स्पर्धेच्या युगात जागतिक स्तरावर जपानी भाषेचे वाढते महत्त्व आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या सांस्कृतिक व व्यावसायिक संधी ओळखून, आपल्या ग्रामीण भागातील मुलांनाही परदेशी भाषा अवगत व्हावी, या उदात्त हेतूने त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. यासाठी त्यांनी प्रथम स्वतः जपानी भाषा शिकण्यास सुरुवात केली. शिक्षक प्रशिक्षणात मिळालेल्या भविष्यवेधी शिक्षणाच्या प्रेरणेतून, मुलांना केवळ वाचन-लेखनाच्या चौकटीत न अडकवता, त्यांना येणाऱ्या काळासाठी सज्ज करणे गरजेचे आहे, हे त्यांनी जाणले. विशेषतः अभियांत्रिकी शिक्षणानंतर परदेशात नोकरी करण्याचे अनेकांचे स्वप्न असते, त्यासाठी भाषेचे ज्ञान उपयुक्त ठरते, हा विचारही यामागे होता. आज त्यांच्या वर्गातील २३ विद्यार्थी जपानी भाषेत संवाद साधत आहेत. चव्हाण यांच्या या प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी परदेशी भाषा शिकण्याचे एक नवे दालन खुले झाले आहे. त्यांच्या या कार्याचे आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांनी सिद्ध केले आहे की, इच्छाशक्ती आणि योग्य दृष्टी असेल, तर जिल्हा परिषद शाळेतही जागतिक दर्जाचे शिक्षण देणे शक्य आहे.

### शिकवले जपानी: यू-ट्यूब ते हिरागाना!

- महेश चव्हाण यांनी जपानी भाषा शिकवण्यासाठी आधुनिक आणि सोप्या पद्धतींचा वापर केला. सुरुवातीला यू-ट्यूबवरील व्हिडिओ दाखवून आणि ऐकवून मुलांना भाषेची ओळख करून दिली. मूलभूत गोष्टी समजल्यानंतर संवाद साधण्यास सुरुवात केली. जपानी लिपी 'हिरागाना'ची ओळख करून देत, पाच-पाच अक्षरे शिकवून त्यांचे वाचन-लेखन घेतले. छोटे संवाद गटागटाने बसविले. इंटरनेटवरून वाक्ये शोधून त्यांचा शाळेत सराव घेतला.

### 'झेडपी'ची मुले बोलू लागली जपानी!

- महेश चव्हाण यांच्या या अभिनव उपक्रमाचे परिणाम अवघ्या पाच-सहा महिन्यात दिसू लागले आहेत. दुसरी ते चौथीच्या वर्गातील विद्यार्थी आता केवळ जपानी भाषा समजतच नाहीत, तर त्यामध्ये सहजपणे दैनंदिन संवाद साधू शकतात, वाचू आणि लिहू शकतात. ग्रामीण भागातील आणि जिल्हा परिषद शाळेतील मुलांची ही प्रगती कौतुकास्पद आहे.